जपानी परीकथा

येइ ओझाकी

वसंत बागुल

जपानी परिकथा-2

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

जपानी परिकथा

संपादिका: येई थिओदोरा ओझाकी

अनुवादक: वसंत बागुल

जपानी परिकथा

संपादिकाः येई थिओदोरा ओझाकी
अनुवादकः वसंत बागुल
३०२, न्यु शिवम अपार्टमेंट
स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे
फोन: 0251-2587832, 8149068977
vasant_pandit2002@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity. com
esahity@gmail. com
प्रकाशन : २२ जुलै २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची- लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

माझ्या अतिशय गोड व सुशील नातीः

लिना,

हर्षिता,

तनिशा,

जान्हवी,

लक्ष्मी,

सिद्धी,

तेजल

आणि एशा

ह्यांना अकृत्रिम आनंद देणाऱ्या सातासमुद्रापलिकडील
अनुपम सुंदर जपानी परिकथांची अनमोल भेट.

- भाऊ

येई थिओदोरा ओझाकी ही विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या जपानी लघुकथा आणि परिकथांची अनुवादिका होती. तिचे अनुवाद प्रामाणिकपणे अभिजात आणि लोकप्रिय असून तिच्या मृत्यूनंतर बऱ्याचदा पुनर्मुद्रित झालेले आहेत. ती बॅरन ओझाकीची कन्या होती जे पाश्चिमात्य देशात जाऊन शिक्षण घेणारे पहिले जपानी गृहस्थ होते आणि विल्यम मॉरिसनची कन्या बाथिया कॅथेराईन मॉरिसन या त्यांच्या शिक्षकांपैकी एक होत्या. तिचे आईवडिल पाच वर्षांनी विभक्त झालेले होते आणि तिच्या आईवर त्या तिन्ही मुलींची, त्या एकोणवीस वर्षांच्या होईपर्यंत, संगोपन करण्याची जबाबदारी पडली होती. त्याच वेळी, येईला तिच्या वडिलांबरोबर जपानला पाठविण्यात आले जेथे तिने मौजेत दिवस घालविले. त्यानंतर तिने नियोजित विवाहाला नकार दिला, वडिलांचे घर सोडले आणि अर्थार्जनासाठी शिक्षिका व सचिव बनली. सारी वर्षे तिने युरोप आणि जपानचा इकडून तिकडे व तिकडून इकडे प्रवास केला तो तिच्या कौटुंबिक कर्तव्यासाठी. इटलीसारख्या विविध देशात प्रवास केला आणि बुद्धिस्ट मंदिरांच्या सर्वात वरच्या माळयावर झोंबणाऱ्या गार वाऱ्यात वास्तव्य केले. ह्या सर्व काळात तिची पत्रे चुकीने वारंवार काहीही संबंध नसलेल्या जपानी राजकारणी युकिओ ओझाकी कडे पोहचवली गेली आणि तिची त्याच्याकडे. १९०४ मध्ये शेवटी ते भेटले आणि लवकरच विवाहबद्ध झाले. तिच्या कलाकृतींमध्येः जपानी परिकथा, प्राचीन जपानचे योद्धे आणि इतर गोष्टी, प्राचीन जपानच्या अद्‌भुतरम्य प्रेमकथा आणि बुद्धाचे स्फटिक आणि इतर परिकथा यांचा समावेश आहे.

मनोगत

लहान बाळ जेव्हा बोलायला शिकते तेव्हा पहिल्यांदा ते काय म्हणते?"मला गोष्ट सांगा."

लहान मुलांना गोष्टी फार आवडतात. आणि त्याचं कारण म्हणजे त्यात असलेले चमत्कार आणि कल्पनारम्यता.

जंगलात जसे मोठे सर्प, वाघ, सिंह आणि हत्ती ह्या सारखे हिंस्त्र प्राणी असतात; तसेच हरिण, ससे आणि कासव ह्यासारखे निष्पाप, निरूपद्रवी प्राणीही असतात. ह्या सर्वांच्या स्वभावात फारसा फरक नसतो. वरून वाघ, सिंहासारखी भयंकर वाटणारी माणसे आतून अतिशय प्रेमळ व दयाळू अंतःकरणाची असतात.

पशुपक्ष्यांना, किड्या-मकोड्यांना बोलता येत नाही, पण परिकथांमध्ये त्यांना बोलके करून मानवासारखे आचरण करताना दाखविलेले असते. राक्षस, भुते, हडळी आणि चेटकिणी ह्यांना आपण कधीही पाहिलेले नसते; पण ते जसे वाईट तसे चांगलेही असतात, असे परिकथांमध्ये आपण वाचतो. जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपिअरने म्हटल्याप्रमाणे –

"काही माणसे भुतांची कामे करतात तर काही भुते माणसांची कामे करतात."

देव आणि दानव, सत् आणि असत् ह्यांचा झगडा फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. आधुनिक मानवाच्या राहण्या-वागण्यात आणि बुद्धीमत्तेत खूपच प्रगती झालेली आहे. पण लक्षावधी वर्षांपासून त्याच्यास्वभावातील षड्रिपु (काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर) जसे होते तसेच आहेत, किंबहुना ते अधिकाधिक वृद्धिंगत होत आहेत.

परोपकार, संकटमोचन, योग्य मार्गदर्शन, त्याग व दुसऱ्याच्या दुःखाबद्दल वाटणारी अनुकंपा आणि त्या मोबदल्यात मिळणारे औदार्य, कृतज्ञता आणि मौल्यवान पारितोषिके हा निसर्गाचा नियमच आहे.

सत्य, शिव आणि सुंदर ह्यांच्या बाजूने लढून असत्य, अमंगल आणि विकृत ह्या विरूद्ध विजय मिळविण्यातच मानवाच्या जीवनाचे कल्याण आहे.

--परिकथा हेच सांगतात.

प्रस्तावना

हा जपानी परिकथांचा संग्रह म्हणजे श्री.अँड्रयू लँग ह्यांच्याकडून माझ्या मित्राद्वारे केलेल्या अप्रत्यक्ष सूचनांचे फलित होय. सादानामी सान् जिन ह्यांनी लिहिलेल्या आधुनिक पाठभेदातून त्या भाषांतरीत केल्या गेलेल्या आहेत. या कथा शब्दशः भाषांतरीत नाहीत, आणि त्या जरी जपानी परिकथा असल्या तरी जुन्या पद्धतीची जपानी अभिव्यक्ती यथातथ्यपणे ठेवली आहे, त्यांचे कथन विद्यार्थ्यांपेक्षा तरूण पाश्चात्त्य वाचकांच्या जिज्ञासापूर्तीचा उद्देश राखून केलेले आहे.

ज्यांनी भाषांतरात मला मदत केली त्या श्री. वाय्. यासुओका, कु. फुसा ओकामोतो, माझे बंधू नोबुमोरी ओझाकी, डॉ.योशिहिरो ताकाकी आणि कु. कामेको यामावो यांच्याकडे कृतज्ञतेच्या ऋणनिर्देशाचे श्रेय जाते. एक गोष्ट जिचे नाव मी "एका माणसाची गोष्ट ज्याला मरायची इच्छा नसते" शिन् सुइ तामेनागाने शंभर वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका छोट्या पुस्तकातून घेतली आहे. तिचे नाव चोसेइ फुरो किंवा "दीर्घायुष्य." "बांबूतोड्या आणि शशांकपुत्र" हे "ताकेतारी मोनोगातारी" ह्या अभिजात ग्रंथातून घेतलेले आहे आणि ते खरोखर अभिजात वाङ्मय असले तरी त्याची गणना जपानी लोकांनी आपल्या परिकथात अभिजात म्हणून केलेली नाही.

चित्रे श्री. काकूझो फुझियामा ह्या टोकियोच्या कलाकाराने काढलेली होती. जे मला आवश्यक वाटले व ज्यामुळे मला संतोष मिळाला अशा स्थानिक सूक्ष्म तपशीलाचा किंवा निवेदनाचा समावेश मी ह्या गोष्टींचे कथाकथन इंग्रजीत करताना केलेला आहे आणि एक किंवा दोन घटनांमधून मी ते प्रसंग दुसऱ्या पाठभेदातून वेचलेले आहेत. जपानच्या सुंदर दंतकथा आणि परिकथा सदासर्वदा ऐकणारे उभयतः तरूण आणि म्हातारे, इंग्लिश किंवा अमेरिकन उत्सुक श्रोते मला आढळून आले आणि त्या कथन करताना मला असेही आढळून आले की अतिशय मोठ्या प्रमाणावर ते त्याविषयी अनभिज्ञ आहेत आणि ह्या गोष्टीनेच मला पाश्चात्त्य मुलांसाठी लिहिण्याचे प्रोत्साहन दिले.

वाय. टी. ओ. (टोकियो, १९०८)

अनुक्रमणिका

९ बांबूतोड्या आणि चंद्रकन्या

१० मात्सुयामाचा आरसा

११ अदाचिघाराचा राक्षस

१२ चतुर माकड आणि रानडुक्कर

१३ कुशल शिकारी आणि चतुर कोळी

१४ कोमेजलेल्या झाडाला फुले आणणाऱ्या म्हाताऱ्याची गोष्ट

१५ पाकमत्स्य आणि माकड

जपानी परीकथा

येइ ओझाकी

वसंत बागुल

बांबूतोड्या आणि चंद्रकन्या

फार फार वर्षांपूर्वी एक म्हातारा बांबूतोड्या राहत होता. तो खूप गरीब आणि दुःखी होता कारण परमेश्वराने त्यांना म्हातारपणात आनंदी करण्यासाठी मुलबाळ दिलेले नव्हते. मरेपर्यंत त्याला कामापासून विश्रांती मिळेल अशी आशा त्याला वाटत नव्हती आणि तो गंभीर शांततेच्या अधीन झाला होता. जेथे जेथे बांबू त्यांचे लवचिक हिरवे तुरे आकाशाकडे उंचावत अशा जंगलात व टेकड्यांकडे तो दररोज सकाळी जात असे. निवडून निवडून तो त्या जंगलातली पिसे तोडायचा आणि सारख्या लांबीचे तुकडे करायचा किंवा पेरे कापून तुकडे करायचा, बांबूचे ते तुकडे घरी आणायचा, घरात लागणाऱ्या विविध वस्तू बनवायचा. तो आणि त्याची बायको त्या वस्तू विकून चरितार्थाचे अल्पसे साधन मिळवायचे.

एके दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे तो कामासाठी बाहेर पडला आणि त्याला बांबूंची छान झाडी दिसली. तो ती कापण्याच्या कामाला लागला. अकस्मात त्याला बांबूच्या उपवनात हलकासा प्रकाश ओसंडून भरलेला दिसला. जणू काही पौर्णिमेचा चंद्रच त्याजागी उगवला होता. विस्मयाने सभोवती बघितल्यावर त्याला दिसले, एका बांबूतून प्रकाशाची झळाळी पाझरत आहे. आश्चर्याने थक्क होत त्याने त्याची कुऱ्हाड खाली टाकली आणि तो त्या प्रकाशाकडे गेला. तो जसा जवळ गेला तसा त्याला बांबूच्या हिरव्या खोडातल्या पोकळीमधून मंद प्रभा बाहेर येताना दिसली. आणि अजूनही आश्चर्यचकित झालेल्या त्याला त्या झळाळीमध्ये एक मानवी आकृती फक्त तीन इंच उंचीची, आणि अतिशय सुंदर अशी दिसली.

“तू बांबूमध्ये माझ्या नित्यकर्मात दृष्टीस पडली, म्हणजे तुला नक्कीच माझं अपत्य म्हणून पाठविलं गेलं आहे,” तो म्हातारा म्हणाला आणि त्या लहानशा देहाला हातात घेऊन त्याचं पालनपोषण करण्यासाठी त्याच्या पत्नीकडे घेऊन गेला.

ती इवलीशी बालिका इतकी नितांत सुंदर होती की त्या म्हातारीने तिला कुठल्याही परिस्थितीत इजा व्हायला नको म्हणून सुरक्षितरित्या एका टोपलीत ठेवली.

आता ते म्हातारं जोडपं खूप सुखी होतं, कारण त्यांना स्वतःची मुले नव्हती ह्याची दीर्घकाळापासून त्यांना खंत होती, आणि अद्भूत रितीने ते लहानसं मूल त्यांच्या उत्तरायुष्यात आल्यामुळे वृद्धापकाळातील आनंदासह साऱ्या प्रेमाचा वर्षाव त्यांनी त्यावर केला.

ह्या वेळेपासून जेव्हा जेव्हा तो बांबू तोडून खाली पाडायचा व कापायचा तेव्हा पुन्हा पुन्हा बांबूच्या खाचेत त्या म्हाताऱ्याला सोने सापडायचे, फक्त सोनेच नाही तर रत्न सुद्धा सापडायचे. म्हणून हळूहळू तो श्रीमंत झाला. त्याने त्याच्यासाठी एक सुंदर घर बांधले आणि तो गरीब बांबूतोड्या ऐवजी एक श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखला जाऊ लागला.

तीन महिने भराभर निघून गेले आणि काय नवल म्हणावे, त्या काळात बांबू बालक पूर्णपणे यौवनात आले. म्हणून तिचे पालक मातापिता तिची वेणी फणी करून तिला सुंदर किमोनो (परंपरागत जपानी कपडे) वेष घालीत. तिचं लावण्य इतकं आश्चर्यकारक होतं की त्यांनी तिला एखाद्या राजकुमारीसारखं पडद्यामागे झाकून ठेवलं. आणि ते स्वतः जागरूक राहून तिला बघायची कुणालाही अनुमती देत नसत. असा आभास व्हायचा की तिला जणू प्रकाशापासून बनविले आहे, कारण तिच्या मंद प्रकाशाने सारं घर उजळून निघायचे, म्हणून गडद अंधाराच्या रात्रीही हा दिवस आहे असेच वाटायचे. ज्या ज्या वेळी त्या म्हाताऱ्याला उदासवाणे वाटायचे त्या त्या वेळी तो फक्त त्या वाढविलेल्या मुलीकडे निरखून बघायचा आणि त्याची विषण्णता नाहीशी व्हायची, आणि तो यौवनात जसा आनंदी असायचा तसा उल्हसित व्हायचा.

शेवटी त्यांच्या नविन गवसलेल्या बालकाच्या नामकरण विधीचा दिवस आला. म्हणून त्या म्हाताऱ्या जोडप्याने सुविख्यात नामकरण विधी करणाऱ्याला बोलविले आणि त्याने तिचे नाव राजकुमारी चंद्रप्रभा ठेवले, कारण तिच्या शरीरातून अशी मंद प्रभा झिरपायची की ती चंद्रदेवाचीच कन्या असावी असे वाटायचे.

गाणे, नृत्य आणि संगीताच्या जल्लोषात तीन दिवस उत्सव साजरा करण्यात आला. म्हाताऱ्या जोडप्याचे सर्व मित्र-मैत्रिणी व नातेवाईक हजर होते. आणि राजकुमारी चंद्रप्रभेचा नामकरण विधी सर्वांनी खूप आनंदात साजरा केला. प्रत्येक जण, ज्याने ज्याने तिला पाहिले तो असा अभिप्राय द्यायचा की ह्या देशात आजूबाजूला दूरपर्यंत आणि सर्वत्र कोठलेही सौंदर्य तिच्या पुढे फिके पडले असते. राजकुमारीच्या लावण्याची किर्ती सर्वत्र आणि दूरवर पसरली आणि अनेक विवाहेच्छुकांनी तिचा हात मिळविण्याची किंवा तिच्या दर्शनाची सुद्धा अभिलाषा केली.

जवळपासच्या विवाहेच्छुकांनी तर स्वतःहून त्या घराभोवती तंबू टाकले आणि राजकुमारीला ह्या खोलीतून त्या खोलीत पडवीतून जाताना त्यांना निदान तिचे दर्शन तरी व्हावे म्हणून त्यांनी आतून लपून बघण्यासाठी पडद्यांना छोटी छिद्रे पाडून ठेवली होती. निद्रेचा देखील त्याग करून रात्रंदिवस जागून तिला पाहण्याची ते संधी शोधत, पण सर्व व्यर्थ. नंतर ते घराजवळ गेले आणि त्यांनी त्या म्हाताऱ्याशी आणि म्हातारीशी किंवा काही नोकरांशी बोलण्याचा प्रयत्न केला पण त्यांना परवानगी मिळाली नाही.

तथापि एवढी निराशा पदरी पडण्याच्या उपरांत रात्रीमागून रात्र व दिवसामागून दिवस निरर्थक मोजित ते तेथेच थांबले. राजकुमारीला बघण्याची त्यांची लालसा मोठी प्रबळ होती.

तथापि त्यांचा दीर्घ शोध किती आशाहीन आहे ह्याची बऱ्याच जणांना जाणीव होऊन, निराश होऊन ते खिन्न झाले आणि शेवटी घरी परतले. सर्वांना वगळल्यास फक्त पाच सरदार असे होते की सर्व अडथळयांना न जुमानता त्यांचा उत्साह आणि निर्धार क्षीण होण्याऐवजी वृद्धिंगत होत होता. ही पाच माणसे खाण्या-पिण्याशिवाय राहत होती आणि जे काही त्यांच्यासाठी आणले जाई ते, ते अधाशीपणे हिसकावून घेत जेणेकरून त्यांना त्या घराबाहेर नेहमी उभे राहता यावे. ते सर्व प्रकारच्या वातावरणात, उन्हात आणि पावसात तिष्ठत राहत.

काही वेळा ते राजकुमारीला पत्रे लिहीत पण उत्तराची कृपादृष्टी त्यांच्यावर कधीही झाली नाही. मग उत्तरे मिळवण्यात जेव्हा त्यांची पत्रे अयशस्वी झाली तेव्हा ते हताश प्रेमाने त्यांना निद्रा, अन्न, विश्राम एवढेच नव्हे तर त्यांच्या घरापासूनही त्यांना कसे वंचित केले होते हे तिला ते कविता लिहून सांगत. तरीही राजकुमारी चंद्रप्रभाकडून काव्य मिळाल्याचे संकेत त्यांना मिळत नसत.

अशा हताश अवस्थेत हिवाळा निघून गेला. बर्फ आणि कडाक्याची थंडी ह्यांनी त्यांची जागा हळूहळू वसंत ऋतूच्या सौम्य उबेला दिली. मग उन्हाळा आला आणि सूर्य तापून पांढरा दिसू लागला. वरच्या आकाशाला आणि खाली धरित्रीला होरपळू लागला होता आणि अजूनही ते पाच सरदार नजर ठेवून वाट बघत होते. ह्या दीर्घ

महिन्यांच्या शेवटी त्यांनी त्या म्हाताऱ्या बांबूतोड्याला बोलाविले आणि त्यांच्यावर दया दाखवून राजकुमारीचे दर्शन घडविण्यासाठी त्याची विनवणी केली. पण त्याने उत्तर दिले की तो तिचा खरा पिता नसल्याने त्याची आज्ञा पाळण्यासाठी तो तिला आग्रह करू शकत नाही.

असे कठोर उत्तर मिळाल्यावर ते पाचही सरदार आपापल्या घरी निघून गेले आणि त्या गर्विष्ठ राजकुमारीच्या अंतःकरणाला स्पर्श करण्याच्या, निदान तिचे दर्शन कसे होईल ह्या चिंतनात गढून गेले. त्यांनी हातात जपमाळा घेतल्या आणि त्यांच्या कुलदेवतांच्या तीर्थस्थळी जाऊन त्यांनी गुडघे टेकून आणि मौल्यवान धूप जाळून त्यांच्या अंतःकरणातील इच्छा पूर्ण व्हावी म्हणून बुद्धदेवाची प्रार्थना केली. बरेच दिवस निघून गेले पण तरीही त्यांनी त्यांच्या घरी विश्रांती घेतली नाही.

म्हणून ते पुन्हा बांबूतोड्याच्या घरी गेले. ह्या वेळेला तो म्हातारा त्यांना भेटायला बाहेर आला, आणि त्यांनी त्याला विचारले की काहीही झाले तरीही कुणाही माणसाला भेटायचं नाही असा तिचा निश्चय आहे का, आणि त्यांनी त्याला कळकळीची विनंती केली की त्यांच्यावतीने त्याने तिच्याशी बोलून त्यांच्या प्रेमाची महती सांगावी. आणि उन्हातान्हात व थंडीवाऱ्यात, न झोपता निवाऱ्याविना ते तिची सर्व ऋतूंमध्ये अन्नपाण्याशिवाय, विना विश्राम तिला जिंकण्याची उत्कट इच्छा धरून तिची प्रतिक्षा करीत होते. तिच्यासमोर आपली बाजू मांडण्याची संधी मिळावी म्हणून त्यांनी विनंती केली.

त्या म्हाताऱ्याने सावधानतापूर्वक कान देऊन त्यांच्या प्रेमाची कहाणी ऐकली, कारण त्याच्या अंतरात्म्यापासून त्याला त्या एकनिष्ठ विवाहेच्छुकांबद्दल वाईट वाटले आणि पालनपोषण केलेल्या सुंदर कन्येचे लग्न त्यापैकी एकाशी लावून द्यावे असे त्याला वाटले. म्हणून तो राजकुमारी चंद्रप्रभेकडे गेला आणि भक्तिभावाने म्हणाला,

“तू स्वर्गातून आलेली आहेस हे नेहमीच जरी मला वाटत असले तरीपण माझ्या स्वतःच्या बाळाप्रमाणे तुझं पालनपोषण करताना मी खूप कष्ट घेतले आहेत. आणि तू माझ्या सुरक्षिततेच्या आश्रयाखाली अत्यंत सुखी राहिली. तरीही तू माझ्या इच्छेप्रमाणे करायला नकार देशील?”

राजकुमारी चंद्रप्रभाने उत्तर दिले की त्याच्यासाठी करू शकणार नाही अशी कोणतीही गोष्ट नाही, कारण तिने तिच्या पित्याप्रमाणे त्याचा आदर केला व त्याच्यावर प्रेम केले होते. आणि तिला स्वतःलाच आठवत नव्हते की पृथ्वीवर येण्यापूर्वीचा काळ कसा होता.

त्या म्हाताऱ्याने मोठ्या आनंदाने तिचे कर्तव्यदक्षतापूर्ण शब्द ऐकले. नंतर तिला सांगितले की तो मरण्यापूर्वी तिला सुरक्षित आणि सुखी वैवाहिक जीवन जगताना पाहण्यास किती उत्सुक होता.

"मी म्हातारा आहे, सत्तरी ओलांडली आहे, आणि माझा शेवट कोणत्याही क्षणी होऊ शकतो. ह्या पाच विवाहेच्छुंना तू बघावे आणि त्यापैकी एकाची निवड तू करावी हे आवश्यक आणि यथार्थ आहे."

"अहो, पण का," व्यथित होत राजकुमारी म्हणाली, "मला हे करायलाच हवं का? मला आता विवाह करायची इच्छा नाही."

"तू मला गवसली आहेस," म्हाताऱ्याने उत्तर दिले, " खूप वर्षांपूर्वी शुभ्र प्रकाशात, तीन इंचाची अगदी लहानशी होतीस तू. बांबूतून पाझरणाऱ्या प्रकाशझोतात तू स्वतःला लपवून मला आकृष्ट केले होते. म्हणून मी नेहमी विचार करायचो की मर्त्य स्त्रीपेक्षा तू अधिक काहीतरी आहेस. जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत तुला जसं आवडेल तसं तू वागू शकतेस, पण काही दिवसांनंतर मी मेलो तर तुझी काळजी कोण घेणार? ह्या कारणास्तव मी तुला विनंती करतो की ह्या पाचही शूर माणसांना तू भेट आणि एकाशी विवाह करायचे मनावर घे!"

राजकुमारीने उत्तर दिले की तिला खात्री होती की पसरलेल्या वार्तेइतकी काही कदाचित ती दिसायला सुंदर नसेल आणि त्यांची ओळख नसतानाही त्यांच्यापैकी एकाशी विवाह करायची जरी संमती दिली तरी कदाचित नंतर त्याच्या मनात बदल होऊ शकतो. म्हणून तिला त्यांच्याबाबतीत खात्री वाटत नव्हती, जरी तिच्या पित्याने

सांगितले की ते सरदार अनुरूप आहेत तरी त्यांना भेटणं तिला शहाणपणाचं वाटतं नव्हतं.

"तू जे सर्व काही बोललीस ते अगदी योग्य आहे," म्हातारा म्हणाला, "मग कोणत्या प्रकारच्या माणसाला तू पहायची संमती देशील? आनंदाने महिने नि महिने तुझी वाट पाहणाऱ्या ह्या पाचही माणसांना काही मी बोलाविले नाही. ते तुला जिंकण्यासाठी घराच्या बाहेर थंडीवाऱ्यात, उन्हापावसात अनेकदा अन्नाशिवाय उपाशी राहत तुझी वाट पहात होते. आणखी तू काय अपेक्षा करू शकतेस?"

नंतर राजकुमारी चंद्रप्रभाने म्हटले की त्यांना दर्शन देण्यापूर्वी त्यांना प्रेमाची परीक्षा द्यावी लागेल, त्या पाचही योद्ध्यांनी ज्याकाही गोष्टी मला हव्यात त्या गोष्टी दूरवरच्या देशातून आणून देऊन माझ्यावरील प्रेमाचा पुरावा द्यावा.

त्याच दिवशी सायंकाळी ते विवाहेच्छुक तेथे आले आणि आळीपाळीने बासरी वाजवू लागले आणि आपल्या गाढ आणि अविश्रांत प्रेमाची महती स्वरचित गीतांमधून सांगू लागले. बांबूतोड्या, त्याने जतन केलेल्या मुलीला जिंकण्याची इच्छा करणाऱ्यांच्या सोशिकपणे दाखविलेल्या सहनशीलतेला सहानुभूती दाखविण्यासाठी बाहेर गेला. नंतर त्याने तिचा निरोप त्यांना दिला की, जो कोणी तिला हवी असलेली वस्तू आणून देण्यात यशस्वी होईल त्याच्याशी ती विवाह करण्यास संमती देईल. हीच त्यांची परीक्षा होती.

सर्व पाचांनी कसोटी स्वीकारली आणि उत्कृष्ट योजना आखण्याचा विचार केला, कारण त्यामुळे त्यांच्या आपापसातील मत्सराला आळा बसू शकणार होता.

राजकुमारी चंद्रप्रभेने मग पहिल्या सरदाराला निरोप पाठविला की तिची त्याला अशी विनंती होती की त्याने तिच्यासाठी शिलापात्र आणावे जे भारतात बुद्धाच्या मालकीचे होते.

दुसऱ्या सरदाराला सांगितले गेले की पूर्वेच्या सागरावर वसलेल्या होराई पर्वतावर जाऊन त्याच्या शिखरावर वाढलेल्या अद्‌भूत वृक्षाची फांदी आणावी. त्या

वृक्षाची मुळे चांदीची असून खोड सोन्याचे आणि फांद्यांना श्वेतवर्णी हिरे लगडलेले आहेत.

तिसऱ्या सरदाराला सांगितले गेले की चीनमध्ये जाऊन अग्निमूषकाला शोधायचे आणि तिच्यासाठी त्याची कातडी आणायची.

चवथ्या सरदाराला सांगितले गेले की त्याने जाऊन एका मोठ्या नागाचा शोध घ्यायचा ज्याच्या डोक्यावर एक मणी असून त्या मण्यातून पाच रंगांची किरणे बाहेर पडतात, तो मणी तिला आणून द्यावा.

पाचव्या सरदाराला सांगितले गेले की असा एक पाकोळी पक्षी आहे की ज्याच्या पोटात शिंपला आहे आणि तो शिंपला तिच्यासाठी आणून द्यायचा.

म्हाताऱ्याला ही सारी कामे खूप कठीण वाटली आणि हा निरोप त्यांच्याकडे नेऊन देण्यात तो का-कू करू लागला, पण राजकुमारीने इतर कुठलीही अट घातली नव्हती. म्हणून जेव्हा तिचा आदेश शब्दशः त्या पाचही जणांना दिला गेला तेव्हा ते तिच्या अशक्यप्राय मागण्या ऐकून हताश झाले आणि त्यांना त्याबद्दल घृणा वाटली. आणि ते निराश होऊन त्यांच्या घरी परत गेले.

पण काही वेळानंतर जेव्हा ते राजकुमारीबद्दल विचार करू लागले तेव्हा तिच्यासाठी त्यांच्या हृदयात पुन्हा प्रेमाची ज्योत पेटली. आणि तिच्या इच्छापूर्तीसाठी प्रयत्न करण्याचा निश्चय करायचे त्यांनी ठरविले.

पहिल्या सरदाराने राजकुमारीला निरोप पाठविला की तो त्याचदिवशी बुद्धाच्या शिलापात्राच्या शोधात निघत आहे आणि त्याने अशी आशा केली की लवकरच तो ते तिच्यासाठी आणेल. पण भारतभर प्रवास करण्याचे तेवढे धारिष्ट्य त्यात नव्हते. कारण त्याकाळी प्रवास करणं खूप कठीण आणि धोक्याचे होते म्हणून तो क्योतोच्या मंदिरांपैकी एका मंदिरात गेला आणि त्याने धर्मगुरूला विपुल धनराशी देऊन त्याच्याकडून शिलापात्र विकत घेतले. नंतर त्याने ते सुवर्णवस्त्रात गुंडाळले आणि तीन वर्षे थांबून तो परतला आणि त्याने ते म्हाताऱ्याला नेऊन दिले.

राजकुमारी चंद्रप्रभेला तो सरदार इतक्यात परतलेला पाहून आश्चर्य वाटले. तिने सुवर्णवस्त्रात गुंडाळलेले ते पात्र बाहेर काढले, ह्या अपेक्षेने की तिला वाटले की त्याच्या प्रकाशाने खोली भरून जाईल, पण ते प्रकाशले नाही. तिला कळले की ते खरे नसून नकली वस्तू होती, बुद्धाचे पात्र नव्हते. तिने ते तात्काळ परत केले आणि त्याला भेटायचे नाकारले. त्या सरदाराने ते पात्र फेकून दिले आणि निराश होऊन तो घरी परतला. आता राजकुमारीला प्राप्त करण्याच्या सगळ्या आशा त्याने सोडून दिल्या.

दुसऱ्या सरदाराने त्याच्या आईवडिलांना सांगितले की आरोग्यासाठी हवाबदल म्हणून तो त्यांना सोडून जात आहे. कारण राजकुमारी चंद्रप्रभेवरील प्रेम व्यक्त करण्यात त्याला लाज वाटत होती. नंतर त्याने त्याचे घर सोडले, त्याचवेळी त्याने राजकुमारीला निरोप पाठविला की तिला हवी असलेली सोन्याचांदीची फांदी मिळविण्यासाठी तो पर्वत होराईकडे जात आहे. त्याने त्याच्या नोकरांना फक्त अर्ध्या वाटेपर्यंत सोबतीला येऊ दिले आणि नंतर त्यांना परत पाठविले. तो समुद्रकिनाऱ्यावर पोहोचला व एका छोट्या जहाजात बसला आणि तीन दिवस जलप्रवास केल्यानंतर तो जमिनीवर उतरला आणि त्याने बऱ्याच शिल्पकारांना कामाला नेमले आणि त्यांच्याकडून अशा युक्तीने एक घर बांधून घेतले की ज्याचा मार्ग कोणालाही शोधून सापडणार नाही. नंतर त्याने स्वतःला सहा कुशल जवाहिऱ्यांसोबत कोंडून घेतले आणि राजकुमारीला खूष करण्यासाठी होराई पर्वतावर उगवलेल्या सोन्या-चांदीच्या झाडाची अद्भूत फांदी बनविण्याचा प्रयत्न केला. ज्या कुणाला त्याने विचारले त्या प्रत्येकाने ठामपणे असे सांगितले की पर्वत होराई हा दंतकथेतील पर्वत असून तो वास्तवात नाही.

जेव्हा फांदी बनवून झाली, तेव्हा त्याने घराकडच्या प्रवासाला सुरुवात केली आणि चेहऱ्यावर असा भाव आणला की जणूकाही तो प्रवासात खूप दमलेला आहे. त्याने लाखेचे रोगण लावलेल्या पेटीत रत्नांची फांदी ठेवून राजकुमारीला सादर करण्याची बांबूतोड्याला विनंती केली.

प्रवासाने मलिन झालेले त्या सरदाराचे रूप पाहून तो म्हाताराही पुरता फसला, आणि त्याने विचार केला की तो नुकताच ती फांदी घेऊन त्याच्या दीर्घ प्रवासाहून परतला होता. म्हणून त्याने राजकुमारीचे मन वळवून त्याला भेटण्याची

अनुमती मिळविण्याचा प्रयत्न केला. पण ती स्तब्ध राहिली आणि खूप दुःखी दिसली. त्या म्हाताऱ्याने ती फांदी काढायला सुरुवात केली आणि संपूर्ण देशात हे अद्भूत व मौल्यवान रत्न कोठे सापडणार नाही म्हणून कौतुक केले. नंतर तो सरदाराविषयी बोलू लागला की तो किती सुंदर आहे आणि होराई पर्वतासारख्या अति दूर ठिकाणी प्रवास करण्याची जबाबदारी त्याने घेतली म्हणून तो किती शूर आहे अशी त्याची स्तुती केली.

राजकुमारी चंद्रप्रभेने ती फांदी हातात घेतली आणि काळजीपूर्वक तिच्याकडे बघितले. नंतर तिने तिच्या सांभाळ करणाऱ्या पित्याला सांगितले की होराई पर्वतावर उगवलेल्या सोन्याचांदीच्या झाडाची फांदी इतक्या जलद आणि सहजगत्या प्राप्त करणे हे माणसाला अशक्यप्राय आहे, आणि मोठ्या दुःखाने तिला सांगावेसे वाटले की ती फांदी कृत्रिम आहे असा तिचा विश्वास होता.

म्हातारा मग अपेक्षा करणाऱ्या सरदाराकडे गेला, जो आता घरापर्यंत पोहोचला होता, आणि ती फांदी त्याला कोठे मिळाली ह्याबद्दल म्हाताऱ्याने त्या सरदाराला विचारले. मग त्या माणसाने काहीही लाज न धरता एक दीर्घ गोष्ट बनविली.

“दोन वर्षांपूर्वी मी एक छोटे जहाज घेतले आणि होराई पर्वताच्या शोधार्थ निघालो. वायुपेक्षाही अधिक गतीने काही काळ गेल्यावर मी दूरस्थ पूर्वेकडील सागरावर पोहोचलो. नंतर खूप मोठे वादळ आले आणि मी बरेच दिवस दिशाहीन भटकत होतो आणि शेवटी आम्ही वाऱ्याबरोबर अज्ञात बेटावर वाहत गेलो. तेथे राक्षसांची वस्ती आढळून आली, ज्यांनी मारून खाऊन टाकण्याची भीती दाखविली. तथापि मी त्या भयंकर प्राण्यांशी मैत्री केली आणि त्यांनी नौका दुरूस्त करण्यात नावाड्यांना मदत केली आणि मी पुन्हा जलप्रवासास सुरूवात केली. आमचा अन्नपुरवठा संपला आणि आम्ही नावेतच आजारी पडलो. शेवटी पहिल्या दिवसापासून पाचशेव्या दिवशी मी दूर क्षितिजावर पर्वतशिखरासारखे पाहिले. जवळ पोहोचल्यावर ते बेट आहे असे दिसून आले आणि त्याच्या मध्यभागी एक पर्वत उभा दिसला. दोनतीन दिवसांच्या भ्रमंतीनंतर मला दिसले की समुद्रकिनाऱ्याकडून

माझ्याकडे एक चमकणारा प्राणी येत होता आणि त्याच्या हातात सोनेरी पात्र होते. मी त्याच्या जवळ गेलो आणि त्याला विचारले की पर्वत होराईचे बेट तर नाही ना सुदैवाने सापडले? आणि तो उत्तरला,

"होय, हा पर्वत होराईच आहे!"

"मोठ्या प्रयासाने मी ते शिखर चढलो, जमिनीत चांदीची मुळे असलेला तो सोनेरी वृक्ष तेथे उभा होता. त्या विचित्र प्रदेशात चमत्कार खूप होते आणि जर मी त्याबद्दल तुम्हाला सांगायला लागलो तर मी कधीच थांबू शकणार नाही. फांदी तोडल्यानंतर माझी तेथे खूप काळ रहायची इच्छा असूनही मी तेथे थांबलो नाही. मी घाईने परतलो. पराकाष्ठेच्या वेगाने मी आलो तरी मला परतायला चारशे दिवस लागले. आणि तुम्ही पाहतच आहात की समुद्राच्या त्या जलप्रवासात माझे कपडे अजूनही तसेच ओले आहेत. कपडे बदलेपर्यंतही मला राहवले गेले नाही, इतका मी राजकुमारीला ती फांदी आणून देण्यात उत्सुक होतो."

त्याच क्षणाला ते जवाहिरे, ज्यांना ती फांदी बनविण्यासाठी कामाला ठेवले गेले होते पण अजूनही सरदाराकडून त्यांना त्यांच्या कामाच्या मजुरीचे पैसे दिले गेले नव्हते, ते त्या घरी आले आणि त्यांनी राजकुमारीला लिहिलेल्या विनंतीअर्जात लिहिले होते की त्यांच्या मजुरीचे पैसे मिळावेत. ते म्हणाले की आत्ता जी चांदीच्या डहाळ्या व रत्नांच्या फळांनी लगडलेली सोन्याची फांदी तिला सादर केली गेली, ती बनविण्यासाठी त्यांनी एक हजार दिवस परिश्रम केले. पण अजूनही त्यांना त्यांच्या मजुरीचे पैसे मिळाले नव्हते. अशा रितीने ह्या सरदाराची लबाडी उघडकीस आली आणि राजकुमारीला त्या आग्रही विवाहार्थीकडून सुटका झाल्याने आनंद होऊन तिने मोठ्या संतोषाने ती फांदी परत केली. तिने त्या कामगारांना आत बोलाविले आणि त्यांना उदारहस्ते त्यांच्या मजुरीचे पैसे दिले आणि ते आनंदाने निघून गेले. पण घराकडे जाताना त्यांची त्या निराश सरदाराशी गाठ पडली तेव्हा त्याचे गुपित फोडल्याबद्दल त्याने त्यांना बेदम मारले आणि ते कसेबसे आपला जीव वाचवून पळाले. सरदार नंतर घरी परतला, त्याच्या अंतःकरणात त्वेष होता. राजकुमारीला

जिंकण्यात यश न आल्यामुळे तो हताश होऊन समाजाला सोडून एकांतवासात जीवन घालविण्यासाठी पर्वतांमध्ये निघून गेला.

आता तिसऱ्या सरदाराचा चीनमध्ये एक मित्र होता. म्हणून त्याने त्याला लिहिले की अग्निमूषकाची कातडी मिळव. त्या प्राण्याच्या शरीराच्या कुठल्याही भागाला अग्नि इजा करू शकत नव्हता, असा त्याचा गुणधर्म होता. ही इच्छिलेली गोष्ट प्राप्त करण्यासाठी तो कितीही किंमत मोजू शकत होता. ज्या जहाजावरून त्याचा मित्र जलपर्यटन करीत होता तो त्या बंदरावर आला. त्याच्याकडून जशी बातमी मिळाली तसा त्याने सात दिवस घोड्यावरून प्रवास केला. त्याने त्याच्या मित्राला मोठी रक्कम दिली आणि अग्निमूषकाची कातडी मिळवली. जेव्हा तो घरी पोहोचला तेव्हा त्याने ती काळजीपूर्वक एका पेटीत ठेवली आणि राजकुमारीकडे ती पाठवून तिच्या उत्तराची वाट पाहत बाहेर उभा राहिला.

बांबूतोड्याने त्या सरदाराकडून ती पेटी घेतली आणि नेहमीप्रमाणे राजकुमारीकडे नेऊन सरदाराला भेटण्यासाठी तिचे मन तात्काळ वळविण्याचा प्रयत्न केला. पण राजकुमारी चंद्रप्रभेने असे म्हणत नकार दिला की आधी ती कातडी अग्नीवर ठेवील. जर ती खरी वस्तू असेल तर ती जळणार नाही. म्हणून तिने रेशमी वेष्टन काढले आणि पेटी उघडून ती कातडी आगीत टाकली. तड् तड् करीत ती कातडी ताबडतोब जळाली आणि राजकुमारीला कळले की ह्या सरदाराने सुद्धा तिचा शब्द पूर्ण केला नाही. म्हणून तिसरा सरदार सुद्धा अपयशी ठरला.

आता चौथा सरदार उर्वरित सरदारांपेक्षा फार धाडसी नव्हता. पाच रंगांची चमकणारी रत्ने ज्याच्या शिरावर आहेत अशा पंखपक्षी नागाच्या शोधात बाहेर पडण्याऐवजी त्याने आपल्या सर्व सेवकांना एकत्र बोलाविले आणि त्यांना जपान आणि चीनच्या दूर दूर निर्जन प्रदेशात जाऊन त्याला शोधण्याचा हुकूम सोडला आणि तो सापडेपर्यंत कुणीही परत येऊ नये अशी सक्त ताकीद दिली.

त्याचे असंख्य नोकर आणि चाकर निरनिराळ्या दिशेला निघाले. पण मनात कोणताही उद्देश न बाळगता, तथापि त्यांनी त्याची आज्ञा पाळली होती व त्याची

मागणी अशक्य आहे असे गृहीत धरले होते. त्यांनी फक्त रम्य अशा प्रदेशात विश्रांती घेतली आणि त्यांच्या मालकाच्या गैरवाजवीपणाबद्दल कुरकुर केली.

दरम्यानच्या काळात त्याने विचार केला की त्याचे नोकर मणिरत्न आणण्यात नक्कीच अयशस्वी होणार नाहीत. त्याने त्याचे घर दुरूस्त करून सुसज्ज केले, राजकुमारीच्या स्वागत समारंभाची तयारी केली. कारण त्याला वाटले की राजकुमारीला आपण नक्कीच जिंकू.

एक वर्ष संपले, तो वाट पाहून पाहून थकून गेला आणि तरीही त्याची माणसे नागमणी घेऊन परतली नाहीत. तो सरदार अतिशय उद्विग्न झाला. तो फार काळ त्यांची वाट पाहू शकला नाही. म्हणून त्याने फक्त दोन माणसे घेतली आणि एक जहाज भाड्याने घेऊन कप्तानाला त्या नागाच्या शोधार्थ निघायचा आदेश दिला. कप्तान आणि त्या खलाशांना हा शोध मूर्खपणाचा वाटला आणि त्यांनी हे काम करण्यास नकार दिला. पण सरदाराने त्यांना सक्ती केली आणि ते समुद्रात शिरले.

थोड्या दिवसांनी ते एका झंझावाती वादळात सापडले. ते वादळ खूप काळ टिकले. जेव्हा त्या वादळाचा प्रकोप कमी झाला तेव्हा त्या सरदाराने त्या नागाची शिकार करण्याचे सोडून द्यायचे ठरविले. शेवटी ते समुद्रकिनाऱ्यावर वाहत आले. कारण त्या काळात नौकानयन एवढे विकसित नव्हते. प्रवास आणि चिंतेने तो एकदम थकून गेला. त्या सरदाराने विश्रांती घ्यायचे सोडून दिले. त्याला खूप थंडी भरून आली आणि सुजलेल्या चेहऱ्याने तो अंथरूणावर पडला.

त्या ठिकाणच्या राज्यपालाने त्याची दुर्दशा ऐकून दूतांबरोबर त्याला निमंत्रण पत्रक पाठवून घरी बोलाविले. त्याने जेव्हा त्याच्यावरील संकटांचा विचार केला तेव्हा त्याचे राजकुमारीवरील प्रेमाचे रूपांतर रोषात झाले. त्याच्या ज्या हालअपेष्टा त्याला सहन कराव्या लागल्या त्याबद्दल त्याने राजकुमारीला दोषी ठरविले. त्याने असा विचार केला की बहुधा पूर्णपणे त्याला मारण्याची तिची इच्छा असावी. जेणेकरून त्याच्यापासून तिची सुटका व्हावी, आणि तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याला अशा अशक्य दीर्घ शोधाला पाठविले.

ह्या मुद्द्यावर जी माणसे त्याने रत्नाचा शोध घेण्यास पाठविली होती, ती माणसे त्याला भेटावयास आली आणि त्यांची वाट पाहावी लागल्यामुळे राग करण्याऐवजी त्याने त्यांची स्तुती केली तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. त्यांच्या मालकाने त्यांना सांगितले की त्या धाडसाचा त्याला उबग आला आणि म्हणाला की त्याने असे ठरविले की भविष्यात कधीही तो त्या राजकुमारीच्या घराजवळ पुन्हा जाणार नाही.

सर्वांसारखेच उरलेला पाचवा सरदारही शोधात अयशस्वी झाला. त्याला पाकोळी पक्ष्याचा शंख सापडला नाही. ह्या काळात राजकुमारी चंद्रप्रभेच्या लावण्याची प्रसिद्धी सम्राटाच्या कानावर गेली आणि त्याने दरबारातील एका स्त्रीला तिच्याकडे पाठवून ती राजकन्या वृत्ताप्रमाणे खरोखरच इतकी सुंदर आहे का हे पडताळण्यास सांगितले. तशी ती असल्यास तिची प्रतिक्षा करणाऱ्या स्त्रीकडे येण्यासाठी तिला हुकूम सोडला.

जेव्हा राजदरबारातील स्त्री तेथे पोहोचली तेव्हा तिच्या पित्याने विनवणी करूनही ती न ऐकता राजकुमारी चंद्रप्रभेने तिला भेटण्यास नकार दिला. हा सम्राटाचा हुकूम आहे असे म्हणत सम्राटाच्या दूताने आग्रह केला. राजकुमारी चंद्रप्रभेने सांगितले की सम्राटाच्या हुकूमाची आज्ञा पाळून राजवाड्यात जाण्याची जर तिला सक्ती केली गेली तर ती पृथ्वीवरून गुप्त होईल.

जेव्हा सम्राटाला त्याच्या हुकूमाची आज्ञा न मानण्याच्या तिच्या हट्टाबद्दल, आणि जर आज्ञापालनाचे तिच्यावर दडपण आणले गेले तर ती पूर्णतया अदृश्य होईल असे सांगितले गेले, तेव्हा त्याने स्वतः जाऊन तिला भेटण्याचे ठरविले. म्हणून त्याने त्या बांबूतोड्याच्या घराजवळ शिकार खेळायचे निमित्त करून राजकुमारीला प्रत्यक्ष भेटण्याची योजना आखली. म्हाताऱ्याला त्याने आपला हेतू कळविला आणि त्याच्या योजनेला संमती मिळवली. दुसऱ्या दिवशी आधीच बाहेरच्या स्वारीसाठी तयारी करून सम्राट त्याच्या लवाजम्यासह निघाला. त्याला बांबूतोड्याचे घर सापडले आणि तो घोड्यावरून खाली उतरला. नंतर तो सरळ घरात घुसला आणि जेथे राजकुमारी तिच्या कुमारिका दासीबरोबर बसली होती तेथे गेला.

असं लावण्य त्याने आजपर्यंत कुठेही पाहिलं नव्हतं, तो फक्त तिच्याकडे बघत राहिला. ती सौम्य तेजात तळपत होती, असं सौंदर्य त्याने कुठल्याही मानवी प्राण्यात बघितलं नव्हतं. जेव्हा चंद्रप्रभेला कळले की तिच्याकडे एक परकी व्यक्ती बघत आहे तेव्हा तिने त्या खोलीतून पलायन करण्याचा प्रयत्न केला. पण सम्राटाने तिला पकडले आणि तो काय म्हणतो हे ऐकून घेण्याची त्याने तिला विनंती केली. पण बाह्यांमध्ये तोंड लपवणं हेच तिचं उत्तर होतं.

सम्राट तिच्या अतिशय गाढ प्रेमात पडला आणि त्याने तिला दरबारात येण्याची विनंती केली. तेथे त्याने तिला सन्मानाची जागा, तिची जी इच्छा असेल ते देऊ केले आणि म्हटले की तिचे लावण्य आणि सौंदर्य दरबाराची शोभा वाढवील, बांबूतोड्याच्या झोपडीत नव्हे. आणि तिला ताबडतोब आणण्यासाठी बादशाही पालखी पाठवली.

पण राजकुमारीने त्याला थांबविले. ती म्हणाली की जर राजवाड्यात जाण्याविषयी तिला जबरदस्ती केली तर तिचे रूपांतर छायेत होईल. आणि असे म्हणत नाही तोच तिचं रूप तिने कलेकलेने कमी करायला सुरूवात केली. जेव्हा त्याने पाहिले तेव्हा तिची आकृती त्याच्या दृष्टी पुढून नाहीशी झाली.

सम्राटाने आश्वासन दिले की ती तिच्या पूर्वीच्या रूपात आली तर तो तिला मुक्त करेल. आणि तिने तसे केले. आता त्याची परतायची वेळ झाली होती. कारण त्याचा लवाजमा, त्यांचा महाराज खूप वेळेपासून न आल्याने काय झाले असेल याचे आश्चर्य करीत त्यांना चुकल्या चुकल्या सारखे वाटत होते. म्हणून त्याने तिचा निरोप घेतला. आणि जड अंतःकरणाने तिचे घर सोडले. राजकुमारी चंद्रप्रभा त्याच्यासाठी जगातली सर्वात जास्त लावण्यवती स्त्री होती. बाकी सर्व तिच्यापुढे फिक्या होत्या आणि तो तिचा रात्रंदिवस विचार करू लागला. महाराज आता त्यांचा खूप वेळ तिच्यावरील प्रेम आणि भक्ती व्यक्त करणाऱ्या कविता लिहिण्यात घालवू लागले. जरी तिने त्याला पुन्हा भेटण्याचे नाकारले तरी त्याच्या कवितांना तिने स्वतः रचलेल्या काव्याने उत्तर दिले. त्यात तिने सौम्य व प्रेमळ शब्दात लिहिले होते की ह्या पृथ्वीवर मी कुणाशीही विवाह करू शकत नाही. ही लहानशी गीते त्याला नेहमी आनंद देत.

ह्या वेळी तिच्या पालक मातापित्यांच्या लक्षात आले की त्या रात्री आणि नंतरच्या रात्री राजकुमारी सज्जात बसायची आणि चंद्राकडे गंभीर आणि विषण्ण मनःस्थितीत अनिमिष नेत्रांनी बघत रहायची आणि अखेरीस निरंतर तिच्या अश्रूंचा बांध फुटायचा. एके दिवशी रात्री म्हाताऱ्याला आढळून आले की ती अशी काही रडते आहे की जणू काही तिचे काळीज फाटले आहे. त्याने तिची मनधरणी करीत तिच्या दुःखाचे कारण विचारले.

अनंत अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी तिने सांगितले की ती ह्या जगातली नाही. हे सत्य त्याने स्वीकारले होते ते हे, की ती चंद्राकडून आलेली होती आणि पृथ्वीवरील तिचा काळ लवकरच संपणार होता. त्याच ऑगस्ट महिन्याच्या पंधराव्या दिवशी चंद्रावरील तिचे मित्र तिला घेऊन जाण्यासाठी येणार आणि तिला परत जावेच लागणार होते. ती म्हणाली, तिच्या पालक मातापित्यांना आणि ज्या घरात ती खूप दिवस सुखात राहिली ते घर सोडून जाण्याचा विचार ह्यामुळे तिला रडू येत होते.

जेव्हा तिच्या नोकरांनी ते ऐकले तेव्हा त्यांना खूप दुःख झाले. राजकुमारी लवकरच त्यांना सोडून जाणार ह्या कल्पनेने त्यांनी खाणेपिणे सोडून दिले.

जेव्हा सम्राटाकडे ही बातमी पोहोचली तेव्हा हे वृत्त खरे आहे की खोटे हे जाणून घेण्यासाठी त्याने त्या घरी दूत पाठविले.

म्हातारा बांबूतोड्या राजदूतांना भेटण्यासाठी बाहेर आला. काही दिवसांपूर्वी त्या म्हाताऱ्याला हे दुःख सांगितले गेले होते. तो खूप म्हातारा झाला होता. तो सत्तर वर्षांचा होता पण त्याहूनही म्हातारा दिसत होता. रडत रडत त्याने त्यांना सांगितले की ते वृत्त अगदी तंतोतंत खरे आहे, पण तथापि त्याने असे ठरविले होते की चंद्रावरून येणाऱ्या त्या दूतांना कैदेत ठेवावे म्हणजे हे सारे केल्याने ते राजकुमारीला घेऊन जाण्यात तो मज्जाव करू शकेल.

ती माणसे महाराजांकडे गेली आणि जे घडले ते सारे त्यांनी सांगितले. पंधराव्या दिवशी सम्राटाने दोन हजार योद्ध्यांचे सुरक्षा पथक घरावर पहारा ठेवण्यासाठी पाठविले. एक हजार छपरावर थांबले, दुसऱ्या हजारांनी घराच्या प्रवेशद्वारावर पहारा ठेवला. सर्व प्रशिक्षित तिरंदाज होते. त्यांच्याजवळ धनुष्य आणि

बाण होते. बांबूतोड्या आणि त्याच्या बायकोने राजकुमारी चंद्रप्रभेला आतल्या खोलीत लपवून ठेवले.

त्या म्हाताऱ्याने हुकूम सोडला की त्या रात्री कुणीही झोपायचे नाही, घरातील सर्व लोकांनी सक्त नजर ठेवायची आणि राजकुमारीचे रक्षण करण्यासाठी तयार रहायचे. ह्या सर्व पूर्व दक्षता आणि सम्राटांच्या सशस्त्र लोकांची मदत पाहून त्याने अपेक्षा केली की चंद्रावरील दूतांचा प्रतिकार होईल व त्यांना परतवून लावले जाईल. मात्र राजकुमारीने त्याला सांगितले की ह्या सर्व तिला राखून ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजना निष्फळ होतील आणि जेव्हा तिची माणसे येतील तेव्हा त्यांचा हेतू साध्य करण्यात त्यांना कोणतीही गोष्ट प्रतिबंध करू शकणार नाही. सम्राटाची माणसे सुद्धा असमर्थ होतील. नंतर साश्रू नयनांनी ती म्हणाली की त्याला आणि त्याच्या बायकोला सोडून जाण्यात तिला खूप खूप वाईट वाटत आहे, त्यांच्यावर ती आईवडिलांसारखे प्रेम करायला शिकली होती. त्यांनी तिच्या ह्या पृथ्वीवरील जीवनादरम्यान त्यांच्या वृद्धापकाळातही तिच्यावर प्रेम आणि कृपेचा खूप वर्षाव केला होता, आणि शक्य असेल तर ती फेडू शकली असती.

हळूहळू रात्र होत चालली होती. आकाशात पुनवेचा सोनेरी चंद्र उगवला होता आणि निद्रिस्त जगाला कांचन प्रभेने व्यापून टाकीत होती. देवदार आणि बांबूच्या जंगलावर शांतीचे साम्राज्य पसरले होते, आणि छपरावर सहस्त्रावधी सशस्त्र सैन्य प्रतिक्षा करीत होते.

नंतर रात्र पहाटेकडे झुकत रूपेरी होऊ लागली होती आणि सर्वांना आशा वाटली होती की आता संकट टळले आणि काहीही झाले तरी राजकुमारी चंद्रप्रभा काही त्यांना सोडून जाणार नव्हती. नंतर चंद्राभोवती ढगाचे रूप रक्षकांना दिसले, त्या ढगाकडे पाहताना त्यांना दिसले की त्या ढगाने पृथ्वीकडे घरंगळत येण्यास सुरुवात केली होती. तो अधिकाधिक जवळ येत होता. भीतीयुक्त अंतःकरणाने प्रत्येकाने बघितले की त्याची दिशा घराकडे होती.

थोड्याच वेळात आकाश पूर्णपणे धूसर झाले, तोपर्यंत तो ढग जमिनीपासून दहा फूट वर घरावर तरंगत होता. ढगाच्या मध्यभागी एक उडता रथ उभा होता.

त्या रथात तेजस्वी प्राण्यांचा वृंद होता. त्यांच्यामध्ये राजासारखा दिसणारा व त्यांचा प्रमुख वाटणाऱ्याने रथाच्या बाहेर पाऊल टाकले आणि हवेत तोल सांभाळत त्याने म्हाताऱ्याला बाहेर बोलाविले.

"वेळ आलेली आहे," तो म्हणाला, "राजकुमारी चंद्रप्रभेला चंद्रावर परतायचे आहे, जेथून ती आली होती. तिने खूप मोठी चूक केली होती आणि त्याची शिक्षा म्हणून तिला येथे खाली काही काळ पाठविण्यात आले होते. आम्हाला ठाऊक आहे की तुम्ही राजकुमारीची किती छान काळजी घेतली. त्याबद्दल तुम्हाला बक्षिस दिलेले आहे, संपत्ती आणि सुबत्ता दिली आहे. आम्ही तुमच्यासाठी बांबूमध्ये सोने ठेवले आहे, ते तुला सापडेलच."

"वीस वर्षांपासून मी तिला जतन केले आहे आणि कधीही एकदाही ती गैर वागली नाही. त्यामुळे ज्या स्त्रीला तुम्ही शोधत आहात ती ही असूच शकत नाही." तो म्हातारा म्हणाला, "मी तुम्हाला विनंती करतो की अन्यत्र शोधा."

मग त्या दूताने मोठ्या आवाजात हाक मारून म्हटले,

"राजकुमारी चंद्रप्रभा, त्या जुनाट घरातून बाहेर ये, एक क्षणभरही येथे थांबू नको."

ह्या शब्दाबरोबर राजकुमारीच्या खोलीचा पडदा आपोआप हळूच सरकून खुला झाला आणि स्वतःच्याच तेजात चमकणारी, तळपणारी, अद्भूत लावण्याने परिपूर्ण राजकन्या प्रगट झाली.

त्या दूताने तिला पुढे नेऊन रथात बसविले, त्याने म्हाताऱ्याचे खोलवर दुःख आणि कणव पाहिली. ती त्याला सांत्वनपर अनेक शब्दाने बोलली आणि म्हणाली की त्याला सोडून जायची तिची इच्छा नव्हती आणि म्हणाली की तो जेव्हा जेव्हा चंद्राकडे पाहील तेव्हा तेव्हा त्याने तिचा विचार करावा.

बांबूतोड्याने तिच्या सोबत जाण्यासाठी विनंती केली पण त्याला तशी अनुमती मिळाली नाही. राजकुमारीने भरतकाम केलेले बाह्य वस्त्र काढून त्याला आठवण म्हणून भेटवस्तू म्हणून दिले.

चंद्रावरच्या एका मानवाने अद्‌भूतरम्य पंख असलेला कोट तिने परिधान करावा म्हणून उचलून धरला, दुसऱ्याने तिला दीर्घायुष्य प्राप्त होईल अशा दिव्य

औषधाने पूर्ण भरलेली कुपी राजकुमारीला पिण्यासाठी दिली. ती ते थोडेसे प्यायली आणि उर्वरीत ती त्या बांबूतोड्याला देऊ लागली पण तसे करण्यास तिला प्रतिबंध घालण्यात आला.

पंख असलेला पोषाख तिच्या खांद्यावर घातला जाणार इतक्यात ती म्हणाली, "थोडसं थांबा, मला सम्राटासारख्या चांगल्या मित्राला विसरायला नकोच. जोपर्यंत मी मानवाच्या रूपात आहे तोपर्यंत त्याला एकदा पत्र लिहून त्याचा निरोप घ्यायला हवा."

दूताचा आणि रथाच्या सारथ्याचा उतावीळपणा तसाच बाजूला ठेवून पत्र लिहीपर्यंत तिने त्या दूताला तिष्ठत ठेवले. तिने लिहीलेल्या पत्राबरोबर जीवनामृताची कुपी ठेवली आणि बांबूतोड्याजवळ ती देत सम्राटाकडे नेऊन द्यायला तिने त्याला विनंती केली.

नंतर त्या रथाने आकाशाकडे चंद्राच्या दिशेने जायला सुरुवात केली. त्या सर्वांनी साश्रूनयनांनी मागे जाणाऱ्या राजकुमारीकडे अनिमिष नेत्रांनी बघितले. पहाट झाली, दिवसाच्या गुलाबी प्रकाशात चंद्ररथ आणि त्यातील सर्वजण त्या मुलायम ढगात सकाळच्या वाऱ्याच्या पंखावर आकाशात तरंगत गेले.

राजकुमारी चंद्रप्रभेचे पत्र राजवाड्यात सम्राटाकडे पोहोचविले गेले. राजे महाराजांना त्या जीवनामृत असलेल्या कुपीला स्पर्श करण्याची भीती वाटली म्हणून त्याने ते पत्र आणि ती अमृताची कुपी त्या प्रदेशातील सर्वात उंच आणि पवित्र पर्वताच्या शिखरावर पाठवून दिले. सूर्योदयाचे वेळी फुजी पर्वताच्या शिखरावर जाऊन राजदूतांनी ते जाळून टाकले. म्हणून आजही लोक म्हणतात की तो धूर अजूनही फुजी पर्वताच्या शिखरामधून निघून ढगाकडे जाताना दिसतो.

* * * * *

मात्सुयामाचा आरसा

प्राचीन जपानची गोष्ट

फार फार वर्षांपूर्वी प्राचीन जपानमधील प्रांतात दूरवरच्या जपानच्या एका भागात ह्या दिवसातही, एक माणूस आणि त्याची पत्नी राहत होती. ही गोष्ट जेव्हा सुरू होते तेव्हा काही वर्षांपूर्वीच त्यांचा विवाह झालेला होता आणि देवाच्या कृपेने त्यांना एक लहानशी मुलगी होती. ती म्हणजे त्या दोघांच्या जीवनातला आनंद आणि अभिमान होता. आणि तिच्यात त्यांनी म्हातारपणासाठी हा अमर्याद आनंदाचा स्त्रोत साठवून ठेवला होता.

तिच्या बाळपणापासून ती कशी मोठी होत गेली त्या सोनेरी दिवसांचे स्मरण निरखिले गेले होते. त्यांच्या कुटुंबाच्या कुलदैवताच्या अनुग्रहाखाली ठेवण्यास मंदिरात गेली होती तेव्हा ती फक्त तीस दिवसांची होती आणि तेव्हा तिच्या स्वाभिमानी आईने समारंभाचे वेळी घालतात तो किमोनो पोषाख घातला होता. जेव्हा आईवडिलांनी तिच्या पहिल्या बाहुल्यांच्या उत्सवात बाहुल्यांचा संच आणि त्यांच्या बारिकसारीक वस्तू, त्याचबरोबर एकापाठोपाठ एक येणाऱ्या वर्षी दिल्या आणि कदाचित सर्वात महत्त्वाच्या प्रसंगी म्हणजे तिच्या तिसऱ्या वाढदिवसाच्या दिवशी O B I (गुंफलेला रूंद कंबरपट्टा) लालजर्द व सोनेरी कंबरपट्टा तिच्या इवल्याशा कमरेभोवती गुंडाळला गेला म्हणजे ती बालिका वयाचा उंबरठा ओलांडून शैशव मागे टाकल्याची खूण प्रदर्शित झाली. आता ती सात वर्षांची झाली होती. आणि ती बोलायला शिकली होती. अनेक छोट्या छोट्या युक्त्यांनी तिच्या आवडत्या आईवडिलांच्या काळजाचा तुकडा बनली होती. त्यांच्या आनंदाचा पेला संपूर्णपणे भरून गेलेला दिसत होता. त्या बेटावरील सर्व साम्राज्यात त्या छोट्याशा कुटुंबाइतके सुखी कुटुंब शोधून सापडणे शक्य नव्हते.

एके दिवशी घरात खूप खळबळ माजली, कारण व्यापारासंबंधी वडिलांना कोर्टाने अचानक राजधानीला बोलविण्याचा हुकूम सोडला होता. ह्या काळात,

आगगाडी, ऑटोरिक्षा किंवा मोटारगाडीसारख्या जलद वाहनांच्या जमान्यात आपण

समजू शकतो की मात्सुयामा ते क्योतोपर्यंत प्रवास करणे किती कठीण आहे. रस्ते खडबडीत आणि वाईट, आणि सर्वसाधारण लोकांना रस्त्यावर प्रत्येक पावलाला चालावे लागायचे. मग ते अंतर शंभर मैल असो की कित्येक मैल असो. खरोखर त्या काळात राजधानीकडे जायचा हा प्रवास जपानी लोकांना आत्ताचा समुद्रपर्यटनाचा युरोपचा प्रवास वाटावा.

म्हणून त्याची बायको नवऱ्याच्या एवढ्या लांबच्या प्रवासाची तयारी करताना तो किती जिकिरीचा आहे ह्याबद्दल चिंताक्रांत झाली होती. त्याच्यासोबत जाण्याची तिने निरर्थक इच्छा व्यक्त केली. पण त्या मायलेकीसाठी ते अंतर खूपच मोठे होते. शिवाय एक पत्नी म्हणून घराची काळजी घेण्याच्या जबाबदारीची जाणीव तिला होतीच.

शेवटी सर्व तयारी झाली आणि तिचा पती त्याच्या छोट्याशा कुटुंबाच्या घोळक्यात द्वारमंडपामध्ये उभा होता.

“काही चिंता करू नकोस, मी लवकरच परत येईन,” तो माणूस म्हणाला, “जेव्हा मी लांब राहीन तेव्हा प्रत्येक गोष्टीची काळजी घे आणि विशेषतः आपल्या छोट्या मुलीची.”

“होय, आम्ही ठीक राहू, पण तुम्ही स्वतःची काळजी घ्यायलाच हवी. आणि परत येताना एका दिवसाचाही विलंब करू नका,” असे म्हणताना त्याच्या पत्नीच्या डोळ्यातून पावसाच्या धारांसारखे अश्रू वाहत होते.

ती लहान मुलगीच अशी एक होती की, तीच फक्त स्मितहास्य करीत होती. कारण ती सोडून जाण्याच्या दुःखापासून अजाण होती. आणि तिचे वडिल जसे नेहमी जात तसे जवळपासच्या एखाद्या खेड्याकडे पायी जाण्यात आणि राजधानीकडे जाण्यात तिला फारसा फरक वाटत नव्हता. ती त्याच्या कडेला पळाली आणि तिने त्याला क्षणभर थांबविण्यासाठी त्याची लांब बाही पकडली.

“पप्पा, मी छान राहीन आणि तुमच्या येण्याची वाट बघत राहीन. तरी कृपया मला एक भेटवस्तू आणा.” जेव्हा वडिलांनी जाताना वळून त्याच्या रडणाऱ्या पत्नीकडे आणि उतावळ्या स्मित करणाऱ्या मुलीकडे एक दृष्टिक्षेप टाकला तेव्हा त्याला वाटले की जणूकाही कुणीतरी त्याचे केस धरून मागे सारखे खेचते आहे कारण ते पूर्वी कधीही वेगळे झाले नव्हते. पण त्याला माहित होतं की त्याला जाणं भाग होतं कारण बोलावणं निकडीचं होतं. मोठ्या सायासाने त्याने विचार करणे थांबविले आणि दृढनिश्चयाने तो खाली बागेच्या दरवाजाकडे गेला आणि प्रवेशद्वारातून बाहेर खाली गेला. त्याच्या पत्नीने मुलीला कडेवर घेतले आणि प्रवेशद्वाराकडे जितके लांब जाता येईल तितके लांब ती पळत गेली आणि खाली देवदार वृक्षांमधील रस्त्यांवर जाईपर्यंत, आणि तो लांब लांब जाऊन धूसर होईपर्यंत ती त्याला न्याहाळत होती आणि आता तर फक्त त्याची जुन्या पद्धतीची टोकदार हॅट दिसेपर्यंत बघत होती, आणि शेवटी ती सुद्धा दिसेनाशी झाली.

“आता वडील गेले तुझे, ते परत येईपर्यंत तू आणि मी सगळ्या गोष्टींची काळजी घ्यायला हवी,” घराकडे परत जाताना आई म्हणाली.

“होय मी खूप छान राहीन,” होकारार्थी मान डोलावित ती मुलगी म्हणाली, “आणि पप्पा घरी येतील तेव्हा कृपा करून त्यांना सांग की मी किती चांगली वागत होते, कदाचित ते मला भेटवस्तू देतील.”

“तुझे वडील तुला हवं ते नक्कीच आणतील, कारण मी त्यांना तुझ्यासाठी बाहुली आणायला सांगितली आहे. तू दररोज तुझ्या वडिलांचा विचार करायला हवा, आणि त्यांचा परतीचा प्रवास सुखरूप होईल अशी प्रार्थना करायला हवी.”

“हो, होय जेव्हा ते घरी परत येतील तेव्हा किती आनंद होईल मला,” ती मुलगी टाळ्या वाजवीत म्हणाली, आणि तिचा चेहरा आनंदाने उजळला होता. तिच्या

चेहऱ्याकडे पाहिल्यावर तिच्या आईचे प्रेम तिच्याविषयी अधिक द्विगुणित आणि गहिरे आणि गहिरे झाले होते.

नंतर तिने त्या तिघांसाठी हिवाळ्यात वापरायचे कपडे बनविण्याच्या कामास सुरुवात केली. तिने एक साधा सूत कातण्याचा चरखा व्यवस्थित लावला आणि विणकाम करण्यापूर्वी तिने धागे कातून घेतले. कामाच्या मध्यंतरात तिने मुलीला छोट्या छोट्या खेळांचे मार्गदर्शन केले आणि तिच्या देशातील जुन्या कथांचे वाचन कसे करायचे हे शिकविले. अशा रितीने तिच्या नवऱ्याच्या गैरहजेरीत व एकाकी दिवसात ती मनाला रिझवायची. जेव्हा शांत घरात वेळ असा झरझर निघून जात होता, तेव्हा तिच्या पतीने त्याचे सारे व्यवहार आटोपले आणि तो परतला.

ज्यांना तो माहित नव्हता अशा लोकांना तो ओळखू येणे खूप कठीण होते. तो दिवसेंदिवस प्रवास करीत होता, सर्व प्रकारच्या वातावरणातून तो संपूर्णपणे महिनाभर फिरत होता आणि उन्हातान्हातून फिरताना त्याची कातडी तांबूस तपकिरी झाली होती पण त्याच्या प्रिय पत्नीने आणि मुलीने मात्र त्याला एका दृष्टिक्षेपात ओळखले, त्याच्याकडे त्या दोघींनी पळत येऊन त्याच्या बाह्या पकडून त्याचे उतावीळपणे स्वागत केले. त्याला आणि त्याच्या पत्नीला एकमेकांनी सुस्थितीत पाहून खूप हर्ष झाला. खूप काळ गेला असे त्या सर्वांना वाटले. त्याच्या पत्नीने आणि मुलीने त्याचे काड्यांचे सँडल पायातून बंध सोडून काढण्यास मदत केली, त्याची मोठी छत्री आणि हॅट काढली गेली आणि तो गेल्यापासून बैठकीची खोली रिकामी होती त्यात ते जुने कुटुंब मध्यभागी बसल्याने भरून गेली.

जेव्हा ते पांढऱ्या चटईवर बसले तेव्हा वडिलांनी सोबत आणलेली बांबूची परडी उघडली आणि तीतून एक सुंदर बाहुली बाहेर काढली आणि चकचकीत खोक्यातून केक बाहेर काढले.

“इथे,” तो त्या लहान मुलीला म्हणाला, “भेटवस्तू तुझ्यासाठी. मी बाहेर असताना तू तुझ्या आईची आणि घराची काळजी घेतल्यासाठीचे हे पारितोषिक आहे.”

“खूप आभारी आहे,” असे म्हणत मुलगी नतमस्तक झाली आणि नंतर तिने मॅपलच्या झाडाच्या पानागत रूंद बोटांचा हात बाहेर काढून उतावीळपणे बाहुली आणि खोके घेतले. दोन्ही वस्तू राजधानीतून आल्या होत्या. इतक्या सुरेख वस्तू तिने पाहिल्याच नव्हत्या. तिला किती आनंद झाला होता ह्याचं वर्णन करण्यास कोणतेही शब्द कमी पडतील- जणूकाही आनंदाच्या भरात तिचे हृदय द्रवून गेले होते, तिला काहीच दिसत सुचत नव्हतं आणि ती आपले भान हरपून गेली होती.

पुन्हा त्या परडीकडे तो झेपावला आणि ह्यावेळेला त्याने एक चौकोनी लाकडी पेटी बाहेर काढली, ती काळजीपूर्वक लाल आणि पांढऱ्या दोरीने बांधलेली होती, त्याच्या बायकोच्या हातात ती देत तो म्हणाला, “आणि हे तुझ्यासाठी आहे.”

त्याच्या पत्नीने ती पेटी उचलून काळजीपूर्वक उघडली आणि एक मूठ जोडलेली धातूची चकती बाहेर काढली. तिची एक बाजू तेजस्वी, चकाकणाऱ्या बिलोरी काचेसारखी होती, आणि दुसऱ्या बाजूला देवदार वृक्षाच्या उठावदार आकृती व फटकाऱ्यांनी जिवंत वास्तव हुबेहूब कोरलेले होते. तिने तिच्या आयुष्यात कधीही अशी वस्तू बघितलेली नव्हती कारण ती इचिगोच्या ग्रामीण भागातच जन्मली आणि वाढली होती. तिने अनिमिष नेत्रांनी त्या चकाकणाऱ्या चकतीकडे पाहून मोठ्या आश्चर्याने वर पाहिले आणि स्वतःशीच म्हणू लागली, “ह्या गोल वस्तूत मी बघते आहे की कुणीतरी माझ्याकडे बघत आहे. हे काय दिलंत तुम्ही मला?”

तिचा नवरा हसला आणि म्हणाला, “का, तो तुझा स्वतःचाच चेहरा आहे जो तू बघते आहेस. मी जे काही तुला आणले आहे त्याला आरसा म्हणतात, आणि जो कुणी त्याच्या सुस्पष्ट पृष्ठभागात बघतो त्याचं स्वतःचं रूप तिथे प्रतिबिंबित होते. जरी तेथे ही वस्तू आढळून येत नसली तरी फार प्राचीन काळापासून त्याचा वापर राजधानीत होत होता. तेथे आरसा बाळगणे हे स्त्रियांसाठी अतिशय गरजेचे मानले जायचे. एक जुनी म्हण आहे की ‘तलवार ही सामुराईचा आत्मा आहे तसाच आरसा हा स्त्रीचा आत्मा आहे’ आणि लोकप्रिय प्रथेप्रमाणे स्त्रीचा आरसा म्हणजे तिच्या

स्वतःच्या हृदयाची निदर्शक आहे- जर ती तो चकचकीत आणि स्वच्छ ठेवेल तसेच तिचे हृदय शुद्ध आणि छान असेल. सम्राटाच्या खजिन्यातील ते एक सन्मान चिन्हाचे रूप आहे. म्हणून तू तुझ्या आरशाला अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणून अतिशय काळजीपूर्वक ठेवून जपूनच वापरायला हवी."

पतीने काय सांगितले हे सर्व त्याच्या पत्नीने ऐकून घेतले, आणि खूप नवीन शिकायला मिळाले म्हणून ती आनंदित झाली. तिला अजूनही आनंद झाला होता तो त्या मौल्यवान भेटवस्तूचा- तो जेव्हा दूर गेला होता तेव्हाचं त्याच्या स्मृतीचं ते प्रतीक होतं.

"जर हा आरसा माझ्या आत्म्याचे मूर्त प्रतिस्वरूप दाखवित असेल तर मी निश्चितच त्याला माझ्या स्वतःच्या मालकीचा मौल्यवान खजिना समजेन आणि काळजीपूर्वक जपून ठेवीन. आणि कधीही निष्काळजीपणे त्याचा वापर करणार नाही." असे कृतज्ञतापूर्वक ऋणनिर्देश करीत तिने तो कपाळापर्यंत उंच धरला आणि नंतर पेटीत सुरक्षित ठेवून दिला.

त्याच्या पत्नीने पाहिले की तिचा पती खूप थकला आहे म्हणून तिने संध्याकाळचे जेवण बनवायला घेतले आणि त्याच्या आरामासाठी जे काही करू शकेल ते करू लागली. असं वाटायचं की जणू काही त्या कुटुंबाला खरा आनंद पूर्वी ठाऊकच नव्हता, अत्यंत सुखाने ते एकत्र आले होते आणि वडिलांनी केलेल्या प्रवासाबद्दल आणि मोठ्या राजधानीत पाहिलेल्या गोष्टी सांगायच्या होत्या.

त्या स्वस्थ घरामध्ये वेळ निघून गेला, आणि आईवडिलांच्या नजरेस आले की त्यांची आवडती कन्या सुरेख षोडशा झाली होती. त्यांच्या निरंतर प्रेमाच्या व काळजीपूर्वक देखरेखीखाली, वाढलेली त्यांची मुलगी म्हणजे त्यांच्या मालकीच्या एका अमूल्य रत्नाच्या किमतीबरोबर होती. आत्तापर्यंत त्यांनी भोगलेल्या कष्टांना व दुःखांना दुपटीने पारितोषिक मिळाले होते. आणि समाधानाची गोष्ट म्हणजे तिच्या आईला ती घरकामात मदत करायची आणि तिच्या वडिलांना ती नेहमी त्यांच्या

लग्नाच्या वेळची आईबाबत आठवण करून द्यायची, याचा त्यांना किती अभिमान वाटायचा.

पण अरेरे, जगामध्ये कोणतीच गोष्ट सदासर्वकाळ टिकून राहत नाही. चंद्र सुद्धा नियमितपणे पूर्णतया त्याच्या आकारात राहत नाही, तर त्याची गोलाई काळाबरोबर क्षय पावते. फुले फुलतात आणि नंतर कोमेजून जातात. तर शेवटी त्या कुटुंबाचा आनंद एका मोठ्या दुःखामुळे लयास गेला. दयाळू आणि सालस पत्नी आणि आई एकेदिवशी आजारी पडली.

तिच्या आजारपणाच्या पहिल्या दिवशी वडिल आणि मुलीला वाटले की तिला फक्त सर्दी झाली असावी. आणि त्यांना विशेष काळजी वाटली नाही. पण दिवसामागून दिवस गेले तरी आई बरी झाली नाही तर तिची तब्येत अधिकाधिक खराब होत गेली आणि डॉक्टरही गोंधळात पडला. त्याने सारे काही करूनही गरीब बिचारी आई दिवसेंदिवस क्षीण होत गेली. वडिल आणि मुलगी शोकमग्न झाले, आणि दिवसरात्र मुलगी तिला न सोडता तिच्या बाजूला बसून राही. पण सारे प्रयत्न करूनही ते तिचा जीव वाचवू शकले नाहीत.

एके दिवशी ती मुलगी तिच्याजवळ बसली होती, तिच्या हृदयातील कुरतडणाऱ्या दुःखाला ती स्मितहास्यामागे लपविण्याचा प्रयत्न करीत होती. आई तिची तिची स्वतः उठली आणि मुलीचा हात हातात घेत आस्थेने आणि प्रेमाने तिच्या डोळ्यात अनिमिष नजरेने बघत होती. मोठ्या कष्टाने ती श्वास घेत होती आणि बोलताना तिला त्रास होत होता.

“माझ्या पोरी मला आता खात्री वाटायला लागली की कोणतीच गोष्ट मला वाचवू शकणार नाही. जेव्हा मी मृत्यू पावेन तेव्हा मला वचन दे की तुझ्या वडिलांची तू काळजी घेशील आणि एक सुशील आणि कर्तव्यदक्ष स्त्री होण्याचा प्रयत्न करशील.”

“ओ आई, असं म्हणताच तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले, “असं बोलायला नकोस तू आई. सारं तुला जे काही करायचं ते घाईने कर आणि लवकर चांगली हो- ह्यामुळे मला आणि माझ्या वडिलांना खूप खूप आनंद होईल.”

“होय, ठाऊक आहे मला, मी चांगलं व्हावं अशी तुमची इच्छा होती म्हणून मला समाधान वाटत होते. पण तसं झालं नाही, दुःखी दिसू नको कारण माझ्या पूर्वीच्या अस्तित्वात मी ह्या वेळी मरणार अशी मला आज्ञा झालेली आहे. हे कळून मी ह्या प्राक्तनाचा पूर्णपणे स्वीकार केला आहे. आणि आता मला तुला काहीतरी द्यायचे आहे, ज्यायोगे मी गेल्यानंतर तू माझी आठवण ठेवशील.”

तिने हात बाहेर काढीत, रेशमी दोरी आणि गोंडा लावलेली, उशीच्या शेजारून एक लाकडी पेटी बाहेर काढली. काळजीपूर्वक गाठ सोडीत, तिने तिच्या नवऱ्याने काही वर्षांपूर्वी दिलेला आरसा पेटीतून बाहेर काढला.

जेव्हा तू अद्यापही लहान बाळ होतीस तेव्हा तुझ्या वडिलांनी राजधानीतून माझ्यासाठी हा मौल्यवान खजिना आणला, ह्याला आरसा म्हणतात. मृत्यू पावण्यापूर्वी हा मी तुला देणार आहे. मी जीवनाचा निरोप घेतल्यानंतर तू एकटी राहणार आणि केव्हातरी तुला मला बघायची इच्छा झाली तर तू हा आरसा बाहेर काढ आणि त्याच्या चकाकत्या स्वच्छ पृष्ठभागात तू मला नेहमी बघशील—म्हणून तू मला नेहमी भेटू शकशील. तेव्हा तू तुझ्या मनातलं मला सांग आणि जरी मी बोलू शकले नाही तरी मला कळेल, मी तुझ्या सद्भावना आणि सहानुभूतीमध्ये सहभागी होईन. मग तुझ्या भावी आयुष्यात काहीही घडो.” ह्या शब्दांबरोबर मृत्यूपंथाला लागलेल्या त्या बाईने तिच्या हाती तो आरसा दिला.

त्या दयाळू मातेचं मन आता निश्चेष्ट झाल्यासारखे झाले आणि दुसऱ्या एका शब्दाशिवाय क्षीण होत गेले आणि तिचा आत्मा शांतपणे हळूच त्यादिवशी निघून गेला.

मृत्यूने केलेल्या ताटातूटीमुळे पितापुत्री दुःखाने आणि शोकाने वेडे झाले. आणि त्यांनी उभयतांना घोर दुःखात बुडवून घेतले. त्यांना त्यांची प्रिय साध्वी स्त्री सोडून गेली आणि तिचा देह मातीत समर्पित झाला हे अजूनही अशक्यप्राय वाटत होते. पण हे अचानक कोसळलेले दुःख संपले, जरी त्या दुःखाखाली ते चेंगरले गेले होते तरी त्यांनी हे कटू सत्य स्वीकारून त्यांच्या हृदयांना सावरले. असे असले तरी त्या मुलीला

तिचं जीवन उदासवाणे वाटायचे. तिच्या आईवरचं तिचं प्रेम कधीच कमी झाले नाही. तिची आठवण इतकी तीव्र होती की दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्टीत, पडणाऱ्या पावसात, वाहत्या वाऱ्यात सुद्धा तिच्या आईची मृत्यूची आठवण आणि तिच्या सहवासातील क्षणांची आठवण सतत तिच्या सोबत असायची. एके दिवशी जेव्हा तिचे वडिल बाहेर गेले होते, आणि घरकाम पूर्ण उरकण्याचं कर्तव्य ती पार पाडत होती व तिला त्या एकांतात दुःख असह्य झाले होते तेव्हा तिने स्वतःला तिच्या आईच्या खोलीत झोकून दिले आणि इतकी रडली की जणू काही तिचे हृदय विदीर्ण झाले होते. गरीब बिचारी मुलगी, ती अशी इच्छा करायची की तिच्या आईच्या प्रेमळ चेहऱ्याचे ओझरते दर्शन व्हावे, तिच्या आवडीच्या नावाने आईने तिला हाक मारावी, किंवा एका क्षणासाठी तरी तिच्या दुखऱ्या हृदयाची पोकळी भरून यावी. आजपर्यंत दुःखाने बोथट झालेल्या आठवणीत तिच्या आईचे अखेरचे शब्द घुमले.

“ओह! माझ्या आईने निरोप घेतेवेळी मला भेटवस्तू म्हणून आरसा दिला होता ज्यात जेव्हा जेव्हा पाहिन तेव्हा तेव्हा मी तिला भेटू शकते—तिला पाहू शकते. तिचे अखेरचे शब्द मी जवळ जवळ विसरले—किती मूर्ख आहे मी, मी आत्ताच तो आरसा घेईन आणि पाहीन कदाचित ते खरंही असेल!”

तिने पटकन् तिचे डोळे कोरडे केले आणि ती कपाटाजवळ गेली. तिने ती पेटी काढली जिच्यात आरसा ठेवलेला होता, जसा तिने आरसा वर काढला तसे तिचे हृदय अपेक्षेने धडधडू लागले आणि त्यातील नितळ चेहऱ्याकडे तिने अनिमिष नेत्रांनी बघितले. बघा तिच्या आईचे शब्द खरे होते! तिच्यापुढे त्या वर्तुळाकार आरशात तिला तिच्या आईचा चेहरा दिसला, पण अरे, हर्षपूर्ण विस्मय! तो तिच्या आईचा, आजारपणाने कृश आणि म्लान झालेला चेहरा नव्हता तर पूर्वीच्या दिवसातल्या आरंभीचा, लहानपणी बघायची त्या आठवणीतील यौवनातल्या लावण्यपूर्ण स्त्रीचा चेहरा होता. असं वाटतं होतं की त्या आरशातला चेहरा जणू काही लवकरच तिच्याशी बोलणार. जवळ जवळ तिच्या आईचा आवाज तिने ऐकला की तू छान स्त्री म्हणून आणि एक कर्तव्यदक्ष मुलगी म्हणून मोठी हो, त्या आरशातील डोळे अतिशय एकाग्रचित्ताने तिच्या स्वतःच्या डोळ्यात वळून बघत होते.

“हा नक्की माझ्या आईचा आत्मा आहे जो मी बघते आहे. तिच्याशिवाय मी किती दुर्भागी आहे ते तिला ठाऊक आहे आणि ती माझं सांत्वन करण्यासाठी आलेली आहे. जेव्हा जेव्हा मला तिला बघायची आस लागेल तेव्हा तेव्हा ती मला येथे भेटेल. मी तिच्यासाठी किती कृतज्ञ असायला हवी!”

आणि ह्या वेळेपासून तिच्या कोवळ्या हृदयावरचा भार मोठ्या प्रमाणावर कमी झाला. तो तिच्या आईचा आत्माच होता ह्यावर तिचा विश्वास बसला. ती आरसा काढायची आणि त्यात अनिमिष डोळ्यांनी बघायची. जेव्हा तिला त्या आरशात निरागस हृदयाच्या निर्व्याजतेचे प्रतिबिंब दिसायचे, तेव्हा प्रत्येक प्रातःकाळी दिवसभराच्या नेमून दिलेल्या कामाला लागणारी शक्ती आणि प्रत्येक सायंकाळी विश्रांती घेण्यासाठी पडण्यापूर्वी लागणारं सांत्वन ती त्यातून गोळा करायची. सर्वांशी दयाळू आणि कोमलपणे वागण्यात तिच्या आईच्या स्वभावानुसार ती तिच्या वडिलांची सुशील, कर्तव्यदक्ष मुलगी म्हणून तिचा विकास होत होता.

अशा रितीने त्या छोट्याशा कुटुंबाचे शोकाकुल अवस्थेत वर्ष निघून गेले. तेव्हा नातेवाईकांच्या सल्ल्यानुसार त्या माणसाने पुन्हा एकदा लग्न केले आणि आता मुलीला ती सावत्र आईच्या हुकूमाखाली आहे असे आढळून आले. ती कष्टप्रद अवस्था होती, पण तिचे दिवस तिच्या आईच्या चिंतनात गेले. आईच्या इच्छेप्रमाणे वागताना तिला खूप विनयी आणि सहनशील तर व्हावे लागलेच पण तिच्या वडिलांच्या पत्नीसाठी तिला पुत्रधर्म परायण आणि कर्तव्यदक्ष व्हावे लागले, सर्वच बाबतीत. वरकरणी पाहता नव्या शासनाखाली त्या कुटुंबात सुरळीत चालले होते. प्रत्येक दिवशी वर वर उद्विग्न करणारा असा कुठलाही मतभेदाचा वाराही नव्हता आणि वडिलही समाधानी होते.

पण त्या बाईपासून होणारा धोका क्षूद्र आणि निर्दय बनला होता, आणि सर्व जगातील प्रचलित सावत्र आईप्रमाणे तिचंही हृदय प्रफुल्ल राहिलं नव्हतं. आणि जसे जसे दिवस आणि आठवडे महिन्यात वाढू लागले तशी ती सावत्र आई मातृहीन मुलीला निर्दयी वागणूक द्यायला लागली आणि पिता पुत्रीच्या मध्ये येण्याचा प्रयत्न करू लागली.

काही वेळा ती तिच्या नवऱ्याकडे जाऊन तिच्या सावत्र मुलीबद्दल तक्रार करू लागली, पण हे अपेक्षितच होते असे त्याने जाणले आणि त्या अशिष्ट तक्रारींकडे दुर्लक्ष करू लागला. पण असे असले आणि त्या बाईची तशी इच्छा होती तरीही त्या मुलीविषयी त्याची ममता कमी होण्याऐवजी तिच्या कुरबुरींमुळे तो अधिकाधिक त्या मुलीचा विचार करू लागला. लवकरच त्या स्त्रीला कळले की त्या एकाकी मुलीची त्याने पूर्वीपेक्षाही अधिक काळजी घ्यायला सुरुवात केली होती. ह्यामुळे तिला मुळीच आनंद झाला नाही. कुठल्याही ह्या किंवा त्या पद्धतीने उलाढाल करून तिच्या सावत्र मुलीला घराबाहेर काढण्याचे षडयंत्र ती मनात रचू लागली. त्या बाईचे हृदय इतके कपटी बनले होते.

तिने त्या मुलीवर काळजीपूर्वक नजर ठेवली आणि एके दिवशी सकाळी तिने त्या मुलीच्या खोलीत डोकावून पाहिले, तिला वाटले की काहीतरी खूप गंभीर दुष्कृत्य आपल्यासमोर उघडकीला आले तर ज्यायोगे तिला तिच्या विरूद्ध आरोप करता येईल. त्या बाईने जे काही पाहिले होते, त्याबद्दल ती स्वतःसुद्धा खूप घाबरली होती.

म्हणून ती तिच्या नवऱ्याकडे लगेच गेली आणि काही खोटे अश्रू पुसत दुःखपूर्ण आवाजात म्हणाली, “कृपया आजच्या आज तुम्हाला सोडून जायची मला परवानगी द्या!” ही अचानक केलेली विनंती ऐकून त्या माणसाला आश्चर्याचा धक्काच बसला आणि ही काय भानगड आहे म्हणून तो नवल करू लागला.

“तुला काही अनिष्ट दिसले का?” त्याने विचारले, “माझ्या घरात, की तू फार काळ राहू शकत नाही?”

“नाही! नाही! ह्याचा तुमच्याशी काही संबंध नाही, मी स्वप्नातसुद्धा तुम्हाला सोडून टाकून जायचा विचार केला नाही. पण मी अशी येथे राहिले तर मला माझा जीव गमावण्याचा धोका वाटतो, म्हणून मला वाटतं की सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तुम्ही मला माझ्या घरी जायची परवानगी द्यावी!”

आणि ती बाई पुन्हा नव्याने रडू लागली. तिला असे दुःखी झालेले पाहून त्याच्या मनाला खूप यातना झाल्या. तो नीटसे ऐकू शकला नाही असे वाटून तो म्हणाला, "सांग मला तुला काय म्हणायचे आहे ते! कसं काय तुझं जीवन येथे धोक्याचे आहे?"

"मी सांगेन तुम्हाला तुम्ही विचारलं म्हणून. मी तिची सावत्र आई आहे म्हणून तुमची मुलगी माझा तिरस्कार करते. पूर्वी काही वेळा तिच्या खोलीच्या बाजूने मी जायची तेव्हा मला आढळून आले होते की ती स्वतःला त्या खोलीत सकाळ संध्याकाळ कोंडून घ्यायची. आता माझी अशी खात्री झाली आहे की तिने माझी प्रतिमा बनविली आहे, ती मला दररोज शिव्याशाप देते आणि काळया जादूच्या कपटाने मला मारून टाकायचा प्रयत्न करीत आहे. माझं येथे राहणं सुरक्षित नाही, अशा परिस्थितीत खरोखर, मला दूर जायलाच हवे. ह्यापुढे एकाच छपराखाली आपण राहू शकत नाही."

नवऱ्याने ती भयंकर गोष्ट ऐकली पण त्याची सुकुमार मुलगी असे दुष्ट कृत्य करेल ह्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. प्रचलित अंधश्रद्धेनुसार लोकांचा विश्वास होता की तिरस्कृत व्यक्तीची प्रतिमा बनवून दररोज तिच्यावर तळतळाट केला की हळूहळू त्याच्या मृत्यूस ती व्यक्ती कारणीभूत होते. पण त्याच्या छोट्याशा मुलीने हे असले ज्ञान कोठून मिळविले असणार? ही गोष्ट अशक्य होती. आत्ता पावेतो त्याच्याही लक्षात एक गोष्ट आली होती की ती मुलगी तिला स्वतःला खूप वेळपर्यंत कोंडून घ्यायची आणि कुणी पाहुणा जरी घरी आला तरी ती त्या खोलीच्या बाहेर यायची नाही. हे एक कारण आणि त्यात त्याच्या बायकोला वाटत असलेली भीती ह्या दोन्ही बाबींमागे काहीतरी गोष्ट असावी असा तो विचार करू लागला.

पत्नीबद्दलची शंका आणि मुलीवरचा विश्वास ह्या दोन्ही गोष्टींनी त्याचं हृदय विदीर्ण झाले होते आणि काय करावे हे त्याला कळत नव्हते. त्याने ताबडतोब त्याच्या मुलीकडे जायचे आणि खरे काय आहे ते शोधायचे ठरविले. त्याच्या पत्नीचे सांत्वन करीत आणि तिची भीती किती अनाठायी आहे याची तिला खात्री देत तो हळूच त्याच्या मुलीच्या खोलीत शिरला.

ती मुलगी फार फार काळापासून दुःखी झालेली होती. सावत्र आईवडिल व त्यांची सावत्र मुलं ह्यांच्यामध्ये सर्वसाधारणपणे तिच्या माहितीप्रमाणे जी पूर्वग्रहांची आणि गैरसमजांची भिंत होती ती तोडण्यासाठी तिने नव्या बायकोशी गोडीने आणि आज्ञाधारकपणे वागून आणि सांत्वनपूर्वक सद्भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला होता. पण तिला लवकरच असे कळून आले होते की तिचे प्रयत्न निष्फळ आहेत. सावत्र आईने तिच्यावर कधीच विश्वास ठेवला नव्हता आणि ती तिच्या सर्व कृतींचा विपरीत अर्थ लावताना दिसत असे. त्या गरीब बिचाऱ्या मुलीला चांगलेच ठाऊक होते की तिची सावत्र आई तिच्याबद्दल वारंवार अप्रिय आणि खोट्या गोष्टी सांगत असे. जेव्हा तिची स्वतःची आई जिवंत होती तेव्हा वर्षापेक्षा थोड्या अधिक दिवसापूर्वीच्या काळात व आत्ताच्या दुःखी दिवसांमध्ये ती तुलनाच करू शकत नव्हती. एव्हढ्या अल्पावधीत किती बदल झाला होता! त्या आठवणी काढीत ती सकाळ आणि संध्याकाळ सारखी रडत बसे. जेव्हा तिला शक्य असेल तेव्हा खोलीत जाऊन पडदे लावून तो आरसा बाहेर काढीत असे आणि अनिमिष नेत्रांनी त्यात बघत असे. तिला वाटायचे की जणू काही तिच्या आईचाच चेहरा ती बघत आहे. तिच्या दुःखी दिवसांमधलं फक्त हेच एक सौख्य होते.

अशा रितीने त्या मग्न झालेल्या अवस्थेत ती तिच्या वडिलांना दिसली. (फुसामा) सरकदरवाजा बाजूला लोटीत त्याने पाहिले तर ती काहीतरी वस्तूवर वाकलेली होती किंवा खूप एकाग्रतेने बघत होती. तिच्या खांद्यावरून तिच्या खोलीत कोण आले आहे हे तिने मागे वळून पाहिले आणि त्या मुलीला आपल्या वडिलांना पाहिल्याबरोबर खूप आश्चर्य वाटले. कारण नेहमी त्याला तिच्याशी बोलायचे असल्यास तो तिला बोलवायला पाठवायचा. ती आरशात बघत असताना त्याला दिसल्याबरोबर ती गोंधळली सुद्धा. कारण ही गोष्ट कोणालाही सांगू नकोस असे तिच्या आईचे शेवटचे वचन होते, पण तिने हे पवित्र रहस्य तिच्या हृदयात जपून ठेवले होते, म्हणून वडिलांकडे वळून पाहण्यापूर्वी तिने तो आरसा आपल्या लांब बाहीत लपविला. तिचा गोंधळ आणि काहीतरी लपविण्याची कृती लक्षात येताच तिचे वडील कठेरपणे म्हणाले,

“काय ग पोरी, काय करीत आहेस तू येथे? आणि ते काय आहे जे तू तुझ्या बाहीमध्ये लपविले?”

ती मुलगी तिच्या वडिलांच्या कठोरपणाबद्दल घाबरली. अशा कठोर शब्दात ते तिला कधीच बोलले नव्हते. तिच्या गोंधळाचं परिवर्तन धास्तीत झालं, तिची लालजर्द कांती पांढरी पडली. तिच्या तोंडून शब्द फुटेना आणि चेहरा लज्जास्पद होऊन ती उत्तर द्यायला असमर्थ झाली.

तिचा अविर्भाव निश्चितच तिच्या विरूद्ध होता. ती तरूण मुलगी अपराधी दिसत होती आणि तिचे वडील विचार करू लागले की कदाचित त्याच्या बायकोने त्याला जे सांगितले ते अखेरीस खरे होते, तो रागाने बोलला,

“मग हे प्रत्यक्षात खरे आहे का की तू रोज तुझ्या सावत्र आईला अभिशाप देत असतेस आणि तिचा मृत्यू व्हावा म्हणून प्रार्थना करीत असतेस? विसरलीस का तू मी तुला काय सांगितले होते ते की, ती जरी सावत्र आई असली तरी तू आज्ञाधारकपणे आणि एकनिष्ठतेनेच तिच्याशी वागायला हवे ते? कुठल्या अशा अधम शक्तीने तुझ्या मनाचा ताबा घेतला की तू इतकी दुष्ट व्हावीस? तू खरोखर बदलली आहेस, माझ्या मुली! कुठल्या गोष्टीने तुला अवज्ञा करणारी आणि विश्वासघातकी बनविली?”

आणि तिला अशा रितीने खूप दूषण द्यावे ह्या विचाराने एकाएकी आलेल्या अश्रूंनी त्याचे डोळे भरून आले.

तिच्या बाजूने विचार करता एखाद्या प्रतिमेवर पूजाविधी करून तिरस्कृत व्यक्तीच्या मृत्यूला कारणीभूत होता येते अशा प्रकारच्या अंधश्रद्धेबद्दल तिने कधीही ऐकले नव्हते. पण कशाही प्रकारे तिने स्वतःला निर्दोष आहे असे बोलून स्पष्ट करणे भाग होते. तिचे तिच्या वडिलांवर अतिशय प्रेम होते. आणि त्यांच्या क्रोधाची ती कल्पनाही सहन करू शकत नव्हती. तिने खेद करीत त्याच्या गुडघ्यावर हात ठेवला,

“बाबा! बाबा! अशा भयानक गोष्टी मला बोलू नका. मी अजूनही तुमची आज्ञाधारक कन्याच आहे. निश्चितपणे मी आहे. येनकेन प्रकारेण मी मूर्ख असेनही, जे तुमचे आहेत आणि ज्यावर तुमचं प्रेम आहे त्यांचा मृत्यू व्हावा म्हणून मी कधीही प्रयत्न केला नाही. नक्कीच तुम्हाला हे कुणीतरी खोटं सांगून तुम्हाला भांबावून टाकले आहे आणि तुम्हाला ठाऊक नाही काय म्हणावे ते –किंवा काही वाईट शक्तींनी तुमच्या हृदयाचा ताबा घेतलेला आहे—नाही, नाही माझ्या बाबतीत – मला अशा दुष्ट प्रवृत्तींबद्दल दव बिंदू एव्हढेही ठाऊक नाही.”

पण वडिलांना आठवले की जेव्हा त्यांनी पहिल्यांदाच खोलीत प्रवेश केला होता तेव्हा तिने काहीतरी लपविले होते. पण तिने केलेला मनःपूर्वक निषेध त्याचे समाधान करू शकला नाही. त्याने त्याच्या शंकांचे पूर्णतया निरसन करायचे ठरविले.

“मग ह्या दिवसात तुझ्या खोलीत नेहमी तू एकटी का राहतेस? आणि सांग मला तुझ्या बाहीमध्ये तू काय लपवून ठेवले आहेस? दाखव मला पटकन.”

नंतर ती मुलगी, जरी तिच्या आईच्या आठवणींना प्रेमाने कशी उराशी बाळगून होती, ह्या अपराधाची कबुली देण्यात ती जरी लाजत होती, तरी तिने पाहिले की वडिलांना सारे काही स्पष्ट सांगून टाकायलाच हवे. म्हणून तिने तिच्या लांब बाहीमधून झटकन तो आरसा काढला आणि त्याच्या पुढे ठेवला.

“हेच,” ती म्हणाली, जे तुम्ही पाहिले, ज्यात मी आता बघते आहे.”

“का” मोठ्या आश्चर्याने तो म्हणाला, “हा तोच आरसा आहे जो मी फार वर्षांपूर्वी राजधानीकडे गेलो होतो तेव्हा तुझ्या आईसाठी भेटवस्तू म्हणून आणला होता! आणि म्हणून का तू तो तुझ्याजवळ सर्वकाळ बाळगून असतेस? आता का तू तुझा वेळ ह्या आरशासमोर घालवितेस?”

नंतर तिने आईचे शेवटचे शब्द त्याला सांगितले, आणि जेव्हा जेव्हा ती आरशात बघेल तेव्हा तेव्हा ती तिला भेटेल ह्या आईने दिलेल्या वचनाबद्दलही सांगितले. पण तरीही वडील त्याच्या मुलीच्या स्वभावातील साधेपणा समजू शकत नव्हते. त्याला हे माहित नव्हते की वास्तविक तिने आरशात प्रतिबिंबित झालेला चेहरा पाहिला तो तिचा स्वतःचा चेहरा आहे, तिच्या आईचा नव्हे.

"काय तुझ्या म्हणण्याचा अर्थ?" त्याने विचारले. "मला समजत नाही की मृत्यू पावलेल्या तुझ्या आईचा आत्मा तुला आरशात पाहून कसा भेटतो?"

"हे खरोखर सत्य आहे," ती मुलगी म्हणाली, "आणि तुमचा स्वतःचा विश्वास बसत नसेल तर तुम्ही स्वतः बघा," आणि तिने तो आरसा त्याच्यापुढे धरला. सपाट पृष्ठभाग असलेल्या त्या धातूच्या चकतीमागे तिचा स्वतःचा गोड चेहरा होता. तिने त्या प्रतिबिंबाकडे गांभीर्याने अंगुलीनिर्देश केला,

"अजूनही तुम्हाला माझ्याबद्दल शंका वाटते?" तिने वर त्याच्या चेहऱ्याकडे बघत कळकळीने विचारले.

अचानक आकलन झाल्याने वडिलांनी उद्गारासह त्याचे दोन्ही हात बाहेर झटकन फेकले.

"किती मूर्ख मी! शेवटी मला कळले. तुझा चेहरा तुझ्या आईसारखाच, खरबुज दोन्ही बाजूंनी सारखेच दिसते तसा. त्याचा परिणाम म्हणून तू त्या चेहऱ्याच्या प्रतिबिंबाकडे पाहिले आणि तुला वेदना झाल्या, हा विचार करून की तुला तुझ्या मृत आईच्या समोरासमोर आणलं गेलं! तू खरोखर एकनिष्ठ पोरगी आहेस. सुरुवातीला ही किती मूर्खपणाची गोष्ट झाली असे वाटायचे, पण ते खरोखर तसे नव्हते. तुझी अगाध पुत्रभक्ती तुझ्या निरागस हृदयाचं निदर्शकच आहे. मृत्यू पावलेल्या अविरत चिंतनाने तुझा स्वभाव तसाच घडण्यात मदत झाली. तू असं करावं हे सांगणारी तुझी आई किती बुद्धीमान होती. मला तुझं कौतुक आणि आदर वाटतो. माझ्या मुली, जेव्हा तू सत्य आणि सद्विचारी वागत असताना तुझ्या संशयी सावत्र आईने सांगितलेल्या

गोष्टींवर तात्काळ विश्वास ठेवून तू दुष्ट म्हणून तुझ्यावर संशय घेतला आणि तुझ्यावर भयंकर संताप व्यक्त करण्याच्या उद्देशाने मी येथे आलो. ह्याबद्दल मला शरमल्यासारखे वाटते. तुझ्यापुढे तोंड दाखवायला माझ्याकडे आता काहीच शिल्लक राहिले नाही आणि मी तुझी क्षमा मागतो."

आणि येथे वडिलांना रडू आले. त्याने विचार केला की गरीब बिचाऱ्या मुलीला किती एकटेच रहावे लागले, आणि त्याही पलिकडे तिला तिच्या सावत्र आईची वागणूक सहन करावी लागली. ह्या साऱ्या प्रतिकूल परिस्थितीतही तिने दृढतेने तिचा विश्वास आणि साधेपणा राखून ठेवला—सारे दुःख तिने सहनशीलतेने आणि प्रसन्नतेने सहन केले. जगाचा अनुभव घेत असताना खंदकातील जलाशयात असलेल्या शेवाळ आणि चिखलात वाढत उमलणाऱ्या निष्कलंक हृदयाचे समर्पक प्रतिक असणाऱ्या, डोळे दिपविणाऱ्या सुंदर कमळाशी तिची तुलना करावी अशी त्याची मनःस्थिती झाली.

इतक्या सर्व वेळेपर्यंत खोलीच्या बाहेर वाट पाहत असलेली सावत्र आई काय होईल म्हणून उत्सुक झाली होती. आत सर्व काही काय चालले आहे ह्याबद्दलची तिची जिज्ञासा हळूहळू इतकी वाढत गेली की तिने सरकपडदा अलगद मागे लोटला जेणेकरून आत काय चालले आहे हे तिला दिसू शकेल. ह्याक्षणाला ती अचानक खोलीमध्ये शिरली आणि चटया बाजूला सोडीत सावत्र मुलीने पसरवेल्या हातावर तिने डोके वाकविले.

"मला शरम वाटली! मला शरम वाटली!" ती मोडक्या स्वरात उद्गारली. मला ठाऊक नव्हते किती पितृभक्त मुलगी आहेस तू ते. तुझा काहीही दोष नव्हता तरी पण सावत्र आईच्या मत्सरी भावनेने मी तुझा सर्वदा द्वेष केला. मी तुझा खूप तिरस्कार केला. पण हे नैसर्गिक होते की तू परस्परातील भावना समजते असा मी विचार करायला हवा होता. आणि अशा रितीने जेव्हा तू तुझ्या खोलीत आराम करायला अनेकदा एकटी जायचीस तेव्हा मी तुझा पाठलाग करायची आणि जेव्हा तू मला बऱ्याच वेळेपर्यंत आरशात टक लावून बघताना दिसायची तेव्हा त्यावरून मी निष्कर्ष काढायची की तू माझा किती द्वेष करते आणि म्हणून माझा सूड घेण्यासाठी

मंत्रतंत्राद्वारे तू माझा जीव घेण्याचा प्रयत्न करीत आहेस. मी तुझ्याशी किती चुकीने वागले आणि तुझ्याबद्दल गैरसमज करून घेतला, तुझ्यावर अन्याय केला आणि तुझ्यावर संशय घेण्यास तुझ्या वडिलांना प्रवृत्त केले, हे मी जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत कधीही विसरू शकणार नाही. ह्या दिवसापासून मी माझे जीर्ण आणि दुष्ट हृदय फेकून देईन आणि त्याजागी नूतन, निर्मळ आणि पश्चात्तापाने परिपूर्ण हृदय ठेवीन. मी स्वतः तुला जन्म दिलेली तू माझी मुलगी म्हणूनच मी तुझा विचार करीन. मी तुझ्यावर प्रेम करीन, मनाने सर्वथा उराशी धरीन आणि तुला दुःख देण्यात ज्या गोष्टींनी मी कारणीभूत झाले त्यांची सर्व भर मी काढीन. म्हणून जे काही पूर्वी घडून गेले ते सर्व पाण्यात सोडून दे आणि आजपावेतो तुझ्या आईला जे मातृभक्तीचे प्रेम दिले ते प्रेम मला तू द्यावेस अशी मी तुझ्याकडे याचना करते."

अशा रितीने त्या दुष्ट सावत्र आईचा नक्षा तिने स्वतःच उतरवला आणि तिने केलेल्या चुकांबद्दल मुलीची क्षमा मागितली.

अशा तऱ्हेने मुलीच्या स्वभावाच्या माधुर्यामुळे तिने स्वेच्छेने तिच्या सावत्र आईला क्षमा केली, आणि आईने पुन्हा कधीही नंतर तिच्यावर एक क्षणभरही संताप केला नाही किंवा तिचा विद्वेष केला नाही. वडिलांनी त्याच्या पत्नीच्या चेहऱ्यावर गतकाळाबद्दल खरोखर दुःख वाटल्याचे पाहिले आणि भयंकर गैरसमजातून निघाल्यामुळे त्याच्या मनावरील दडपण कमी झाले होते आणि अपराध आणि अपराध करणारे ह्यांच्याकडून त्या सर्व आठवणी पुसून टाकल्या गेल्या.

ह्यावेळेपासून ते तिघे पाण्यातल्या माशांसारखे एकत्र सुखी जीवन जगू लागले. अशा प्रकारच्या कुठल्याही त्रासाने त्यांचे घर पुन्हा काळवंडले गेले नाही. आणि ती तरूण मुलगी तिच्या सावत्र आईने प्रदान केलेल्या कोमल आणि वात्सल्यपूर्ण देखभालीखाली तिचे दुःख पूर्ण वर्ष हळूहळू विसरली. अखेरीस तिचे धैर्य आणि चांगुलपण ह्यामुळे तिला असे पारितोषिक मिळाले.

* * * * *

अदाचिघाराचा राक्षस

फार फार वर्षांपूर्वी जपानमधील मुत्सुच्या प्रांतात अदाचिघारा नावाचे एक विस्तृत मैदान होते. हे ठिकाण एका नरभक्षक राक्षसाकडून झपाटले गेले होते असे म्हटले जाई. ज्याने एका म्हातारीचे रूप घेतले होते. अधूनमधून बरेच प्रवासी नाहीसे होत आणि त्यांच्याविषयी अधिक कधीच काही ऐकू येत नसे आणि संध्याकाळी ती म्हातारी कोळशाच्या शेगडीभोवती फिरे. विहिरीच्या काठी सकाळी घरातील कुटुंबासाठी लागणारा तांदूळ धुताना मुली त्या हरवलेल्या लोकांच्या भयानक गोष्टींबद्दल कुजबुजत असत की ती झोपडी त्यांना भुरळ पाडून कशी गिळंकृत करीत असे. कारण तो राक्षस फक्त नर मांसावरच जगत असे. सूर्यास्तानंतर त्याठिकाणी जाण्याचे धाडस कोणी करीत नव्हता. आणि जे कोणी करीत ते दिवसाही टाळाटाळ करीत असत आणि प्रवाशांना त्या भयंकर ठिकाणाच्या धोक्याची सूचना दिली जाई.

एके दिवशी जेव्हा सूर्य अस्तास जात होता तेव्हा एक धर्मगुरू त्या मैदानावर आला. तो उशीरा आलेला प्रवासी होता, आणि त्याच्या पोषाखावरून तो बुद्धिष्ट यात्रेकरू असून तो पापविमोचन करण्याच्या इच्छेने प्रार्थना करीत एका तीर्थस्थळावरून दुसऱ्या तीर्थस्थळाकडे जात होता. हे उघड होते की तो त्याचा रस्ता चुकला होता, आणि तो खूप उशीरा पोहोचल्यामुळे त्याला मार्ग दाखवू शकणारा किंवा त्या झपाटलेल्या ठिकाणाची धोक्याची सूचना देणारा कोणीही भेटला नव्हता.

तो संपूर्ण दिवसभर चालला होता आणि आता थकलेला आणि भुकेलेलाही झाला होता. ती शरदऋतूची अखेर असल्यामुळे संध्याकाळ खूप गारठलेली होती. आणि आजूबाजूला रात्रभरासाठी कोठे निवासस्थान आढळते का म्हणून तो चिंता करू लागला.

शेवटी काही तास भ्रमंती केल्यावर त्याला काही अंतरावर झाडांची राई दिसली आणि झाडांमध्ये त्याला एक मिणमिणता प्रकाशकिरण दृष्टीस पडला. तो आनंदाने उद्गारला,

"ओ, ते नक्कीच एक छोटेसे घर आहे जेथे मला रात्रभर निवास करता येईल!"

त्याच्या डोळयांसमोर तो प्रकाश ठेवून तो थकल्या, दुखऱ्या पायांनी फरफटत जेवढे जलद चालता येईल तेवढे त्या स्थळाकडे चालू लागला. आणि लवकरच तो त्या दरिद्री दिसणाऱ्या छोट्या झोपडीजवळ आला. जसा तो जवळ सरकला, तसे त्याने पाहिले की ती कोसळून पडण्याच्या अवस्थेत होती. बांबूचे कूड मोडले जाऊन त्याच्या फटीतून गवत बाहेर आले होते. खिडक्या आणि दरवाजा म्हणून वापरल्या जाणाऱ्या जपानमधील कागदी पडद्यांना खूप भोके पडली होती. घराचे खांब जुने होऊन वाकले होते आणि गवताच्या शाकारलेल्या छप्पराला कसाबसा आधार देताना दिसत होते. झोपडी उघडी होती आणि जुन्या कंदिलाच्या प्रकाशात म्हातारी सूत कातण्यात अतिशय गर्क झाली होती.

बांबूंच्या कुंपणावरून त्या यात्रेकरूने तिला हाक मारली आणि म्हणाला, “ओ बा सान (आजीबाई) नमस्कार! मी एक प्रवासी आहे. कृपया मला माफ करा. मी रस्ता चुकलो आणि काय करावे कळत नाही. कारण रात्रभर विश्रांती घ्यायला मला कोठेच जागा नाही. तुमच्या आश्रयाखाली मला रात्र घालवू दिली तर खूप चांगले होईल.”

त्या म्हातारीने हे बोलणे ऐकल्याबरोबर सूत कातणे ताबडतोब थांबविले. ती उठली आणि त्या आगंतुकाकडे पोहोचली.

“तुमच्याबद्दल मला खूप वाईट वाटतं. तुम्ही तुमचा रस्ता या एकाकी जागेवर रात्री चुकलात त्याबद्दल तुम्हाला खरोखरच क्लेश झाले असणार. दुर्दैवाने मी तुम्हाला येथे राहू देऊ शकत नाही कारण माझ्याकडे तुमची राहण्याची सोय करून देऊन पाहुण्याला देण्यासाठी ह्या दरिद्री घरात बिछानाही नाही!”

“ओ, काही हरकत नाही,” तो धर्मगुरू म्हणाला. “मला फक्त काय पाहिजे असेल तर रात्रभरासाठी ह्या छपराखाली निवारा आणि जर तुम्ही मला कृपया तुमच्या स्वयंपाकघरातील जमिनीवर रात्रभर पडू द्याल तर मी तुमचा आभारी राहीन. मी इतका थकलो आहे की आज रात्री मी अधिक अंतर चालू शकत नाही, मला अशी आशा आहे की तुम्ही मला नकार देणार नाहीत, नाहीतर बाहेर या गारठलेल्या मैदानावर मला झोपावं लागेल.” आणि अशा रितीने त्याने तेथे राहण्यासाठी म्हातारीला कळकळीची विनंती केली.

ती खूप नाखूष दिसली, पण शेवटी ती म्हणाली,

“खूप छान, मी तुम्हाला येथे राहू देईन. मी फक्त खूपच अल्पसं तुमचं स्वागत करू शकते, पण या आत आणि मी शेकोटी पेटविते कारण आज रात्री खूप थंडी आहे.”

त्या यात्रेकरूला असं सांगितले गेल्यावर खूप आनंद झाला. त्याने आपली पादत्राणे काढली आणि झोपडीत प्रवेश केला. म्हातारीने काही काटक्या आणल्या आणि शेकोटी पेटविली आणि पाहुण्याला शेकायला जवळ बोलाविले.

“इतक्या दूरवर चालत आल्यानंतर तुम्हाला भूक लागली असणार,” म्हातारी म्हणाली, “मी जाते आणि तुमच्यासाठी रात्रीचं काहीतरी जेवण बनविते.” नंतर ती स्वयंपाकघरात गेली आणि तिने थोडा भात शिजविला.

रात्रीचे जेवण संपल्यावर म्हातारी शेकोटीजवळ बसली आणि बऱ्याच वेळेपर्यंत त्यांनी एकत्र गप्पा केल्या. येथे आल्यावर आपल्याला अशा प्रकारची दयाळू आणि आतिथ्यशील म्हातारी भेटल्याने आपण खूप नशीबवान आहोत असे त्याला वाटले. शेवटी लाकडे संपली आणि जाळ विझला तेव्हा तो आला होता तेव्हा जसा थंडीने कापत होता तसा कापू लागला.

“मी बघते आहे की तुम्हाला खूप थंडी वाजते आहे.” म्हातारी म्हणाली, “मी बाहेर जाते आणि काही लाकडे गोळा करून आणते. कारण आपण ती सर्वच वापरून टाकली. मी गेल्यावर तुम्ही येथेच थांबा आणि घराची काळजी घ्या.”

“नाही, नाही,” तो यात्रेकरू म्हणाला, “तुमच्याऐवजी मला जाऊ द्या कारण तुम्ही म्हाताऱ्या आहात आणि ह्या गारठल्या रात्री मी तुम्हाला लाकडे आणण्यासाठी जाऊ देऊ शकत नाही!”

म्हातारीने नकारार्थी मान हलविली आणि म्हणाली,

“तुम्ही येथे शांतपणे रहा, कारण तुम्ही माझे अतिथी आहात.” नंतर ती त्याला सोडून बाहेर गेली. एका मिनिटात ती परत आली आणि म्हणाली, “जेथे तुम्ही बसला आहात तेथेच बसा आणि तेथून हलू नका. आणि काहीही झालं तरी आतल्या खोलीच्या जवळ जाऊ नका आणि आत पाहू नका, आणि लक्षात ठेवा मी काय म्हणते ते!”

“जर तुम्ही सांगितले की मागच्या खोलीमध्ये जाऊ नका तर खचितच मी जाणार नाही!” किंचित गोंधळून यात्री म्हणाला.

नंतर म्हातारी पुन्हा बाहेर गेली आणि धर्मगुरू एकटाच राहिला. जाळ विझून गेला होता, त्या रात्री पहिल्यांदाच त्याला वाटायला लागले की तो एका विचित्र ठिकाणी आलेला आहे आणि त्या म्हातारीच्या, "काही झालं तरी तू त्या मागच्या खोलीत डोकावून बघू नकोस," ह्या शब्दांनी त्याची जिज्ञासा आणि भीती वाढविली होती.

अशी काय गोष्ट तिने लपवून ठेवली असेल जी त्याने पाहू नये अशी तिची इच्छा होती? म्हातारीला त्याने दिलेल्या वचनाच्या आठवणीने त्याला काहीवेळ स्तब्ध ठेवले, पण मज्जाव घातलेल्या त्या ठिकाणी ढुंकून पाहण्याच्या त्याच्या जिज्ञासेला मोह आवरला नाही.

तो उठला आणि मागील खोलीकडे हळूहळू सरकू लागला. नंतर त्याने त्या म्हातारीची आज्ञा न पाळल्यामुळे ती त्याच्यावर खूप रागवेल ह्या विचाराने तो शेकोटीजवळ परत आला.

हळूहळू मिनिटामागून मिनिटे गेली आणि म्हातारी परत आली नाही. तो अधिकाधिक घाबरू लागला आणि त्याच्या मागे असलेल्या खोलीत काय भयंकर गुपित असेल ह्याबद्दल आश्चर्य करू लागला. त्याला शोधायलाच हवे होते.

"मी जोपर्यंत तिला सांगत नाही तो पर्यंत मी काय पाहिले हे तिला कळणार नाही. म्हातारी परत येण्याच्या आत मी नुसते डोकावून पाहीन," तो माणूस स्वतःशीच म्हणाला.

ह्या शब्दांबरोबर तो त्याच्या पायांवर उभा राहिला (कारण तो सर्व वेळ जपानी पद्धती प्रमाणे खाली पाय वळवून बसला होता.) आणि चोरटेपणे रांगत तो त्या मज्जाव घातलेल्या ठिकाणाकडे गेला. थरथरत्या हातांनी त्याने तो सरकदरवाजा मागे ओढला आणि आत पाहिले. त्याने जे काही पाहिले त्याबरोबर त्याच्या रक्तवाहिन्यातील रक्त गोठून गेले. ती खोली पूर्णपणे मेलेल्या माणसांच्या हाडांनी भरलेली होती आणि भिंतीवर शिंतोडे उडालेले होते आणि जमीन मानवी रक्ताने

माखलेली होती. एका कोपऱ्यात छतापर्यंत कवटीवर कवटी रचलेली होती, दुसऱ्या कोपऱ्यात छतापर्यंत हाडांचा ढीग तर आणखी एका कोपऱ्यात पायाच्या हाडांची रास होती. शिसारी आणणाऱ्या घाणेरड्या वासाने त्याला मूर्च्छा आणली. तो भीतीने मागे पडला आणि त्या भयाने तो ढिगामध्ये जमिनीवर काहीवेळ पडून राहिला. घृणास्पद दृश्य. भीतीने त्याचा थरकाप उडाला आणि त्याचे दात थडथड उडू लागले आणि कसाबसा तो त्या भयंकर जागेतून सरपटत बाहेर पडला.

"किती भयंकर!" तो किंचाळला. "काय भीषण गुहा आली माझ्या प्रवासात?" बुद्धदेवा, मला मदत करा नाहीतर मी संपलो. ती दयाळू म्हातारी खरोखर नरमांस भक्षक राक्षस आहे हे शक्य आहे का? जेव्हा ती स्वतः परत येईल तेव्हा ती आपल्या खऱ्या स्वरूपात येईल आणि एका घासात मला खाऊन टाकील."

ह्या शब्दाबरोबर त्याने त्याची शक्ती त्याच्याकडे एकवटली. पटकन त्याने हॅट आणि काठी घेतली आणि त्याचे पाय जितक्या जलदीने त्याला नेतील तितक्या जलदीने तो तेथून बाहेर पडला. त्या रात्रीतच तो बाहेर पळाला, त्याचा एक विचार की जितके लवकर शक्य असेल तितक्या लवकर त्या राक्षसाच्या झपाटलेल्या घरातून बाहेर पडायचे. तो फार पुढे गेला नाही तोच त्याला मागे पावलांचा आवाज आला आणि त्या पाठोपाठ "थांब! थांब!" असे किंचाळत असल्याचा आवाज आला.

आपल्याला काहीच ऐकू येत नाही अशी बतावणी करीत तो दुप्पट वेगाने पळाला. तो पळत असताना मागून अधिकाधिक जवळ येणाऱ्या पावलांचा आवाज त्याने ऐकला आणि नंतर त्याने ओळखले की त्या म्हातारीचा आवाज जशी जशी ती जवळ येत गेली तसा वाढत होता.

"थांब! थांब, अरे पाजी माणसा, मी मना केल्यावरही त्या खोलीत का पाहिलेस?"

तो धर्मगुरू पूर्णपणे विसरला की तो किती दमला आहे आणि तरीही त्याचे पाय त्या मैदानावरून किती जलद गतीने उडताहेत. भीतीने त्याला अधिकच बळ आले,

कारण त्याला ठाऊक होते की जर त्या राक्षसाने त्याला पकडले तर तो लवकरच तिच्या बळींपैकी एक होईल. अगदी मनापासून त्याने पुन्हा पुन्हा बुद्धदेवाची प्रार्थना केली.

"नामु अमिदा बुत्सु, नामु अमिदा बुत्सु."

आणि त्याच्या पाठीमागून ती भयंकर थेरडी त्याच्यावर चालून येत होती. तिचे केस वाऱ्याने उडत होते आणि तिचा चेहरा ती जी होती त्या राक्षसाच्या रूपात त्वेषाने रूपांतरीत होत होता. तिच्या हातात रक्ताने माखलेला भला मोठा सुरा होता आणि ती अजूनही कर्कश आवाजात किंचाळत होती, "थांब! थांब!"

शेवटी तो धर्मगुरू खाली पडला आणि अधिक धावू शकला नाही. तांबडं फुटलं आणि रात्रीच्या काळोखाबरोबर तो राक्षसही नाहीसा झाला आणि तो सुरक्षित झाला. त्या धर्मगुरूला आता कळून चुकले होते की त्याची अदाचिघाराच्या राक्षसाशी गाठ पडली होती. त्याची गोष्ट त्याने अनेकदा ऐकली होती पण ती खरी असावी यावर त्याने कधीच विश्वास ठेवला नव्हता, त्याच्या ह्या आश्चर्यकारक सुटकेचे आणि रक्षणाचे श्रेय त्याने बुद्धदेवास दिले ज्याची त्याने मदतीसाठी प्रार्थना केली होती, म्हणून त्याने त्याची जपमाला बाहेर काढली. उगवत्या सूर्यासमोर मान तुकवून प्रार्थना केली आणि त्याचे मनःपूर्वक आभार मानले. नंतर तो दुसऱ्या देशाच्या प्रवासाला निघाला, त्याने ते झपाटलेले मैदान मागे टाकले होते ह्याचा त्याला खूप आनंद झाला.

* * * * *

चतुर माकड आणि रानडुक्कर

फार फार वर्षांपूर्वी जपानमधील शिनशिनच्या प्रांतात एक प्रवासी माकडवाला (मदारी) राहत होता. तो माकडाला नाचवून त्याच्याकडून चलाखीचे खेळ करून दाखवून त्यावर उदरनिर्वाह करीत होता.

एके दिवशी सायंकाळी तो माणूस खूप चिडलेल्या अवस्थेत घरी आला आणि त्याच्या बायकोला म्हणाला उद्या सकाळी कसायाला बोलावून घे.

त्याची बायको खूप गोंधळात पडली आणि तिने नवऱ्याला विचारले,

“कशासाठी तुम्ही कसायाला बोलावून आणायला सांगितले?”

“त्या माकडाला आता ह्यापुढे नाचविण्यात काही अर्थ नाही, ते खूप म्हातारं झालं असून त्याच्या चलाख्या तो विसरला आहे. मी त्याला माझ्या पद्धतीने काठीने मारून पाहिले तरी पण तो व्यवस्थित नाचत नाही. मला त्याला कसायाला विकायलाच हवे आणि त्याच्याकडून तरी थोडे पैसे मी मिळवू शकेन, त्याशिवाय काही मार्गच नाही.”

त्या बाईला त्या गरीब बिचाऱ्या प्राण्याबद्दल खूप वाईट वाटले आणि तिने त्या माकडाला वाचविण्यासाठी तिच्या नवऱ्याची खूप मनधरणी केली, पण तिची मनधरणी निरर्थ झाली, त्या माणसाने त्याला कसायाला विकायचा पक्का निर्धार केला होता.

आता ते माकड जवळच्याच खोलीत होते व त्यांच्या संभाषणातील प्रत्येक शब्द त्यांच्या नकळत त्याने ऐकला. त्याला तात्काळ कळले की त्याला ठार मारले जाणार, आणि तो स्वतःशीच म्हणाला:

“खरोखर किती क्रूर आहे माझा मालक! येथे वर्षानुवर्षे किती प्रामाणिकपणे मी त्याची सेवा केली आणि माझ्या अखेरच्या दिवसात मला सुखाने आणि शांततेने जगू देण्याऐवजी तो माझी कत्तल करण्यासाठी मला कसायाच्या स्वाधीन करणार आणि

माझ्या दयनीय देहाला विस्तवावर भाजणार आणि शिजवणार आणि खाणार? धिक्कार असो माझा! काय करू मी, काय तेजस्वी विचार आला माझ्या मनात! तेथे आहे, मला ठाऊक आहे, शेजारच्या जंगलातच एक रानडुक्कर राहते. त्याच्या कुशाग्र बुद्धीबद्दलच्या कथा मी अनेकदा ऐकल्या आहेत. कदाचित जर मी त्याच्याकडे गेलो आणि मी कोणत्या संकटात सापडलो हे त्याला सांगितले तर तो काहीतरी सल्ला देईल. मी जाईन आणि प्रयत्न करीन."

आता वेळ घालवायला नको होता. ते माकड घराबाहेर निसटले आणि त्या रानडुक्कराला शोधण्यासाठी त्याला जेवढे जलद पळता येईल तेवढे जलद पळत तो जंगलाकडे आला. ते रानडुक्कर घरीच होते आणि माकडाने त्याच्यावर आलेल्या संकटाची कहाणी त्याला सांगायला ताबडतोब सुरूवात केली.

"दयाळू महाराज, मी तुमच्या तल्लख बुद्धीमत्तेबद्दल ऐकले आहे. मी फार मोठ्या संकटात सापडलो आहे, तुम्हीच एक फक्त मला मदत करू शकता. मी माझ्या मालकाची सेवा करून करून म्हातारा झालो आणि आता मी नीटपणे नाचू शकत नाही म्हणून माझ्या मालकाने मला कसायाला विकून टाकायचे ठरविले आहे. तुम्हीच मला काय तो सल्ला द्याल? मला ठाऊक आहे. मला माहित आहे, तुम्ही किती हुशार आहात ते!"

रानडुक्कराला त्याची स्तुती ऐकून खूप आनंद झाला आणि त्याने माकडाला मदत करायचे ठरविले. त्याने थोडावेळ विचार केला आणि नंतर तो म्हणाला, "तुझ्या मालकाला बाळ नाही का?"

"ओ, होय," माकड म्हणाले, "त्याला एक तान्हा मुलगा आहे."

“तुझी मालकीण जेव्हा दिवसभरातले काम सुरू करते तेव्हा तो दारात बसलेला नसतो का? ठीक मी सकाळी लवकर त्या बाजूला येईन आणि जेव्हा मला संधी मिळेल तेव्हा मी त्याला पटकन उचलून घेऊन पळून जाईन.”

“नंतर काय?” माकड म्हणाले.

“त्यामुळे आई प्रचंड घाबरेल, काय करावे हे तुझ्या मालक आणि मालकिणीला कळण्यापूर्वी तुला माझ्या मागे धावणं भाग आहे आणि बाळाला वाचवायला हवे, नंतर त्याला सुरक्षितपणे त्याच्या आईवडिलांकडे घरी आण आणि मग तू बघशीलच जेव्हा तो कसाई येईल तेव्हा त्याला तुला विकायचे त्यांचे मनच होणार नाही.”

माकडाने त्याचे खूप वेळा आभार मानले आणि तो घरी गेला. तुम्हाला कल्पना आलीच असेल की उद्याच्या दिवसाचा विचार करीत राहिल्यामुळे त्या रात्री माकडाला फारशी झोप आली नाही. त्या रानडुकराची योजना यशस्वी होते की नाही ह्यावर त्याचे जीवन मरण अवलंबून होते. तो सर्वात आधी उठला आणि काय होईल याची चिंता करू लागला. त्याच्या मालकाची बायको उठून सकाळचा प्रकाश आत येऊ देण्यासाठी दार उघडून केव्हा हालचाल करेल ह्याची वाट पाहण्यात त्याला खूप काळ लोटल्यासारखे वाटले. नंतर रानडुक्कराने आखलेल्या बेताप्रमाणे सारे घडले. नेहमीप्रमाणे घर आवरून न्याहारी तयार करताना त्या आईने बाळाला दाराजवळच्या छपराखाली ठेवले.

ते बाळ सकाळच्या सूर्यप्रकाशात मोठ्या आनंदाने स्वतःशीच गुणगुणत होते, चटईवर पडलेल्या उनसावलीशी खेळत होते. अचानक त्या छपराखाली बाळाचा मोठ्याने रडण्याचा आवाज ऐकू आला. ती आई स्वयंपाकघरातून त्या जागेवर धावतच बाहेर आली, फक्त तेवढ्या वेळात तिने हाताच्या पकडीत बाळाला घेऊन प्रवेशद्वारातून बाहेर नाहीशा होणाऱ्या रानडुक्कराला पाहिले. तिने तिचे हात जोरात हलवित हताशपणे मोठ्याने ओरडत आतल्या खोलीत धूम ठोकली जेथे तिचा नवरा अजूनही गाढ झोपलेला होता.

तो हळूच डोळे चोळत उठून बसला आणि कसला आरडाओरडा चाललाय म्हणून रागाने तिला विचारले. तेवढ्या वेळेपर्यंत काय प्रकार घडला हे त्याच्या ध्यानात आले आणि ते दोघेही प्रवेशद्वाराच्या बाहेर आले. ते रानडुक्कर बरेच लांब निघून गेले होते. पण त्या चोराच्या मागे जितके जलद त्याचे पाय नेतील तितके जलद त्या माकडाला धावताना पाहिले.

त्या चतुर माकडाच्या शूर वृत्तीचे त्या दोघा पतीपत्नीने खूप कौतुक केले आणि जेव्हा त्या माकडाने त्यांच्याकडे बाळाला सुरक्षितपणे परत त्यांच्या हातात आणून दिले तेव्हा तर त्यांच्या कृतज्ञतेला पारावार राहिला नाही.

“बघा!” त्याची बायको म्हणाली. “ह्याच प्राण्याला तुम्ही मारून टाकणार होता ना, जर ते माकड नसते तर आपल्याला आपल्या बाळाला कायमचे मुकावे लागले असते.”

“अगदी बरोबर आहे तुझं,” बाळाला घरात घेऊन जाताना तो माणूस एकदम म्हणाला, “जेव्हा तो कसाई येईल तेव्हा तू त्याला परत पाठवू शकतेस आणि आम्हा सर्वांना छानपैकी न्याहारी दे, माकडाला सुद्धा.”

जेव्हा तो कसाई येऊन पोहोचला तेव्हा संध्याकाळच्या जेवणासाठी त्याला रानडुक्कराचं मांस आणायला सांगून त्यांनी त्याला परत पाठवले. त्यांना माकडावर खूप प्रेम केले आणि ते माकड उर्वरीत आयुष्य शांतपणे जगले. मालकाने पुन्हा कधीही त्याला मारले नाही.

* * * * *

कुशल शिकारी आणि चतुर कोळी

फार फार वर्षांपूर्वी जपान सूर्यदेवता, सुप्रसिद्ध अमातेरासूच्या वंशापासून चवथा मिकोतो (किंवा ऑगुस्तनेस) होहोदेमीच्या शासनात होता. तो केवळ पूर्वजांसारखा सुंदर व रूपवानच नव्हता तर शक्तीमान आणि शूरही होता आणि त्या प्रदेशात सर्वात मोठा शिकारीही होता. शिकारीतील अद्वितीय कौशल्यामुळे त्याला "यामा-साची-हिको" किंवा "पर्वताचा कुशल शिकारी" असे म्हणायचे.

त्याचा मोठा भाऊ कुशल मच्छीमार होता. मच्छीमारीत तो प्रतिस्पध्यांपेक्षा सरस होता, म्हणूनच त्याला "युन्नी-साची-हिको" किंवा समुद्राचा कुशल कोळी नाव पडले होते. अशा रितीने ते भाऊ आनंदी जीवन जगत होते. आपआपल्या व्यवसायात मजा लुटत होते आणि प्रत्येकजण ज्याचा त्याचा मार्ग अनुसरत होते. तेव्हा दिवस प्रसन्नतेने आणि भराभर निघून जात होते, एक शिकार करीत होता तर दुसरा मासेमारी करीत होता.

एके दिवशी कुशल शिकारी त्याच्या भावाकडे, चतुर कोळयाकडे आला आणि म्हणाला,

"बरं का माझ्या भावा, मी बघतो मासेमारीची काठी घेऊन तू रोज समुद्रात जातोस आणि परत येताना खच्चून भरून मासे घेऊन येतोस आणि माझ्या बाबतीत म्हणशील तर मी रोज धनुष्यबाण घेऊन पर्वतांवर आणि दऱ्याखोऱ्यांत जाऊन जंगली प्राण्यांची शिकार करतो. बऱ्याच दिवसापासून आपण आपआपले व्यवसाय करून कंटाळलो आहोत, तू मच्छीमारी करून आणि मी शिकार करून. आपण आपले व्यवसाय बदलायचे शहाणपणाचे होणार नाही काय? तू पर्वतांवर जाऊन शिकार करण्याचा प्रयत्न करावा आणि मी समुद्रावर जाऊन मच्छीमारी करावी का?"



चतुर कोळयाने त्याच्या भावाचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले आणि एक क्षणभर तो विचारमग्न झाला, पण शेवटी तो उत्तरला,

“ओ, होय, का नाही? तुझी कल्पना काही फारशी वाईट नाही. मला तुझे धनुष्यबाण दे आणि मी पर्वतांकडे जातो खेळ म्हणून शिकारीला.”

म्हणून त्यांच्या बोलण्यातून अशी तडजोड झाली आणि सारं काही छान घडेल याचं स्वप्न बघण्यासाठी दोघे भाऊ प्रत्येक जण एक दुसऱ्याचा व्यवसाय करण्यासाठी निघाले. त्यांच्यासाठी हे खूपच अजाणतेपणाचे होते, कारण कुशल शिकाऱ्याला मच्छीमारीविषयी काहीच ठाऊक नव्हते आणि तो चतुर कोळी तापट स्वभावाचा होता, त्याला शिकारीबद्दल बरीच माहिती होती.

त्या कुशल शिकाऱ्याने त्याच्या भावाचे मासे पकडण्याचे मौल्यवान गळ आणि काठी घेतली आणि समुद्र किनाऱ्यावर गेला आणि खडकावर बसला. त्याने गळाला आमिष लावले आणि वेंधळेपणाने पाण्यात फेकले. तो बसला आणि थोडेसे वरखाली होणाऱ्या आणि पाण्यावर तरंगणाऱ्या गोष्टींकडे बघत छान मासे येतील आणि पकडले जातील ही आशा करू लागला. प्रत्येक वेळेला ती तरंगती वस्तू हलायची तेव्हा तो ती काठी ओढायचा आणि तिच्या टोकाला मासा न दिसता फक्त गळाला लागलेले आमिषच दिसायचे. जर त्याला मासे कसे पकडावेत हे योग्य तऱ्हेने ठाऊक असते तर तो खूप मासे पकडू शकला असता पण जरी तो त्या प्रदेशातील उत्कृष्ट शिकारी होता तरी तो सर्वात जास्त गबाळ्या मच्छीमार होता.

जेव्हा तो खडकावर मासे मारण्याची काठी धरून बसला तेव्हा संपूर्ण दिवस नशीब बदलायची व्यर्थपणे वाट पाहण्यातच गेला. शेवटी अंधार पडत आला होता, आणि सायंकाळ झाली तरीही तो एकही मासा पकडू शकला नाही. घरी जाण्यापूर्वी तो तयारी करून उठला आणि त्याला आढळून आले की त्याचा गळ हरवला होता. त्याच्या हातातून तो केव्हा पडला हे त्याला कळलेच नाही.

त्याला खूप काळजी वाटायला लागली होती. कारण त्याला ठाऊक होते की गळ हरवल्याचे पाहून त्याचा भाऊ त्याला खूप रागावणार होता, कारण त्याच्याजवळ एकच गळ होता आणि सर्व गोष्टींपेक्षा तो त्याला खूप महत्त्व देत होता. तो कुशल शिकारी आता खडकावर आणि वाळूवर तो हरवलेला गळ शोधायच्या कामाला लागला. जेव्हा तो मागे-पुढे शोधू लागला तेव्हा तो कुशल मच्छीमार तेथे पोहोचला. शिकार करताना त्यादिवशी तो शिकार शोधण्यात अयशस्वी झाला होता आणि केवळ चिडलेलाच नव्हता तर भयंकर रागावलेलाही दिसत होता. जेव्हा कुशल शिकाऱ्याला किनाऱ्यावर काहीतरी शोधताना त्याने पाहिले तेव्हा त्याला कळले की काहीतरी अनिष्ट घडलेले आहे, म्हणून तो लगेच म्हणाला,

“काय करीत आहेस तू माझ्या भावा?” तो कुशल शिकारी जरा भीतभीतच पुढे गेला, कारण त्याच्या रागाला तो खूप घाबरला होता, आणि म्हणाला, “अरे माझ्या भावा, मी खरोखरच काहीतरी वाईट केले आहे.”

“काय झालं? काय केलंस तू? मोठ्या भावाने अधीरतेने विचारले.

“मी तुझा मासेमारीचा मौल्यवान गळ हरविला—”

तो बोलत असतानाच त्याच्या भावाने त्याला थांबविले आणि तो जोरात किंचाळला, “काय? माझा गळ हरवला? तरी मला वाटलंच होतं ह्याच कारणासाठी, जेव्हा तू मला हा तुझा व्यवसाय बदलण्याचा बेत सुचविला तेव्हा खरोखर ह्या विरूद्ध होतो मी, पण तुला असं वाटलं की मी तुझं ऐकेन आणि तुझ्या इच्छेप्रमाणे तुला अनुमती देईन. अपरिचित काम करण्याच्या प्रयत्नात झालेली चूक लवकरच दिसून आली! आणि तू ते वाईट पद्धतीने केलेस. माझा गळ तुला सापडेपर्यंत मी तुझे धनुष्यबाण तुला परत करणार नाही. बघ, तो शोध आणि पटकन मला परत कर.”

त्या चतुर शिकाऱ्याला कळून चुकले की हे सर्व घडण्याला तोच दोषी ठरला आहे. आणि त्याने मानभंगासह तिरस्कारयुक्त राग तक्रार न करता सहन केला. त्याने त्या गळाचा सगळीकडे काळजीपूर्वक कसून शोध घेतला पण त्याला तो कोठेच सापडला नाही. शोध घेण्याच्या सर्व आशा त्याला सोडून देणे भाग पडले. नंतर तो घरी गेला, उद्विग्नतेने त्याच्या आवडत्या तलवारीचे तुकडे केले आणि त्यापासून पाचशे गळ बनविले.

ते घेऊन तो संतापलेल्या भावाकडे गेला आणि त्याची क्षमा मागत ते हरवलेल्या गळाच्या जागी स्विकारण्यासाठी त्याची मनधरणी केली. त्याचा काही उपयोग झाला नाही. त्याच्या भावाने त्याचे काही एक ऐकले नाही, त्याची विनंती त्याने धुडकावून लावली.

त्या चतुर शिकाऱ्याने दुसरे पाचशे गळ बनविले आणि पुन्हा त्याच्या भावाकडे नेऊन त्याचे पाय धरून क्षमा मागितली.

“तू जरी दहा लाख गळ बनविले,” तो चतुर कोळी मान हलवित म्हणाला, “त्याचा मला काही उपयोग नाही. माझा स्वतःचा गळ तू मला परत आणून देत नाहीस तोपर्यंत मी तुला क्षमा करणार नाही.”

त्या चतुर कोळ्याच्या रागाचे सांत्वन काही केल्या झाले नाही, कारण त्याचा स्वभाव वाईट होता, आणि त्याच्या भावाच्या सद्‌गुणांमुळे तो नेहमी त्याचा तिरस्कार करायचा आणि त्याचा मासे मारण्याचा गळ हरवल्याच्या सबबीला धरून त्याने त्याला मारून टाकण्याचा आणि जपानच्या राजकर्त्याची जागा बळकावण्याचा कट रचला. चतुर शिकाऱ्याला हे पूर्णपणे चांगलेच ठाऊक होते, पण तो काहीच बोलू शकला नाही. लहान भाऊ असल्यामुळे तो त्याच्या मोठ्या भावाची आज्ञा पाळायचा. म्हणून तो परत एकदा समुद्र किनाऱ्यावर गेला आणि गळ शोधू लागला. तो खूप विषण्ण झाला होता. कारण आता त्याच्या भावाचा गळ सापडण्याच्या साऱ्या आशा मावळल्या होत्या. जेव्हा तो समुद्र किनाऱ्यावर उभा होता तेव्हा पूर्णपणे गोंधळून गेला होता. त्यानंतर सर्वोत्कृष्ट काय करता येईल हे स्वतःलाच विचारत होता. हातात काठी घेतलेला एक म्हातारा अचानक त्याच्यापुढे प्रगट झाला. त्यानंतर त्या चतुर शिकाऱ्याला तो म्हातारा जेव्हा आला तेव्हा तो कोठून आला हे त्याला आठवत नव्हते. किंवा तो तेथे कसा हेही कळले नव्हते. त्याने आकस्मिक वर बघितले तर तो म्हातारा त्याच्याकडे येताना त्याला दिसला.

“तू होहोदेमी, ऑगुस्तनेस, काहीवेळा तुला कुशल शिकारी म्हणतात, नाही का?” त्या म्हाताऱ्याने विचारले. “अशा ठिकाणी तू एकटा काय करीत आहेस?”

“होय, मी तोच आहे.” त्या दुःखी तरूणाने उत्तर दिले, “दुर्दैवाने मासेमारी करताना माझ्या भावाचा मौल्यवान गळ माझ्याकडून हरवला. मी ह्या किनाऱ्यावर

सगळीकडे शोधले, पण हाय! मला तो सापडू शकला नाही. मी खूप त्रस्त झालो आहे. कारण जोपर्यंत तो मला प्राप्त होत नाही तोपर्यंत माझा भाऊ मला माफ करणार नाही. पण तुम्ही कोण आहात?"

"माझं नाव शिवोझुचिनो ओकिना आहे, आणि मी येथे किनाऱ्याच्या जवळच राहतो. तुझ्यावर जे दुर्दैव कोसळले आहे ते ऐकून मला फार वाईट वाटले. तू खरोखरच काळजीत पडलेला असशील, पण मला जे काही वाटते ते मी तुला सांगतो, तो गळ येथे कोठेच नाही—एकतर तो समुद्राच्या तळाशी गेला असावा किंवा एखाद्या माशाने तो गिळला असावा व तो त्याच्या शरीरात असावा आणि ह्या कारणामुळे जरी तू तुझं संपूर्ण आयुष्य खर्ची घातलं तरी तो तुला कधीच सापडणार नाही."

"मग मी काय करू शकतो?" त्या दुःखी माणसाने विचारले.

"तू खाली रीन गू कडे जावे आणि समुद्राचा राजा ड्रॅगन रिनजिनला तुझ्या संकटाबद्दल सांगावे आणि तुझ्यासाठी त्याला गळ शोधण्याची विनंती करावी. मला वाटतं की हा उत्तम मार्ग असेल."

"तुमची कल्पना उत्कृष्ट आहे," कुशल शिकारी म्हणाला, "पण मला भीती वाटते मी त्या समुद्राच्या राजाच्या राज्यात जाऊ शकत नाही, कारण मी नेहमी असं ऐकलं आहे की ते समुद्राच्या तळाशी वसलेले आहे."

"ओ, तुझं तिथे जाणं काही अवघड नाही," म्हातारा म्हणाला, "तुला ज्यावर स्वार होऊन समुद्रातून जाता येईल असं काहीतरी मी लवकरच बनवितो."

"मी तुमचा आभारी आहे," तो कुशल शिकारी म्हणाला, "तुम्ही जर असा दयाळूपणा दाखविला तर मी तुमचा कृतज्ञ राहीन."

तो म्हातारा लगेच कामाला लागला, आणि त्याने लवकरच एक परडी बनविली आणि त्या चतुर शिकाऱ्याला दिली. त्याने ती आनंदाने स्विकारली, पाण्यावर ठेवली, आणि तिच्यावर चढला आणि निघायची तयारी केली. ज्या म्हाताऱ्याने त्याला मदत केली त्याचा निरोप घेतला आणि त्याला सांगितले की जेव्हा मला तो गळ सापडेल आणि जपानला परत येऊ शकेन आणि भावाच्या रागाला न भीता मी तो परत करीन तेव्हा निश्चितच मी तुम्हाला ह्या कामगिरीबद्दल इनाम देईन. त्या म्हाताऱ्याने ज्या दिशेला जायला हवे तिकडे निर्देश केला आणि सांगितले की रिन गूच्या राज्यात कसे पोहोचायचे. आणि समुद्रावर जाण्यासाठी तो स्वार झालेला त्याने पाहिला जी परडी छोट्या नावेसदृश होती.

त्याच्या मित्राने बनवून दिलेल्या परडीवर जितक्या घाईने स्वार होता येईल तितक्या घाईने तो शिकारी स्वार झाला. त्याची विचित्र नाव तिच्या स्वेच्छेने पाण्यामधून जाताना दिसली. त्याने केलेल्या अपेक्षेपेक्षा अंतर खूप कमी होते कारण फारच कमी तासात त्याला त्या राजाच्या राजवाड्याचे प्रवेशद्वार आणि छपरे दृष्टीस पडली. किती भव्य राजवाडा होता तो, त्याच्या अगणित उतरत्या छपरासह आणि गृहप्रासाद शिखरांसह. त्याची प्रवेशद्वारे प्रशस्त होती आणि करड्या रंगाच्या दगडाच्या भिंती होत्या. तो लवकरच जमिनीवर पोहोचला आणि किनाऱ्यावर परडी ठेवीत प्रशस्त द्वाराकडे चालत गेला. प्रवेशद्वाराचे स्तंभ सुरेख लाल पोवळ्यापासून बनविलेले होते, आणि प्रवेशद्वार सर्व प्रकारच्या झळाळणाऱ्या रत्नांनी सुशोभित केलेले होते. अजस्त्र कात्सुरा वृक्षांनी ते झाकोळून गेले होते. आपल्या नायकाने त्या समुद्राखाली असलेल्या आश्चर्यकारक सागरराजाच्या राजवाड्याबद्दल ऐकले होते. अनेकदा थोड्या खऱ्या ऐकलेल्या गोष्टी तो आता पहिल्यांदाच प्रत्यक्षात बघत होता.

त्या कुशल शिकाऱ्याला प्रवेशद्वाराच्या आत जायचे होते आणि मग त्याने पाहिले की ते घट्ट बंद केलेले होते. आणि ज्याला ते उघडायला सांगावे असे कोणीही तेथे नव्हते म्हणून तो काय करावे ह्या विचारातच तेथे थांबला. प्रवेशद्वारासमोर वृक्षांच्या छायेखाली ताज्या पाण्याने पूर्णपणे भरलेली विहीर त्याच्या दृष्टीस पडली. कोणीतरी नक्कीच काहीवेळाने त्या विहीरीतून पाणी काढण्यासाठी येईल असे त्याला वाटले. नंतर तो झाडावर चढला आणि विहीरीवर लोंबणाऱ्या एका फांदीवर बसला

आणि काय घडू शकते ह्याची वाट बघू लागला. आणि तेवढ्यात त्याला तेथे दोन स्त्रिया येताना दिसल्या. आता मिकोतोने (ऑगुस्तनेस) रिन गू हे समुद्र तळाशी असलेले ड्रॅगनराजाचे राज्य आहे असे अनेकदा ऐकले होते. आणि अर्थातच ड्रॅगन आणि तशाच प्रकारच्या भयंकर प्राण्यांचे वास्तव्य तेथे असणार हे तो गृहित धरून होता पण म्हणून त्याने त्या सुंदर राजकन्या बघितल्यावर त्याला वाटले की तो ज्या जगात राहत होता तेथे त्याने असे लावण्य क्वचितच पाहिले होते. ते बघितल्यावर त्याला पराकाष्ठेचे आश्चर्य वाटले आणि तो विचार करू लागला की ह्याचा अर्थ काय होऊ शकतो.

तो एक शब्दही बोलला नाही, पण झाडाच्या पालवीतून त्यांच्याकडे अनिमिष नेत्रांनी बघत वाट पाहू लागला की आता त्या काय करतील. त्याने पाहिले की हातात सोनेरी बादल्या घेऊन त्या येत होत्या. हळुवारपणे आणि डौलाने त्यांच्या मागे लोंबत जाणाऱ्या वस्त्रासह त्या विहीरीजवळ पोहोचल्या. कात्सुराच्या झाडाच्या सावलीत थांबल्या. आणि कोणी परका माणूस आपल्याकडे बघत आहे हे ध्यानीमनी नसताना त्या पाणी काढणार होत्या. कारण त्या कुशल शिकाऱ्याने तो जेथे बसला होता तेथे झाडाच्या फांद्यांमध्ये स्वतःला लपवून ठेवले होते.

जशा त्या दोघी स्त्रिया विहीरीच्या काठावर ओणव्या होऊन त्यांच्या सोनेरी बादल्या नेहमीप्रमाणे झाडाच्या सावलीत खाली सोडत होत्या तेव्हा त्यांना खोल शांत पाण्यात झाडाच्या फांद्यांमधून त्यांच्याकडे टक लावून पाहणाऱ्या सुंदर तरूणाच्या चेहऱ्याचे प्रतिबिंब दिसले. कधी न पाहिलेल्या मर्त्य माणसाचा चेहरा त्यांनी पाहिला आणि त्या खूप घाबरल्या आणि हातातील बादल्यासह मागे सरल्या. त्यांनी त्या विलक्षण प्रतिबिंबाच्या कारणाकडे बुजरेपणाने वर दृष्टीक्षेप टाकला. तेव्हा झाडामध्ये बसून त्यांच्याकडे आश्चर्य आणि कौतुकाने खाली बघत असलेला कुशल शिकारी त्यांना दिसला. त्यांनी त्याला समोरासमोर बघितले आणि त्यांच्या जिभा निश्चल झाल्या. आश्चर्याने त्यांच्या तोंडून शब्दही फुटू शकला नाही.

त्याचा त्यांना सुगावा लागला असे मिकोतोला आढळून आले तेव्हा त्याने झाडावरून हळूच खाली उडी मारली आणि तो म्हणाला,

“मी एक प्रवासी आहे आणि मला खूप तहान लागलेली असल्याने तहान भागविण्यासाठी मी ह्या विहीरीजवळ आलो पण विहीरीतून पाणी काढण्यासाठी मला बादली सापडली नाही. म्हणून मी त्रासून झाडावर चढलो आणि कोणी येते की नाही ह्याची वाट पाहत बसलो. जेव्हा मी तहानलेलो आणि अधीर होऊन वाट बघत होतो तेव्हा तुम्ही कुलीन स्त्रिया प्रकट झाल्या, जणू काही माझ्या गरजेचे उत्तर म्हणून. त्या कारणाने मी तुमच्या दयेची याचना करतो कारण मी ह्या परक्या प्रदेशात आलेला तहानलेला प्रवासी आहे.”

त्याच्या ओजस्वितेने आणि विनम्रतेने त्यांच्या भीरूतेवर मात केली आणि स्तब्धपणे वाकून त्या दोघी पुन्हा विहीरीकडे गेल्या आणि त्यांच्या सोनेरी बादल्यांनी पाणी शेंदून त्यांनी ते रत्नजडीत पेल्यात ओतून त्या परदेशीला दिले.

आदराचे आणि आनंदाचे प्रतिक म्हणून त्याने दोन्ही हाताची ओंजळ करून कपाळापर्यंत उंच धरली आणि त्याला खूप तहान लागल्यामुळे त्याने घटाघटा ते पाणी प्यायले. पाण्याचा मोठा घोट संपवल्यावर तो पेला त्याने खाली विहीरीच्या काठावर ठेवला, आणि त्याने त्याची छोटीशी तलवार काढली व त्याच्या गळयाभोवती रुळणाऱ्या व छातीवर असलेल्या रत्नहारामधून एक विलक्षण वक्राकार रत्न (मागातामा) कापून घेतले. ते रत्न त्याने त्याच पेल्यात ठेवले आणि त्यांना ते परत देऊन, नम्रतेने खाली वाकून अभिवादन करून म्हणाला,

“हे माझ्या कृतज्ञतेचे प्रतिक आहे!”

त्या दोन्ही स्त्रियांनी तो पेला घेतला आणि त्याने त्यात काय ठेवले हे पाहू लागल्या, कारण त्यांना ते काय आहे हे अजूनही कळले नव्हते. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला कारण त्याच्या तळाशी रत्न ठेवलेले होते.

“कोणीही सर्वसाधारण मनुष्य असे रत्न विनामूल्य देणार नाही. आपण कोण आहात हे सांगून आम्हाला उपकृत करणार नाहीत का?” ती ज्येष्ठ युवती म्हणाली.

“निश्चितच,” तो कुशल शिकारी म्हणाला. “मी होहोदेमी, चौथा मिकोतो, जपानमध्ये मला चतुर शिकारीही म्हणतात.”

“तुम्ही खरोखरच, सूर्यदेवता अमातेरासूचे नातू होहोदेमी आहात?” जी आधी बोलली त्या युवतीने विचारले. “मी सागराचा राजा रिन जिनची ज्येष्ठ कन्या आहे, माझे नाव राजकुमारी तायोतामा आहे.”

“आणि,” ती कनिष्ठ कन्या म्हणाली, जिला शेवटी शब्द सापडले होते, “मी तिची बहीण आहे राजकुमारी तामायोरी.”

“तुम्ही खरोखर सागरराजा रिन जिनच्या मुली आहात? तुम्हाला भेटल्यावर मला किती आनंद झाला आहे हे मी तुम्हाला सांगू शकत नाही.” कुशल शिकारी म्हणाला, आणि त्यांच्या उत्तराची वाट न पाहता तो पुढे बोलू लागला,

“एके दिवशी मी माझ्या भावाचा गळ घेऊन मासे पकडायला गेलो आणि तो गळ हरवला, कसा ते मला खात्रीने सांगता येऊ शकत नाही. माझा भाऊ त्या मासे पकडायच्या गळाला त्याच्या सर्व मालमत्तेपेक्षा जास्त किंमत देतो, ही सर्वात मोठी आपत्ती माझ्यावर कोसळली आहे. जोपर्यंत मला तो गळ परत सापडत नाही तोपर्यंत मी क्षमा मिळविण्याची अपेक्षाच करू शकत नाही, कारण मी हे जे काही केले त्याबद्दल तो खूप रागावला आहे. मी त्याचा खूप वेळा शोध घेतला पण मला तो सापडू शकला नाही, म्हणून मी खूप त्रासून गेलो आहे. जेव्हा मी मोठ्या दुःखात तो शोधत होतो, तेव्हा मला एक सूज्ञ म्हातारा भेटला आणि त्याने मला रिन गू कडे समुद्राचा ड्रॅगन राजा रिनजिनकडे जाऊन त्यांची मदत घ्यावी हे सर्वात उत्तम राहील असे सांगितले. त्या दयाळू म्हाताऱ्याने येथपर्यंत कसे यायचे हेही मला सांगितले. आता तुम्हाला कळले असेलच की मी येथे का आणि कसा आलो ते. मला रिनजिनला विचारायचे

आहे की त्यांना तो गळ कोठे आहे हे ठाऊक आहे का? मला तुम्ही तुमच्या वडिलांकडे घेऊन जाण्याची कृपा कराल का? आणि तुम्हाला वाटतं का की ते मला भेटतील असं?" त्या कुशल शिकाऱ्याने मोठ्या चिंतेने विचारले.

राजकुमारी तायोतामाने त्याची दीर्घ कथा ऐकली आणि नंतर ती म्हणाली,

"माझ्या वडिलांना भेटणं तितकसं सोपं नाही, पण तुम्हाला भेटण्यात त्यांना खूप आनंद वाटेल. तुमच्या सारख्या महान आणि श्रेष्ठ अमातेरासूंच्या नातवाला पाहून त्यांना उत्तम भाग्याचा लाभ झाला असेच त्यांना वाटेल, ह्याची खात्री आहे मला. समुद्राच्या तळाशी यावे." आणि नंतर तिच्या लहान बहिणीकडे वळत ती म्हणाली,

"तुला असं वाटत नाही का, तामायोरी?"

"होय, खरंच," राजकुमारी तामायोरीने गोड आवाजात उत्तर दिले.

"तू म्हटल्याप्रमाणे, मिकोतोचे आपल्या घराकडे स्वागत करण्यापेक्षा मोठा सन्मान ठाऊक असू शकत नाही."

"मग मी तुम्हाला विनंती करतो की कृपया मला तेथे घेऊन चला." असे तो कुशल शिकारी म्हणाला.

"मिकोतो (ऑगस्तनेस) यावे तुम्ही कृपया," दोघी बहिणी खाली वाकून म्हणाल्या, त्यांनी प्रवेशद्वारातून त्याला आत नेले.

लहान बहिणीने त्या कुशल शिकाऱ्याला तिच्या बहिणीकडे सोपविले आणि त्यांच्यापेक्षा जलद चालून ती सागराच्या राजाच्या राजवाड्यात आधी पोहोचली आणि पटापट चालत जाऊन ती वडिलांच्या खोलीत गेली. प्रवेशद्वाराजवळ त्यांच्या बाबतीत जे काही घडले ते सर्व तिने वडिलांना सांगितले आणि तिची बहिण

ऑगस्तनेसला घेऊन येत आहे असेही सांगितले. समुद्राच्या ड्रॅगन राजाला ती बातमी ऐकून आश्चर्य वाटले कारण क्वचितच, कदाचित कितीतरी शेकडो वर्षांनी एकदाच त्या समुद्र राजाच्या राजवाड्याला भेट द्यायला एक मर्त्य माणूस येत होता.

रिन जिनने क्षणाचाही विलंब न करता हाताने टाळ्या वाजविल्या आणि राजवाड्यातील राजदरबारी आणि सेवक वर्ग आणि समुद्रातील मुख्य माशाला एकत्रित बोलावणे पाठविले आणि गंभीरपणे त्यांना सांगितले की सूर्यदेवतेचे नातू अमातेरासू राजवाड्याकडे येत आहेत. आणि ऑगस्टच्या पाहुण्याची आदरशील आणि नम्रतेने सेवा करावी. त्याने त्या सर्वांना आज्ञा केली की कुशल शिकाऱ्याचे राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर स्वागत करावे.

रिनजिनने शिष्टाचारानुरूप पोषाख घातला आणि त्याच्या स्वागतासाठी बाहेर आला.

थोड्याच क्षणात राजकुमारी तायोतामा आणि कुशल शिकारी प्रवेशद्वाराजवळ पोहोचले आणि समुद्राचा राजा आणि त्याच्या पत्नीने जमिनीवर वाकून त्याला नमस्कार केला आणि त्यांना भेटायला आल्याबद्दल सन्मानाने त्याचे आभार मानले. समुद्राच्या राजाने त्याला अतिथीगृहाकडे नेले आणि उच्चासनावर बसवून आदराने नमस्कार करून म्हणाला,

“मी समुद्राचा राजा ड्रॅगनराजा रिन जिन आहे आणि ही माझी पत्नी आहे. तुम्ही आमची नेहमी आठवण ठेवावी ही सदिच्छा!”

तुम्ही खरोखर समुद्राचे राजे रिनजिन आहात ना, ज्यांच्याबद्दल मी अनेकदा ऐकले आहे? कुशल शिकाऱ्याने यजमानाला आदराने वंदन करून उत्तर दिले. “अनपेक्षित भेट देऊन मी तुम्हाला त्रास देत आहे त्याबद्दल मी तुमची क्षमा मागतो.” आणि पुन्हा वाकून त्याने त्या समुद्रराजाचे पुन्हा आभार मानले.

“तुम्हाला आमचे आभार मानायची आवश्यकता नाही,” रिनजिन म्हणाले, “उलट तुम्ही येथे आलात त्याबद्दल मीच तुमचे आभार मानायला हवेत. जरी समुद्राचा राजवाडा गरीब स्थान असले तरी तुम्ही त्याचा येथे येऊन बहुमान केला, बघा जर तुम्ही तुमची भेट लांबविली तर मी तुमचा अधिक बहुमानाने आदर सत्कार करीन.”

समुद्रराजा आणि कुशल शिकाऱ्यामध्ये खूप स्नेह निर्माण झाला. शेवटी समुद्रराजाने हातांनी टाळ्या वाजविल्या आणि नंतर माशांचा प्रचंड लवाजमा तेथे प्रकट झाला. सर्वांनी समारंभाचे पोषाख घातलेले होते, आणि त्यांच्या पंखात विविध तबके होती ज्यात समुद्रातील सर्व प्रकारची पक्वान्ने वाढलेली होती. राजा आणि त्यांचा अतिथी ह्यांच्या पुढ्यात मोठी मेजवानी वाढली गेली. सेवक मासे सर्वोत्कृष्ट माशांमधून निवडलेले होते. म्हणून तुम्ही कल्पना करू शकाल की समुद्रातील प्राण्यांची ती रचना भव्य आणि अद्‌भूत मालिका त्या दिवशी कुशल शिकाऱ्याच्या प्रतिक्षेत होती. राजवाड्यातील सर्वजण तो खूप सन्माननीय पाहुणा आहे हे दाखविण्याचा व त्याला खूश करण्याचा होईल तेवढा प्रयत्न करीत होते. मोठा भोजन समारंभ जो दीर्घकाळ चालला होता त्या दरम्यान काही संगीताचा कार्यक्रम सादर करण्यासाठी रिनजिनने त्याच्या मुलींना आज्ञा केली आणि त्या दोन्ही राजकुमारींनी येऊन कोतो (जपानी तंतुवाद्य) वाजवून आळीपाळीने गायन आणि नृत्याचा कार्यक्रम केला. वेळ खूपच मौजमजेत निघून गेला आणि तेथील मनोरंजनात तो कुशल शिकारी स्वतःला हरवून बसला होता आणि तो समुद्राच्या राजाच्या साम्राज्यात कशासाठी आला होता आणि त्याला काय त्रास होता हे तो सर्व विसरून गेला होता त्या परिमाशांच्या देशात! अशा प्रकारच्या अद्‌भूत रम्य स्थळांबद्दल कोणी कधी ऐकले असेल का? पण मिकोतोला लगेच आठवले की कोणत्या गोष्टीने त्याला तेथे आणले होते, आणि तो त्याच्या यजमानाला म्हणाला,

“महाराज रिनजिन, कदाचित तुमच्या मुलींनी तुम्हाला सांगितलेच असेल की एके दिवशी मासे पकडताना माझ्याकडून माझ्या भावाचा मासे पकडण्याचा गळ

हरवला. तो परत मिळविण्यासाठी मी आलो आहे. आपल्या प्रजेपैकी कोणाला तरी तो दिसला असेल जो समुद्रात पडला होता, तरी आपण त्यांच्याकडे चौकशी करावी अशी मी आपल्याला विनंती करू शकतो का?"

"निश्चितच," तो परोपकारी समुद्राचा राजा म्हणाला, "मी त्वरित त्या सर्वांना येथे बोलावणे पाठवतो आणि विचारतो."

त्याची आज्ञा होत नाही तोच अष्टपाद, चेहऱ्याभोवती लांब भुजा असलेला मांसाहारी मासा, छोटा मासा, वृषभ पुच्छ मासा, वाम, झिंगा, पारदर्शक मासा, चपटा मासा आणि इतर सर्व प्रकारचे अनेक मासे आले आणि त्यांचा राजा रिनजिन ह्याच्या समोर क्रमाने पंख मांडून बसले. नंतर तो समुद्राचा राजा गंभीरपणे बोलू लागला,

"आपले पाहुणे जे तुमच्यासमोर बसले आहेत ते अमातेरासूचे नातू राजश्री आहेत, त्यांचे नाव चौथे ऑगस्तनेस होहोदेमी असून पर्वतांचा कुशल शिकारी म्हणूनही त्यांना संबोधितात. जेव्हा ते जपानच्या समुद्र किनाऱ्यावर मासे पकडीत होते तेव्हा त्यांच्या भावाचा गळ त्यांच्याजवळून चोरीस गेला. ते येथे समुद्रतळाशी आपल्या राज्यात आले कारण त्यांना असे वाटते की तुमच्यापैकी एका माशाने खोडकर खेळ करून त्यांचा गळ घेतलेला आहे. जर तुमच्यापैकी कोणी ते केलं असेल तर तुम्ही तो ताबडतोब परत करायला पाहिजे, किंवा तुमच्यापैकी ज्याला कोणाला तो चोर कोण आहे हे माहित असेल त्याने कमीतकमी त्याचे नाव तरी सांगावे आणि तो कोठे आहे ते सांगावे.

सर्व माशांना ते शब्द ऐकून आश्चर्य वाटले आणि काहीवेळ ते काहीच बोलले नाहीत. ते एकमेकांकडे आणि ड्रॅगन राजाकडे बघत बसले. शेवटी चेहऱ्याभोवती भुजा असलेला मांसाहारी मासा पुढे आला आणि म्हणाला,

“मला वाटते ताईच (ताज्या पाण्यातला तांबडा मासा) चोर असला पाहिजे. त्यानेच तो गळ चोरलेला आहे!”

“काय पुरावा आहे तुझ्याजवळ?” राजाने विचारले.

“काल संध्याकाळपासून ताई काहीच खाऊ शकला नाही आणि असे वाटत होते की त्याला घशाचा खूप त्रास होतो आहे! ह्या कारणास्तव मला वाटते की तो गळ कदाचित त्याच्या घशात असेल. तुम्ही त्याला ताबडतोब बोलावणे पाठविल्यास बरे होईल!”

सर्वांचे त्यावर एकमत झाले आणि म्हणाले,

“हे निश्चितपणे विचित्र आहे की ताई हाच एक मासा आहे ज्याने तुमच्या हुकूमाची आज्ञा पाळली नाही. त्याला बोलावणे पाठवून तुम्ही ह्या गोष्टीची चौकशी केली तरच आमचे निरपराधीपण सिद्ध होईल.”

“होय,” समुद्राचा राजा म्हणाला, “ताई आला नाही हे विचित्रच आहे कारण तो सर्वांच्या आधी येथे असायला हवा होता. बोलवा त्याला ताबडतोब!”

राजाच्या आज्ञेची वाट न पाहताच, चेह़ऱ्याभोवती भुजा असलेला मांसाहारी मासा ताईच्या निवासस्थानाकडे आधीच निघाला होता आणि आता तो परतला तो ताई माशाला घेऊनच. त्याने त्याला राजापुढे नेले.

ताई तेथे घाबरलेला आणि अस्वस्थ दिसत होता. तो खरोखरच दुःखात होता, कारण त्याचा नेहमीचा लाल चेहरा निस्तेज झाला होता आणि त्याचे डोळे जवळ जवळ बंद झाले होते आणि ते नेहमीपेक्षा अर्ध्या आकारात दिसत होते.

“उत्तर दे ताई!” राजा ओरडला, मी आज तुला येथे बोलावणे पाठविले तरी उत्तर देण्यासाठी का आला नाहीस?”

“मी कालपासून आजारी आहे,” ताईने उत्तर दिले, “म्हणूनच मी येऊ शकलो नाही.”

“एक शब्द बोलू नकोस दुसरा!” रिनजिन रागाने ओरडला. मिकोतोचा गळ चोरल्याबद्दल तुला ही देवाने दिलेली शिक्षा आहे.”

“हे अगदी खरे आहे!” ताई म्हणाला, “तो गळ अजूनही माझ्या घशात आहे. तो मी बाहेर काढण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला पण व्यर्थ. मी खाऊ शकत नाही आणि मी कसाबसा श्वास घेऊ शकतो. प्रत्येक क्षणाला मला दम कोंडल्यासारखे वाटते आणि काहीवेळा मला त्यापासून खूप त्रास होतो. मिकोतोचा गळ चोरण्याचा माझा हेतू नव्हता. मी निष्काळजीपणे ते पाण्यात दिसलेले आमिष हिसकले आणि तो गळ बाहेर आला आणि माझ्या घशात अडकला. म्हणून मी आशा करतो की तुम्ही मला माफ कराल.”

आता तो चेहऱ्याभोवती भुजा असलेला मांसाहारी मासा पुढे आला आणि राजाला म्हणाला,

“मी जे काही म्हणालो होतो ते बरोबरच होते. बघा तुम्ही त्या ताईच्या घशात तो गळ अजूनही अडकलेलाच आहे. मला अशी आशा आहे की मी मिकोतोच्या उपस्थितीत तो गळ बाहेर ओढून काढेन आणि आपण तो त्यांना सुरक्षितपणे परत करू!”

“ओ, कृपा करून घाई करा आणि तो गळ बाहेर ओढून काढा!” ताई कळवळून म्हणाला, कारण त्याच्या घशात पुन्हा वेदना व्हायला लागल्या होत्या. “मला सुद्धा मिकोतोचा गळ परत करायचाच आहे.”

“ठीक आहे ताई सान,” चेहऱ्याभोवती भुजा असलेला त्याचा मित्र मांसाहारी मासा म्हणाला आणि नंतर ताईचा जबडा जेवढा रुंद उघडता येईल तेवढा रुंद उघडून ताईच्या घशात खोल एक भुजा घातली आणि त्या दुखणेकऱ्याच्या मोठ्या जबड्यातून सहजगत्या आणि पटकन गळ बाहेर काढला. नंतर त्याने तो स्वच्छ धुतला आणि राजाकडे आणून दिला.

रिनजिनने त्याच्या प्रजेकडून तो आकडा घेतला आणि आदराने कुशल शिकारी (मिकोतो किंवा मासे ज्याला ऑगस्तनेस म्हणायचे) ज्याला तो गळ परत मिळाल्यावर परमोच्च आनंद झाला होता त्याला तो परत केला. त्याने रिनजिनचे अनेकदा आभार मानले, त्याचा चेहरा कृतज्ञतेने उजळून निघाला आणि तो म्हणाला की त्याच्या दीर्घ शोधाच्या गोड शेवटाचे श्रेय राजाच्या सूज्ञ सत्तेला आणि दयाळूपणाला जाते.

रिनजिनने आता ताईला शिक्षा करण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली, पण कुशल शिकाऱ्याने त्याला कळकळीची विनंती केली की त्याने हरविलेला गळ आनंदाने परत मिळाला त्या कारणाने गरीब बिचाऱ्या ताईला अधिक दुःख देऊ नये. तो खरोखर ताईच होता ज्याने तो गळ घेतला होता. जर त्याचा हा दोष होता असे म्हटल्यास त्याच्या दोषाची पुरेपूर शिक्षा त्याने आधीच भोगली होती. जे काही केले गेले होते ते हेतुपुरस्सर नाही तर निष्काळजीपणाने केले गेले होते. कुशल शिकारी म्हणाला तो स्वतःच दोषी होता, जर योग्य रितीने त्याला समजले असते तर त्याने त्याचा गळ कधीच हरवला नसता, म्हणून ह्या त्रासाचे पहिले कारण त्याला जे जमत नव्हते ते करण्याच्या प्रयत्नात होते. म्हणून त्याने समुद्राच्या राजाला विनंती केली की त्याने त्याच्या प्रजेला क्षमा करावी.

अशा सूज्ञ आणि कनवाळू विनंतीला कोण न्यायाने प्रतिकार करू शकला असता? त्याच्या ऑगस्त पाहुण्याच्या विनंतीला मान देऊन रिनजिनने त्याच्या प्रजेला तात्काळ क्षमा केली. तो ताई इतका आनंदी झाला की त्याने हर्षभराने त्याचे पंख फडफडविले आणि कुशल शिकाऱ्याच्या सत्वशीलतेची त्याने आणि सर्वांनी स्तुती केली आणि राजाची आज्ञा घेऊन ते सर्व बाहेर गेले.

आता तो गळ सापडला होता आणि कुशल शिकाऱ्याला रिन गूमध्ये थांबण्याचे काहीच कारण उरले नव्हते. तो त्याच्या स्वतःच्या राज्याकडे परत जायला आणि त्याच्या रागावलेल्या भावाला, चतुर कोळयाला शांत करण्यासाठी उतावीळ झाला होता. पण समुद्राचा राजा जो आता त्याच्यावर स्नेह करू लागला होता, तो आता आनंदाने त्याला आपला पुत्र समजून त्याला ठेवून घेणार होता. त्या राजाने त्याला एवढ्या लवकर न जाण्याची विनंती केली आणि जेवढे दिवस त्याला आवडेल तेवढे दिवस राहून राजवाड्याला त्याचे घर समजायला सांगत होता. जेव्हा तो कुशल शिकारी अजूनही का कू करू लागला तेव्हा त्या दोन सुंदर राजकुमारी तायोतामा आणि तामायोरी आल्या आणि मोहीत करणाऱ्या आवाजासह वंदन करून आपल्या वडिलांच्या सांगण्याप्रमाणे त्याने तेथे रहावे अशी गळ घालू लागल्या तेव्हा तो 'नाही' म्हणू शकला नाही आणि त्याला तेथे राहणे भाग पडले.

समुद्राच्या आणि पृथ्वीच्या साम्राज्यात रात्री काही फरक नव्हता आणि त्या कुशल शिकाऱ्याला आढळून आले की तीन वर्षे त्या मनोहर देशात जलद गतीने निघून गेली. एखादा खरोखर आनंदी राहिला तर वर्षे शीघ्र गतीने निघून जातात. पण त्या मंत्रमुग्ध करणाऱ्या देशातील आश्चर्ये रोज नवी नवी दिसत असली तरी आणि समुद्राच्या राजाचे त्याच्याविषयीचे प्रेम दिवसेंदिवस घटत जाण्याऐवजी वाढत होते तरी जसे जसे दिवस संपत होते तसा तसा तो घराच्या आठवणींनी उदास होत होता. जेव्हा तो बाहेर होता तेव्हा देशात आणि घरी त्याच्या भावाचं काय चालले असेल हे जाणण्याची त्याची उद्विग्नता तो दाबून ठेवू शकत नव्हता.

म्हणून तो समुद्राच्या राजाकडे गेला आणि म्हणाला,

“येथील तुमच्या सहवासातील माझे वास्तव्य खूपच आनंदी आहे आणि आपण सर्वांनी जे सौजन्य मला दाखविले त्याबद्दल मी आपल्या सर्वांचा कृतज्ञ आहे, पण मी जपानचे राज्य चालवितो आणि हे ठिकाण खूपच आल्हाददायक असूनही मी कायम माझ्या देशापासून अनुपस्थित राहू शकत नाही. मला माझ्या भावाकडे परत जाऊन त्याचा गळ जो मी खूप काळ हिरावून घेतला होता तो त्याला परत करून त्याची क्षमा मागायला हवी. तुमच्यापासून विलग होताना मला फारच दुःख होत आहे, पण मी आता टाळू शकत नाही. तुमच्या दयाशील आज्ञेसह आजच मी जायला निघतो. पुढची भेट कधीतरी होईल अशी आशा करतो. कृपया मी अधिक काळ येथे रहावे ही कल्पना आता सोडून द्यावी.”

जो आता राजवाडा सोडून चालला अशा त्याच्या मित्राला आता गमवावे लागणार ह्या दुःखाने राजा रिनजिन कुंठीत झाला. त्यावेळी त्याच्या डोळ्यातून झर झर अश्रू वाहू लागले आणि तो उत्तरला,

“तुमच्यापासून विलग होताना आम्हाला फारच दुःख होते आहे, मितोको, कारण आम्ही तुमच्या सहवासात फारच मौज केली. तुम्ही खरोखरच कुलीन आणि सन्माननीय अतिथी म्हणून राहिलात आणि आम्ही अंतःकरणपूर्वक तुमचं स्वागत केलं. मला पूर्णपणे कळतंय की तुम्ही जपानचं राज्य चालवत असल्यामुळे आम्हाला तुम्ही येथे रहायला हवं असं कितीही वाटलं तरी तुम्ही तेथे जायला हवं, तुम्हाला येथे राहण्याचा आग्रह करणं व्यर्थ आहे. तुम्ही आम्हाला कधीही विसरणार नाही अशी आशा करतो. विचित्र परिस्थितीने आपल्याला एकत्र आणले आणि मला खात्री आहे की भूमी आणि सागर ह्यातील स्नेहसंबंध दृढ होऊन कधी नव्हे इतका काळ टिकतील.

जेव्हा त्या समुद्राच्या राजाने त्याचे बोलणे संपविले तेव्हा तो त्याच्या दोन्ही कन्यांकडे वळला आणि समुद्राच्या भरती ओहोटीचे दोन मणिरत्न आणण्याची आज्ञा केली. त्या दोन्ही राजकुमारींनी नम्रतेने खाली वाकून नमस्कार केला, उभ्या राहिल्या, आणि हळूच दिवाणखान्यात गेल्या. काही मिनिटात त्या परतल्या, प्रत्येकीच्या हातात लखलखणारे रत्न होते, ज्यांच्या प्रकाशाने सबंध खोली झळाळत होती. जेव्हा कुशल

शिकाऱ्याने त्यांच्याकडे पाहिले तेव्हा त्याला खूप अचंबा वाटला की हे काय असू शकेल. समुद्राच्या राजाने त्याच्या मुलींकडून ते घेतले आणि त्या अतिथीला म्हटले,

"हे दोन मंतरलेले मौल्यवान ताईत आमच्या पूर्वजांकडून वंशपरंपरेने अतिप्राचीन काळापासून आमच्याकडे आहेत. आम्ही आता ते आमच्या स्नेहभावाच्या प्रतिकात निरोपाच्या वेळी भेटवस्तू म्हणून तुम्हाला प्रदान करीत आहोत. ह्या दोन रत्नांना नानजियु आणि कानजियु म्हणतात."

कुशल शिकारी जमिनीवर नतमस्तक होऊन म्हणाला,

"तुम्ही दाखविलेल्या ह्या सौजन्याबद्दल मी तुमचे कधीच पुरेसे आभार मानू शकत नाही. आणि यावर आणखी एक कृपा माझ्यावर करावी आणि मला हे सांगावे की ही मणीरत्ने काय आहेत आणि मी त्यांचे काय करावे?"

"हा नानजियु," समुद्राच्या राजाने उत्तर दिले, "ह्याला पुराच्या लोटाचे मणीरत्न असे म्हणतात. आणि ज्याच्याजवळ हे असेल त्याला जेव्हाही इच्छा होईल तेव्हा त्याने समुद्राला आज्ञा केल्याबरोबर मोठ्या प्रमाणावर समुद्राचे पाणी जमिनीवर येऊन पूर येईल. कानजियुला ओहोटीचे मणीरत्न म्हणतात. हे रत्न समुद्राला आणि त्याच्या लाटांना मर्यादा घालते आणि ओहोटीच्या लाटांना उतार आणण्यास कारणीभूत ठरते."

नंतर रिनजिनने त्या ताईतांचा उपयोग कसा करावा हे आळीपाळीने दाखविले आणि त्याला ते दिले. कुशल शिकाऱ्याला ती अद्भूत रत्ने मिळाल्याचा खूप आनंद झाला. पुराच्या लोटाचे आणि ओहोटीची मणीरत्ने परत घेतली कारण त्याला वाटले की ती त्याला कोणत्याही वेळी शत्रूपासून निर्माण होणाऱ्या धोक्यापासून वाचवितील. पुन्हा पुन्हा त्याच्या यजमानाचे आभार मानत त्याने जायची तयारी केली. समुद्राचा राजा आणि दोन राजकुमारी तायोतामा आणि तामायोरी, आणि राजवाड्यातील सर्व रहिवासी त्याला "निरोप" देण्यासाठी बाहेर आले आणि शेवटचे

स्वस्ती संपल्यावर कुशल शिकारी खालच्या प्रवेशद्वारातून बाहेर पडला. किनाऱ्याकडे जाण्याच्या मार्गावर असलेल्या कात्सुराच्या विशाल वृक्षाच्या छायेखाली असलेल्या विहीरीवरच्या भूतकाळातील सुखद स्मृतींनी तो हरखून गेला.

ज्याच्यात बसून तो रिनगूच्या साम्राज्यात आला होता त्या विलक्षण टोपलीऐवजी त्याला खूप मोठा मगर त्याची वाट पाहताना दिसला. त्याने कधीही असला प्रचंड प्राणी पाहिला नव्हता. शेपटीच्या टोकापासून ते त्याच्या लांब तोंडापर्यंत अठ्ठेचाळीस फूट लांब. समुद्राच्या राजाने त्या अक्राळविक्राळ प्राण्याला त्या कुशल शिकाऱ्याला परत जपानला घेऊन जाण्याची आज्ञा केली. शिवोझुचिनो ओकिनाने बनविलेल्या अद्‌भूत टोपलीसारखे, कोणत्याही आगबोटीपेक्षा जलद प्रवास करू शकणाऱ्या, आणि अशा विचित्र मार्गाने त्या मगराच्या पाठीवर स्वार होऊन तो कुशल शिकारी त्याच्या स्वतःच्या देशात परतला.

ज्यावेळी त्याला मगराने जमिनीवर पोहोचविले त्यावेळी लगेच कुशल शिकाऱ्याने चतुर कोळयाला त्याच्या सुरक्षित परतीबद्दल सांगण्याची घाई केली. नंतर त्याने तो मासे पकडण्याचा गळ त्याला परत केला जो ताई माशाच्या तोंडात सापडला होता आणि जो त्यांच्यामधील त्रासाला कारणीभूत झाला होता. समुद्राच्या राजाच्या राजवाड्यात काय घडले आणि गळ शोधण्यासाठी त्याला किती अद्‌भूत साहस करावे लागले हे सांगत त्याने भावाने त्याला क्षमा करावी म्हणून अतिशय कळकळीची विनंती केली.

आता त्याच्या भावाने, चतुर कोळयाने त्याच्या भावाला देशाबाहेर हाकलण्यासाठी हरवलेल्या गळाची सबब वापरली होती. जेव्हा त्याचा भाऊ त्याला सोडून गेला त्या दिवसापासून तीन वर्षांपूर्वी, जेव्हा तो परतला नाही तेव्हा त्याच्या दुष्ट मनाला खूप आनंद झाला आणि त्याने तात्काळ त्याच्या भावाची, राज्यकर्त्याची जागा बळकावून तो शक्तीमान आणि धनवान बनला होता. जे त्याच्या मालकीचे नव्हते, त्यात मौज करण्यात गुंग असताना तो आशा करीत होता की त्याचा भाऊ कधीच परतणार नाही आणि त्याच्या हक्कांवर अधिकार सांगणार नाही. पण अगदी अनपेक्षितपणे तो कुशल शिकारी त्याच्यापुढे येऊन उभा राहिला होता.

चतुर कोळयाने क्षमा करण्याचे ढोंग केले कारण आता त्याच्याजवळ त्याच्या भावाला पुन्हा बाहेर पाठविण्यासाठी काहीही सबब नव्हती. पण मनातल्या मनात त्याला त्याचा खूप राग आला होता. आणि भावाचा तो अधिकाधिक द्वेष करीत होता. दिवसेंदिवस भावाचे दर्शनही त्याला सहन होत नव्हते, आणि तो योजना करून त्याला ठार मारण्याच्या संधीची वाट पाहू लागला होता.

एके दिवशी जेव्हा कुशल शिकारी भाताच्या शेतातून चालत होता तेव्हा त्याच्या भावाने खंजीर घेऊन त्याचा पाठलाग केला. कुशल शिकाऱ्याला ठाऊक होते की त्याचा भाऊ त्याला ठार मारण्यासाठी त्याचा पाठलाग करीत आहे. आणि त्याला वाटले की ह्या धोक्याच्या वेळेला राजाने दिलेले भरती ओहोटीचे मणीरत्न खरे की खोटे ह्याची प्रचिती पहावी.

म्हणून त्याने छातीजवळच्या पोषाखातून भरतीचे मणीरत्न बाहेर काढले आणि उंच धरून कपाळाला लावले. ताबडतोब त्या मैदानावर आणि शेतावर मोठमोठ्या लाटा उसळल्या व जेथे त्याचा भाऊ उभा होता तेथपर्यंत जाऊन पोहोचल्या. चतुर कोळी आश्चर्याने थक्क झाला आणि काय घडत आहे हे पाहून त्याला भीती वाटली. दुसऱ्या मिनिटाला तो पाण्यामध्ये धडपडू लागला आणि बुडण्यापासून वाचविण्यासाठी भावाला बोलावू लागला.

कुशल शिकारी खूप दयाळू अंतःकरणाचा होता आणि भावाला संकटात पडलेले पाहून त्याला ते सहन झाले नाही. त्याने पटकन भरतीचे मणीरत्न मागे घेतले आणि ओहोटीचे मणीरत्न बाहेर काढले. त्याने ते त्याच्या कपाळावर धरल्याबरोबर समुद्र झटकन मागे मागे सरला आणि लांब उसळणाऱ्या भरतीच्या लाटा नाहीशा झाल्या आणि मैदान आणि शेत पूर्ववत कोरडे झाले.

चतुर कोळी तो जेथे उभा होता तेथील मृत्यूच्या संकटाला पाहून घाबरला होता. आणि त्याच्या भावाने केलेल्या अद्‌भूत गोष्टी पाहून त्याला खूप आश्चर्य वाटले होते. त्याच्या भावाच्या विरोधात जाऊन स्वतः किती मोठी प्राणघातक चूक करीत होता हे त्याच्या लक्षात आले, त्याच्यापेक्षाही लहान असून तो किती शक्तीशाली झाला होता की त्याच्या आज्ञेवरून समुद्राला भरती आणि ओहोटी येऊ शकते. म्हणून तो

स्वतः कुशल शिकाऱ्यापुढे नम्र झाला आणि त्याने केलेल्या चुकीबद्दल क्षमायाचना केली. चतुर कोळयाने त्याच्या भावाला त्याचे राज्य परत देण्याचे आश्वासन दिले आणि त्याचे सर्व जन्मसिद्ध हक्क स्वामीभक्तीसह दिले. कुशल शिकारी लहान असला तरी त्याच्यापेक्षा श्रेष्ठपद देऊन सर्व जपानचा स्वामी म्हणून त्याला उच्चसनावर बसविले.

नंतर कुशल शिकारी म्हणाला की त्याच्या भावाने जर सर्व वाईट प्रवृत्ती ओहोटीमध्ये फेकून दिल्या तर तो त्याला क्षमा करील. चतुर कोळयाने तसे आश्वासन दिले आणि दोन्ही भावांमध्ये तेव्हापासून शांतता निर्माण झाली. ह्यावेळेपासून त्याचे शब्द त्याने पाळले आणि तो सुशील व दयाळू भाऊ बनला.

कुशल शिकाऱ्याने आता कुटुंबातील संघर्षाविना राज्य केले आणि दीर्घकाळापर्यंत जपानमध्ये शांतता नांदली. सगळया खजिन्यापेक्षा समुद्राचा राजा ड्रॅगन रिनजिन ह्याने दिलेल्या भरती ओहोटीच्या अद्‌भूत मणीरत्नांना त्याने अधिक महत्त्व दिले.

असा आनंदपूर्ण शेवट त्या कुशल शिकाऱ्याचा आणि चतुर कोळयाचा झाला.

* * * * *

कोमेजलेल्या झाडाला फुले आणणाऱ्या म्हाताऱ्याची गोष्ट

फार फार वर्षांपूर्वी एक म्हातारा आणि त्याची बायको त्यांच्या स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी एका लहानशा जमिनीच्या तुकड्यावर शेती करीत होते. त्यांचं जीवन आनंदी आणि सुखी होते. एकच दुःख त्यांना सतावीत होते आणि ते म्हणजे त्यांना मुलबाळ नव्हते. फक्त त्यांना पाळलेला शिरो नावाचा कुत्रा होता आणि म्हातारपणातील सर्व ममत्वाचा ते मुक्तपणे त्याच्यावर वर्षाव करीत. खरोखर, ते त्याच्यावर इतके प्रेम करीत असत की त्यांच्याकडे जेव्हा जेव्हा काही छानसं खायला असे तेव्हा तेव्हा ते शिरोला दिल्याशिवाय रहात नसत. आता "शिरो" म्हणजे "पांढरा" आणि ते त्याला तसे म्हणत ते त्याच्या रंगामुळे. तो खरा जपानी कुत्रा होता आणि तो हुबेहूब छोट्या लांडग्यासारखा दिसायचा.

त्या म्हाताऱ्यासाठी आणि त्याच्या कुत्र्यासाठी सगळयात आनंदाची गोष्ट अशी होती की जेव्हा तो माणूस त्याची शेतामधली कामे आटोपून आणि भात भाजीसारखे साधे जेवण आटोपून परतायचा, तेव्हा तो झोपडीभोवती असलेल्या पडवीत उरलेले पदार्थ ठेवायचा. अपेक्षेप्रमाणे शिरो त्या सायंकाळच्या खाऊची वाट बघायचा. म्हातारा म्हणायचा,"चिन, चिन!" आणि शिरो उठून उभा रहायचा आणि मागायचा आणि त्याचा मालक त्याला खायला द्यायचा. ह्या दयाळू म्हाताऱ्या जोडप्याच्या घराशेजारी दुसरे म्हातारा म्हातारी रहायचे जे दोघेही दुष्ट आणि क्रूर होते, आणि ते त्यांच्या दयाळू शेजाऱ्यांचा आणि त्यांच्या शिरो कुत्र्याचा खूप द्वेष करायचे. जेव्हा जेव्हा शिरो त्यांच्या स्वयंपाकघरात फिरकायचा तेव्हा ते लगेच त्याला लाथा मारायचे किंवा त्याच्याकडे काहीतरी फेकून मारायचे, काहीवेळा त्याला दुखापत सुद्धा करायचे.

एके दिवशी शिरो त्याच्या मालकाच्या घरामागे असलेल्या शेतात बराच वेळ भुंकताना कानावर आले. कदाचित कणसांवर पक्षी तुटून पडले असावेत किंवा काय भानगड आहे हा विचार करीत म्हातारा घाईघाईने बाहेर आला. जसे शिरोने

म्हाताऱ्याला पाहिले तसा तो त्याला भेटण्यासाठी त्याच्याकडे पळाला, शेपटी हलवित आणि त्याच्या किमोनोचा काठ घट्ट पकडून त्याला ओढत भल्या मोठ्या येनोकी वृक्षाखाली घेऊन गेला. येथे त्याने आपल्या पंजाने मोठ्या कष्टाने जमीन उकरायला सुरुवात केली आणि हे करताना तो पूर्णवेळ आनंदाने किंचाळत होता. त्या म्हाताऱ्याला ह्या सर्व गोष्टींचा अर्थ कळू शकत नव्हता, तो गोंधळलेल्या अवस्थेत बघतच उभा राहिला. पण शिरोने सर्व शक्तीनिशी जमिन उकरणे आणि भुंकणे चालूच ठेवले होते.

त्याने विचार केला की त्या झाडाखाली काहीतरी लपविलेले आहे आणि त्या कुत्र्याला त्याचा वास आला असावा अशी त्याला शेवटी अचानक कल्पना आली. तो घराकडे पळत गेला, त्याने कुदळ आणली आणि त्या जागेवर खोदायला सुरुवात केली. आणि काय आश्चर्य, काही काळ खोदत राहिल्यावर त्याला अचानक जुन्या मौल्यवान नाण्यांचा ढीग दिसला, आणि जितक्या अधिकाधिक खोलवर तो खोदत गेला तितके अधिक त्याला सोन्याचे नाणे सापडले. तो म्हातारा त्याच्या कामात इतका मग्न होता की त्याच्या शेजारी बांबूच्या कुंपणाआडून त्याच्याकडे निरखून पाहणाऱ्या शेजाऱ्याचा तिरसट चेहरा त्याला दिसलाच नाही. शेवटी सर्व सोन्याची नाणी जमिनीवर चमकत पडली होती. शिरो जवळ ताठ बसून मोठ्या अभिमानाने त्याच्या मालकाकडे प्रेमाने बघत होता, जणूकाही तो त्याच्या मालकाला म्हणत होता, “बघितलं, जरी एक कुत्रा असलो तरी तुम्ही माझ्यावर दाखविलेल्या प्रेमाची परतफेड मी करू शकतो.”

म्हाताऱ्याने पळत जाऊन त्याच्या बायकोला बोलावून आणले आणि दोघांनी मिळून तो खजिना घरी नेला. अशा रितीने तो गरीब म्हातारा एका दिवसात श्रीमंत झाला. त्या एकनिष्ठ कुत्र्याबद्दलच्या त्याच्या कृतज्ञतेला पारावार राहिला नाही. आणि त्याने कधी नव्हे तेवढा व शक्य होईल तेवढ्या प्रेमाचा वर्षाव त्याच्यावर केला.

त्या तिरसट शेजारी म्हाताऱ्याला शिरोच्या भुंकण्याने आकर्षून घेतले, सापडलेल्या खजिन्याचा तो अदृष्ट मत्सरी साक्षीदार होता. तो विचार करू लागला की त्याला सुद्धा अशी संपत्ती मिळणे आवडेल. म्हणून त्याने काही दिवसांनंतर

म्हाताऱ्याच्या घरी जाऊन मोठ्या शिष्टाचारपूर्वक शिरोला थोड्या वेळासाठी परत बोलीने देण्याची परवानगी मागितली.

शिरोच्या मालकाला ही विनंती खूप विचित्र वाटली कारण त्याला पूर्णपणे चांगलेच ठाऊक होते की त्याने पाळलेल्या कुत्र्याबद्दल त्याच्या शेजाऱ्याला कधीच प्रेम वाटले नव्हते. आणि जेव्हा जेव्हा त्याच्या रस्त्यावरून तो जायचा तेव्हा तेव्हा तो त्याला मारायची आणि त्रास द्यायची संधी सोडत नसे. पण तो म्हातारा मनाने इतका दयाळू होता की त्याची विनंती तो टाळू शकला नाही, म्हणून त्याने त्याची खूप काळजी घ्यावी ह्या एका अटीवर त्याला कुत्रा उसना द्यायची अनुमती दिली.

तो दुष्ट म्हातारा चेहऱ्यावर कुत्सित स्मितहास्य घेऊन त्याच्या घरी परतला आणि त्याच्या कावेबाज हेतूत तो कसा सफल झाला हे त्याने त्याच्या बायकोला सांगितले. नंतर त्याने कुदळ घेतली आणि त्याच्या स्वतःच्या शेतात जायला घाईने निघाला आणि निरिच्छ शिरोला बळजबरीने त्याच्या मागे यायला सांगितले. जेव्हा तो येनोकी वृक्षाजवळ पोहोचला तेव्हा कुत्र्याला धमकावित म्हणाला,

“जर तुझ्या मालकाच्या झाडाखाली सोन्याची नाणी होती तर माझ्या झाडाखाली सुद्धा सोन्याची नाणी असायला हवीत. तुला ती माझ्यासाठी शोधावीच लागतील! कोठे आहेत ती? कोठे? कोठे?”

शिरोची मानगुट धरून त्या कुत्र्याचे डोके त्याने जमिनीवर धरले. जेणेकरून त्या दुष्ट माणसापासून त्याची सुटका व्हावी म्हणून शिरोने जमीन खुरपायला आणि खोदायला सुरुवात केली.

त्या कुत्र्याने खुरपायला आणि खणायला सुरुवात केलेली पाहून त्या म्हाताऱ्याला खूप आनंद झाला, कारण त्याला लगेच वाटले की त्याच्या झाडाखाली सोन्याची नाणी त्याच्या शेजाऱ्यासारखीच पुरलेली असतील. कारण कुत्र्याने पूर्वीसारखेच हुंगले होते, म्हणून त्याने शिरोला बाजूला ढकलले आणि स्वतःच खोदायला सुरुवात केली. पण त्याला तेथे काहीच सापडले नाही. जसा जसा तो खोदू

लागला तशी तशी त्याला लक्षात येण्याजोगी दुर्गंधी जाणवली व तेथे उकीरड्याचा ढीग तयार झाला.

त्या म्हाताऱ्याच्या शिकारीची कल्पना येऊ शकते. ह्याचा त्याला लगेच संताप आला. त्याने शेजाऱ्याचे नशीब पाहिले होते, आणि तसेच त्याचे भाग्य असावे असे त्याला वाटत होते, म्हणून त्याने शिरोला उसने म्हणून आणले होते. सकाळपासून खोदल्यावर आणि शोध घेतल्यावर त्याला काय आढळून आले तर बक्षिस म्हणून भयंकर घाण वास येणाऱ्या उकीरड्याचा ढीग. त्याच्या नैराश्यास कारणीभूत झालेल्या त्याच्या स्वतःच्या हावरटपणाला दोष देण्याऐवजी तो त्या बिचाऱ्या कुत्र्याला दोष देत होता. त्याने त्याची कुदळ उचलली आणि सर्व शक्तीनिशी शिरोवर वार केला आणि जागच्या जागी त्याला ठार मारून टाकले. नंतर त्याने सोन्याच्या नाण्यांचा शोध घेण्याच्या इच्छेने केलेल्या खड्यात त्या कुत्र्याच्या प्रेताला फेकून दिले आणि वरून मातीने झाकून दिले. नंतर तो घरी परतला आणि त्याच्या बायकोलाच काय कुणालाही त्याने काय केले हे सांगितले नाही.

बरेच दिवस झाले तरी कुत्रा शिरो परतला नाही तेव्हा त्याचा मालक अधिकाधिक चिंता करू लागला. दिवसामागून दिवस तो सालस म्हातारा शिरोच्या परतण्याची वाट बघत राहिला. नंतर तो शेजाऱ्याकडे गेला आणि त्याने त्याचा कुत्रा परत मागितला. कुठलीही लाज लज्जा न बाळगता किंवा काचकूच न करता त्या दुष्ट शेजाऱ्याने उत्तर दिले की त्याच्या वाईट वागण्यामुळे त्याने त्या शिरोला ठार मारून टाकले. ही अतिशय वाईट बातमी ऐकून शिरोच्या मालकाने खूप शोकपूर्ण दुःखाश्रू ढाळले. खचितच ते खूप दुःखदायक आश्चर्य होते, पण त्याच्या वाईट शेजाऱ्याला त्या दयाळू आणि शांत स्वभावाच्या म्हाताऱ्याने दूषण दिले नाही. शेतामधल्या येनोकी वृक्षाखाली शिरोला पुरले आहे असे कळल्यावर त्याच्या गरीब कुत्र्याची शिरोची आठवण म्हणून त्याचे त्या म्हाताऱ्याजवळ तो वृक्ष मागितला.

तो शेजारी म्हातारा दुष्ट होता तरी तो ही साधी विनंती नाकारू शकला नाही, म्हणून त्याने त्या म्हाताऱ्याला ज्या झाडाखाली शिरोला पुरले होते ते झाड देण्याची संमती दिली. शिरोच्या मालकाने मग ते झाड तोडून घरी नेले. त्या झाडाच्या बुंध्यापासून त्याने एक उखळ तयार केले. त्याच्या पत्नीने त्यात काही तांदूळ टाकले

आणि कुत्रा शिरो ह्याची आठवण म्हणून सण साजरा करण्याच्या हेतूने कुटायला सुरूवात केली.

एक विलक्षण गोष्ट घडली! त्याच्या पत्नीने वड्या बनविण्यासाठी उखळात तांदूळ टाकले होते आणि कुटायला सुरूवात केली नाही तोच हळूहळू त्याचे मूळ परिणामापेक्षा पाच पटीपर्यंत ते वाढत गेले आणि त्या उखळामधून बनविलेल्या आयत्या वड्या बाहेर आल्या जणूकाही अदृश्य हातच ते काम करीत होता.

जेव्हा त्या म्हाताऱ्याने आणि त्याच्या बायकोने हे बघितले तेव्हा त्यांना कळून चुकले की ते शिरोवरील त्यांच्या एकनिष्ठ प्रेमाचे पारितोषिक होते. त्यांनी चव घेऊन पाहिले तेव्हा त्यांना आढळून आले की तो कुठल्याही अन्नपदार्थापेक्षा अतिशय छान होता. त्या वेळेपासून त्यांना अन्नाची कधीच कमतरता पडली नाही, कारण त्या उखळीने वड्या देणे कधीच थांबविले नव्हते.

त्या हावरट शेजाऱ्याला त्या नव्या नशिबाबद्दल ऐकल्यावर पूर्वीसारखीच असूया निर्माण झाली होती, आणि म्हणून त्याने त्या म्हाताऱ्याला बोलाविले आणि ते अद्‌भूत उखळ त्याच्याकडे थोड्या अवधीसाठी उसने मागितले, असे ढोंग करीत की त्याला सुद्धा शिरोच्या मृत्यूबद्दल खूप दुःख झाले होते आणि त्या कुत्र्याच्या स्मरणार्थ वड्या बनवून सण साजरा करण्याची त्याची इच्छा होती.

त्या म्हाताऱ्याची त्या क्रूर शेजाऱ्याला ती उखळ देण्याची जराही इच्छा नव्हती पण तो इतका दयाळू होता, की त्याला तो नकार देऊ शकला नाही. म्हणून त्या मत्सरी माणसाने ते उखळ घरी नेले आणि कधीच परत केले नाही.

अनेक दिवस निघून गेले, शिरोचा मालक त्या उखळाची व्यर्थ वाट पाहत होता, म्हणून त्याने ऋणकोला बोलावले आणि जर त्याचे काम झाले असेल तर उखळ परत करायला सांगितले. तो लाकडाच्या तुकड्यांना पेटवून मोठा जाळ करून त्याजवळ बसलेला त्याला आढळला. जमिनीवर अगदी तोडलेल्या उखळाच्या तुकड्यांसारखेच तुकडे पसरलेले होते. म्हाताऱ्याच्या चौकशीला त्या क्रूर शेजाऱ्याने उद्धटपणे उत्तर दिलेः

“तू तुझ्या उखळीबद्दल विचारायला माझ्याकडे आलास का? मी त्याचे तुकडे तुकडे केले आणि आता त्याला पेटवून जाळ केला आहे, कारण मी त्यात वड्या बनविण्यासाठी कुटण्याचा प्रयत्न केला तेव्हा फक्त भयंकर वास येणारा पदार्थच बाहेर आला.”

तो सोज्वळ म्हातारा म्हणाला, “मला ह्याबद्दल खूप वाईट वाटते. ही दुर्भाग्याची गोष्ट आहे की तुला हव्या असलेल्या वड्यांबद्दल तू मला विचारले नाहीस. तुला पाहिजे तेवढ्या मी त्या तुला दिल्या असत्या. आता मला त्या उखळीची राख दे, कारण मला ती माझ्या कुत्र्याची आठण म्हणून ठेवून घेण्याची इच्छा आहे.”

त्या शेजाऱ्याने त्याला ताबडतोब संमती दिली आणि म्हाताऱ्याने टोपली भरून राख त्याच्या घरी नेली.

त्यानंतर फार दिवस झाले नाहीत तोच त्या उखळीला जाळून बनविलेली राख त्याने त्याच्या बागेमधील झाडांवर पसरविली. आणि मोठी आश्चर्यकारक गोष्ट घडली!

शरदऋतू संपत आल्याचा तो काळ होता आणि सर्व झाडांची पाने गळून गेली होती, पण त्यांच्या फांद्याना राखेचा स्पर्श होत नाही तोच चेरीची झाडे, आलुबुखारची झाडे, आणि सर्व बहर येणारी झुडूपे एकाएकी प्रफुल्लित झाली, त्यामुळे म्हाताऱ्याच्या बागेचे अकस्मात वसंतऋतूच्या मनोहर चित्रात रूपांतर झाले. म्हाताऱ्याच्या आनंदाला पारावार राहिला नाही, आणि त्याने उर्वरित राख काळजीपूर्वक जपून ठेवली.

म्हाताऱ्याच्या बागेची गोष्ट दूरवर आणि सर्वत्र पसरली आणि ते अद्‌भूत दृश्य बघण्यासाठी जवळपासचे आणि दूरदूरचे लोक आले.

हे घडल्यानंतर, लगेच एके दिवशी त्याचा दरवाजा कुणीतरी ठोठावत आहे असे त्याला जाणवले, आणि देवडीजवळ पोहोचल्याबरोबर सरदाराला तेथे उभे असलेले पाहून त्याला खूप आश्चर्य वाटले. त्या सरदाराने त्याला सांगितले की तो श्रेष्ठ दाईमियो (अर्ल) चा सेवक होता. ह्या उमरावाच्या बागेतील त्याच्या आवडत्या चेरीच्या झाडांपैकी एक झाड कोमेजून गेले होते आणि त्याच्या पदरी असलेल्या प्रत्येक सेवकाने सर्व पद्धतीने त्याला पुनरूज्जीवित करण्याचा प्रयत्न केला होता पण कशाचाही त्यावर परिणाम झाला नव्हता. जेव्हा त्याच्या आवडत्या चेरीच्या झाडाच्या नुकसानीमुळे दाईमियोला नाखूष झालेले पाहिले तेव्हा तो सरदार संतापाने चक्रावून गेला होता. ह्या मुद्द्यावर, सुदैवाने त्यांना अद्‌भूत म्हाताऱ्याची गोष्ट कळली जो कोमेजलेल्या झाडांना प्रफुल्लित करतो, आणि महाराजांनी तो म्हातारा त्यांच्याकडे येण्यासाठी त्याला बोलावणे पाठविले.

“आणि,” तो सरदार पुढे म्हणाला, “तुम्ही लगेच आलात तर मी तुमचा खूप आभारी राहीन.”

हे ऐकून त्या सोज्वळ म्हाताऱ्याला खूप मोठे आश्चर्य वाटले, पण अतिशय आदराने तो त्या सरदाराच्या मागोमाग महाराजांच्या राजवाड्याकडे निघाला.

दाईमियो, जे अतिशय उतावीळपणे तो म्हातारा येण्याची वाट पाहत होते, त्यांनी त्याला पाहिल्याबरोबर लगेच त्याला विचारले,

"ऋतू निघून गेल्यावर सुद्धा कोमेजलेल्या झाडांना फुले आणू शकणारा म्हातारा तूच काय?"

त्या म्हाताऱ्याने अभिवादन केले, आणि उत्तर दिलेः

"मी तोच म्हातारा आहे!"

मग दाईमियो म्हणाला, "तुला माझ्या बागेतील चेरीच्या मृत झाडाला तुझी सुप्रसिद्ध राख वापरून त्याला प्रफुल्लित करायलाच हवे. मी बघेन."

नंतर दाईमियो आणि ज्यांच्याजवळ दाईमियोची तलवार होती ते त्याचे सेवक आणि दासी वाटच बघत होते. सर्व बागेत गेले.

तो म्हातारा आता त्याचा किमोनो पोषाख वर खोचून झाडावर चढण्यासाठी तयार झाला. "माफ करा" असे म्हणत त्याने राखेचे भांडे घेतले जे त्याने त्याच्याबरोबर आणले होते, आणि झाडावर चढायला सुरुवात केली. प्रत्येक जण त्याच्या हालचालींकडे मोठ्या कुतूहलाने बघत होता.

शेवटी तो त्या झाडावर दोन मोठ्या फांद्यांनी विभागलेल्या ठिकाणी चढला, तो म्हातारा तेथे बसला आणि उजव्या डाव्या बाजूला फांद्यांवर आणि डहाळ्यांवर ती राख त्याने पसरवली.

त्याचा खरोखर अद्‌भूत परिणाम झाला! तो कोमेजलेला वृक्ष पूर्णपणे फुलून गेला! दाईमियोला इतका आनंद झाला की जणू काही त्याला वेड लागेल. तो उभा राहिला, त्याचा पंखा उलगडला आणि म्हाताऱ्याला झाडावरून खाली

उतरविण्यासाठी हाक मारली. त्याने दारूच्या पेल्यात स्वतः उत्कृष्ट प्रकारची साके ओतून त्याला दिली आणि पारितोषिक म्हणून खूप सोने, चांदी आणि इतर अनेक मौल्यवान वस्तू दिल्या. दाईमियोने हुकूम केला की इतःपर त्या म्हाताऱ्याला हाना-साका-जि जि, किंवा एक म्हातारा ज्याने झाडांना फुले आणली या नावाने ओळखू लागतील. आणि तेथून पुढे त्या म्हाताऱ्याला लोक ह्या नावाने ओळखू लागले. आणि मोठ्या सन्मानाने त्याने त्याला घरी पाठविले.

त्या दुष्ट शेजाऱ्याला पूर्वीप्रमाणेच म्हाताऱ्याच्या भावाबद्दल कळले आणि तेही त्यावर ते कसे गुदरले हे कळल्याबरोबर असूया आणि मत्सराने भरलेल्या मनाला तो आवरू शकला नाही. त्याच्या लक्षात आले की सोन्याची नाणी मिळविण्याच्या खटपटीत तो कसा अयशस्वी झाला, आणि नंतर जादूच्या वड्या बनविण्यात. अगदी सहजपणे राख शिंपडून कोमेजलेल्या झाडाला फुले आणणाऱ्या म्हाताऱ्याचे अनुकरण केल्यास त्याला खात्रीने यश मिळेल, आणि हे अगदी सर्वात सोपे काम असेल.

म्हणून तो त्या जळलेल्या अद्‌भूत उखळाची उरलेली राख गोळा करायच्या कामाला लागला. नंतर त्याला कुणीतरी मोठा माणूस भेटेल ह्या आशेने शोधत मोठ्याने ओरडू लागला,

"येथे असा एक अद्‌भूत माणूस आला आहे जो कोमेजलेले झाड फुलवू शकतो! येथे असा म्हातारा आला आहे की जो मृत वृक्षाला बहर आणू शकतो!"

दाईमियोला त्याच्या राजवाड्यात हे ओरडणे ऐकू आले आणि तो म्हणाला,

"तो नक्कीच हाना-साका-जि जि जवळून जात असेल, मला आज काही जरूरी नाही. त्याला त्याच्या कलेची पुन्हा प्रचिती घेऊ देत, ते पाहण्यात मला मौज वाटेल."

म्हणून ते सेवक गेले आणि त्यांनी त्या तोतयाला आणून महाराजांसमोर उभे केले. त्या खोटारड्या म्हाताऱ्याच्या समाधानाची कल्पना तुम्ही करू शकाल.

पण दाईमियो त्याच्याकडे बघत विचार करू लागला की हे मोठे विचित्र होते की ज्या म्हाताऱ्याला त्याने पूर्वी पाहिले होते तो हा म्हातारा नव्हता, म्हणून त्याने त्याला विचारले,

"तू तोच माणूस आहेस का की ज्याला मी हाना-साका-जि जि हे नाव बहाल केले होते?"

आणि त्या मत्सरी शेजाऱ्याने खोटे उत्तर दिले,

"होय, महाराज!"

"हे विचित्र आहे!" दाईमियो म्हणाला,"मला वाटतं जगामध्ये फक्त एकच हाना-साका-जि जि होता? त्याला आता कोणी शिष्य आहेत का?"

"मीच खरा हाना-साका- जि जि आहे. जो ह्यापूर्वी तुमच्याकडे आला होता तो माझा शिष्य होता!" म्हाताऱ्याने पुन्हा उत्तर दिले.

"मग दुसऱ्यापेक्षा तुम्ही नक्कीच अधिक कुशल असणार. प्रयत्न कर तू जे करू शकतोस त्याचा आणि मला बघू दे!"

तो मत्सरी शेजारी, दाईमियो आणि त्याच्या दरबारी लोकांबरोबर बागेत गेला आणि मृतप्राय झालेल्या झाडाजवळ जाऊन त्याने आणलेली राख ओंजळ भरून काढली आणि झाडावर विखुरली.

पण त्या झाडाला फुले आलीच नाहीत, पण कळयासुद्धा आल्या नाहीत. त्याने पुरेशी राख वापरली नसावी म्हणून त्या म्हाताऱ्याने पुन्हा ओंजळ भरून राख घेतली आणि त्या कोमेजलेल्या झाडावर शिंपडली. पण त्या साऱ्याचा काहीच परिणाम झाला नाही. अनेक वेळा प्रयत्न केल्यानंतर दाईमियोच्या डोळयात ती राख उडाली. ह्याचा त्याला खूप राग आला आणि त्याने त्याच्या सेवकांना त्या खोट्या हाना-साका-जि जिला ताबडतोब अटक करण्याची आज्ञा केली कारण तो तोतया होता.

तथापि, तो दयाळू म्हातारा, शिरोने त्याला शोधून दिलेल्या सोन्याच्या नाण्यांची संपत्ती आणि दाईमियोने त्याच्यावर केलेल्या सोन्याचांदीच्या वर्षावासह तो खूप श्रीमंत आणि ऐश्वर्यशाली झाला, दीर्घ सुखी जीवन जगला. आणि सर्वांना आदरणीय आणि प्रिय झाला.

* * * * *

पाकमत्स्य आणि माकड

फार फार वर्षांपूर्वी प्राचीन जपानमध्ये सागर साम्राज्यावर एक अद्‌भूत राजा राज्य करीत होता. त्याला रिनजिन किंवा समुद्राचा ड्रॅगन राजन म्हणायचे. त्याचे सामर्थ्य प्रचंड होते कारण तो लहान आणि मोठ्या सर्व सागरी प्राण्यांवर राज्य करणारा होता आणि त्याच्या ताब्यात ओहोटी आणि भरतीच्या ओघाची मणीरत्ने होती. ओहोटीच्या प्रवाहाचे मणीरत्न सागरात फेकल्यावर समुद्र जमिनीकडून मागे हटायचा आणि भरतीच्या प्रवाहाचे मणीरत्न सागरात फेकल्यावर पर्वतासारख्या उंच लाटा किनाऱ्याकडे उसळून भरती यायची.

रिनजिनचा राजवाडा समुद्राच्या तळाशी होता, आणि तो इतका सुंदर होता की अशा प्रकारची कुठलीही गोष्ट स्वप्नातसुद्धा कोणी पाहिली नसेल. पोवळ्याच्या भिंती, मौल्यवान हिरे आणि माणिक जडवलेली छपरे आणि सुरेख मोत्यांच्या शिंपल्यांच्या तक्तपोशी. पण तो ड्रॅगन राजन सर्वत्र पसरलेले साम्राज्य, सुरेख राजवाडा आणि त्याची अद्‌भूतता आणि सबंध सागरात कलह विरहित त्याचे सामर्थ्य असूनही तो सर्वस्वी सुखी नव्हता. कारण तो एकटाच राज्य करीत होता. शेवटी त्याने विचार केला की जर त्याने विवाह केला तर तो नुसता सुखीच नाही तर अधिक सामर्थ्यशाली सुद्धा राहील. म्हणून त्याने लग्न करायचे ठरविले. त्याच्या सर्व मत्स्य सेवकांना त्याने बोलावून त्यापैकी अनेकांना राजदूत म्हणून निवडून त्याची पत्नी बनू शकेल अशा तरूण ड्रॅगन राजकन्येच्या शोधार्थ पाठविले.

शेवटी ते एका सुंदर ड्रॅगन तरूणीला घेऊन राजवाड्यात परतले. तिचे शल्क (खवले) उन्हाळ्यातील रात्रीच्या काजव्यांच्या पंखाप्रमाणे हिरव्या प्रकाशाने लखलखत होते, तिचे डोळे अग्निशिखांचे कटाक्ष फेकीत होते आणि तिने अतिशय आकर्षक पोषाख परिधान केलेला होता. सागराच्या मणीरत्नांच्या भरतकामाने तो अलंकृत केला होता.

राजा तत्क्षणी तिच्या प्रेमात पडला आणि विवाह समारंभ मोठ्या वैभवशाली थाटात साजरा झाला. समुद्रातील प्रत्येक जिवंत प्राणी, मोठ्या देवमाशांपासून ते लहान चिंबोऱ्यांपर्यंत सर्व थव्या थव्यांनी त्या नवविवाहित दाम्पत्याचे अभिनंदन करण्यासाठी आणि त्यांना दीर्घ आणि ऐश्वर्यशाली जीवनाच्या सदिच्छा देण्यासाठी आले होते. इतका मोठा समुदाय आणि असा आनंदोत्सव त्या मत्स्य जगतात कधीही झालेला नव्हता. नवऱ्या मुलीच्या मालकीच्या वस्तू वाहून आणणाऱ्यांची मालिका लाटांवरून समुद्राच्या ह्या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत पसरलेली दिसत होती. प्रत्येक माशाजवळ अंधारात लखलखणारा कंदील असून, त्यांनी समारंभासाठी परिधान करावयाचा पोशाख घातला होता जो निळा, गुलाबी आणि चंदेरी रंगांनी चकाकत होता, आणि जसजसे ते लाटा उत्पन्न करीत होते तेव्हा त्या रात्री उफाळणाऱ्या लाटा घरंगळत जाणाऱ्या पांढऱ्या आणि हिरव्या अग्निसारख्या दिसत होत्या कारण त्या प्रसंगाच्या सन्मानार्थ रात्रीत त्यांचा प्रकाश द्विगुणित केला होता.

आता ड्रॅगन राजन आणि त्याची पत्नी खूप आनंदात राहत होते. ते दोघेही एकमेकांवर अत्यंत प्रेम करीत होते, आणि दिवसामागून दिवस राजा त्याच्या राणीला घेऊन त्याचा पाचूंचा राजवाडा आणि आश्चर्यकारक खजिना दाखविण्यात खूप आनंद मानीत होता आणि ती सुद्धा त्या विस्तीर्ण दिवाणखान्यांमधून आणि उद्यानामधून त्याच्याबरोबर फिरताना कधीही थकली नव्हती. जीवन जणूकाही वसंत ऋतूच्या दीर्घ दिवसाप्रमाणे त्यांना वाटत होते.

अशा आनंदी जीवनक्रमात दोन महिने निघून गेले आणि ड्रॅगन राजपत्नी आजारी पडली आणि तिला अंथरूणावर पडून राहणे भाग पडले. त्याच्या बहुमोल पत्नीला

असे आजारी पडलेले पाहून त्याला गंभीर यातना झाल्या. त्याने तात्काळ औषध देण्याकरीता वैद्यास बोलविण्यासाठी माशाला पाठविले. अतिशय काळजीपूर्वक शुश्रूषा करण्यासाठी त्याने त्याच्या सेवकांना विशेष आज्ञा केली. पण त्यांची अविरत सेवा आणि वैद्यांनी निर्दिष्ट केलेली औषधे काळजीपूर्वक देऊनही राजपत्नीची तब्येत सुधारण्याची चिन्हे दिसत नव्हती, पण दिवसेंदिवस अधिकच खराब होत गेली.

नंतर ड्रॅगन राजनने वैद्याची भेट घेऊन राजपत्नीला बरे न केल्याबद्दल दोष दिला. रिनजिनची उघड उघड नाराजी पाहून वैद्याला भीती वाटली आणि त्याने त्याच्या कौशल्याच्या उणीवेबद्दल क्षमा मागून म्हटले की जरी त्याला आजाऱ्याला योग्य प्रकारचे औषध देण्याचे ठाऊक असले तरी ते त्या सागरात सापडणे अशक्य होते.

“तुमच्या म्हणण्याचा अर्थ तुम्हाला मला असं सांगायचं आहे की येथे ते औषध सापडू शकणार नाही?” ड्रॅगन राजाने विचारले.

“अगदी तुम्ही म्हणालात तसेच!” वैद्य म्हणाला.

“सांगा मला राजपत्नीसाठी तुम्हाला काय हवे?” रिनजिनने फर्मावले.

“मला जिवंत माकडाचे यकृत हवे!” वैद्याने उत्तर दिले.

“जिवंत माकडाचे यकृत हवे! खचितच ते मिळविणे दुरापास्त आहे,” राजा म्हणाला.

“जर आपल्याला फक्त तेवढे राजपत्नीसाठी मिळाले, तर राणीसाहेब लवकरच बऱ्या होतील.” वैद्य म्हणाला.

“ठीक आहे, ते ठरवू, कोणत्या का रितीने होईना, आपल्याला ते मिळवायलाच हवे. पण बहुतकरून माकड कोठे सापडेल?” राजाने विचारले.

मग वैद्याने ड्रॅगन राजनला सांगितले की काही अंतरावर दक्षिणेकडे माकडांचे एक बेट आहे तेथे मोठ्या संख्येने माकडे राहतात.

“त्यापैकी एका माकडाला तुम्ही पकडू शकलात तर?” वैद्य म्हणाला.

“माझ्या प्रजेपैकी कोणी एक त्या माकडाला कसे पकडू शकेल?” ड्रॅगन राजन गोंधळून म्हणाले. “माकडे कोरड्या प्रदेशात राहतात आणि आम्ही पाण्यात राहतो, निसर्गतःच पाण्याबाहेर आम्ही दुबळे असतो! आपण काय करू शकतो हेच मला कळत नाही!”

“हीच माझीसुद्धा अडचण आहे.” वैद्य म्हणाले. “पण तुमच्या अगणित सेवकांमधून ह्या विशिष्ट हेतूसाठी जो कोणी एक किनाऱ्यावर जाऊ शकेल असा तुम्ही खात्रीने शोधू शकाल!”

“काहीतरी करायलाच हवे,” राजा म्हणाला आणि मुख्य परिचारकाला बोलावून त्याच्याशी ह्या गोष्टीवर त्याने सल्लामसलत केली.

मुख्य परिचारकाने थोडावेळ विचार केला आणि नंतर अचानक त्याला एक कल्पना सुचली, आणि तो मोठ्या आनंदाने म्हणाला,

“मला ठाऊक आहे आपण ते करायलाच हवे! तेथे एक कुरेज (पाकमत्स्य) आहे. तो दिसायला निश्चितच कुरूप आहे पण कासवासारखे त्याला चार पाय असल्याने तो जमिनीवर चालू शकतो, ह्याचा त्याला अभिमान आहे. आपण त्याला माकडाच्या बेटावर एकाला पकडण्यासाठी पाठवूया.”

पाकमत्स्याला राजासमोर बोलविण्याची आज्ञा केली गेली. आणि त्याच्याकडून काय हवे हे महाराजांकडून त्याला सांगितले गेले.

त्याच्यावर सोपविल्या गेलेल्या व त्याला त्याबद्दल सांगितल्या गेलेल्या अनपेक्षित कामगिरीबाबत तो खूपच अडचणीत सापडलेला दिसला. तो त्या बेटावर

कधीच गेला नव्हता, हा प्रश्न होता. आणि त्याला माकडांना पकडण्याचा काहीच अनुभव नसल्याने तो अतिशय घाबरलेला होता की तो एकालाही प्राप्त करू शकत नव्हता.

“ठीक,” तो मुख्य परिचारक म्हणाला, “जर तू तुझ्या शक्तीवर किंवा कौशल्यावर अवलंबून राहिलास तर तू माकडाला कधीच पकडू शकणार नाहीस. एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे काहीतरी युक्ती करून त्याला फसविणे!”

“युक्ती करून मी माकडाला कसा फसवू शकतो? मला ठाऊक नाही कसं करायचं हे,” गोंधळलेला पाकमत्स्य म्हणाला.

“तुला असं करावं लागेल,” धूर्त मुख्य परिचारक म्हणाला, “जेव्हा तू माकडांच्या बेटावर पोहोचशील आणि त्यांच्यापैकी काहींना भेटशील तेव्हा तुला एखाद्याशी मैत्री जोडावी लागेल, आणि त्याला सांग की तू ड्रॅगन राजनचा सेवक आहेस, आणि त्याला ड्रॅगन राजाच्या राजवाड्याला भेट देण्याचं आणि राजवाडा बघायला यायचं आमंत्रण दे. तुला जितके स्पष्टपणे वर्णन करता येईल तेवढे कर आणि राजवाड्याची भव्यता आणि सागरातील अद्‌भूत गोष्टींबद्दल सांग आणि हे सर्व पाहण्याची त्याची जिज्ञासा जागृत कर!”

“पण मी त्या माकडाला येथे कसा आणू? तुम्हाला ठाऊक आहे की माकडांना पोहता येत नाही.” नाखूष पाकमत्स्य म्हणाला.

“तू त्याला पाठीवर घेऊन येथे आणायला हवे. जर तू तसे करू शकत नाही तर तुझ्या ह्या कवचाचा काय उपयोग?” मुख्य परिचारक म्हणाला.

“तो खूप जड नसेल का?” त्या पाकमत्स्याने पुन्हा शंका व्यक्त केली.

“त्याची तुला काळजीच करायला नको, कारण तू ड्रॅगन राजनसाठी काम करीत आहेस,” मुख्य परिचारक उत्तरला.

“मग मी प्रयत्नांची शिकस्त करीन,” तो पाकमत्स्य म्हणाला आणि राजवाड्यापासून दूर गेला आणि माकडांच्या बेटाकडे जायला निघाला. जलद गतीने पोहत तो थोड्याच तासात इष्टस्थळी पोहोचला आणि सुखकारक लाटांवरून किनाऱ्यावर उतरला. सभोवताली बघता त्याला दिसले की फार दूर नव्हे, एका मोठ्या देवदार वृक्षाच्या लोंबणाऱ्या फांद्या आहेत आणि त्यापैकी एका फांदीवर त्याने अगदी तो शोधत होता तसे—जिवंत माकड पाहिले.

“मी नशीबवान आहे!” त्या पाकमत्स्याने विचार केला. “मला आता ह्या प्राण्याची खुशामत करून त्याला मोहात पाडायचा प्रयत्न करून राजवाड्याकडे परत माझ्याबरोबर घेऊन जायला हवे म्हणजे माझे काम पूर्ण होईल!”

म्हणून पाकमत्स्य हळूहळू देवदार वृक्षाकडे चालत गेला. त्या प्राचीन काळात पाकमत्स्याला कासवासारखे चार पाय आणि कठीण कवच होते. जेव्हा तो देवदार वृक्षाजवळ पोहोचला तेव्हा त्याने आवाज उंच केला आणि म्हटले,

“कसे आहात तुम्ही वानर महाशय? किती सुंदर दिवस आहे नाही का?”

“खूप छान दिवस,” झाडावरून माकड म्हणाले, “ह्या प्रदेशातील भागात मी पूर्वी तुम्हाला कधीही पाहिलेलं नाही. कोठून आलात तुम्ही आणि नाव काय तुमचे?”

“माझे नाव कुराज किंवा पाकमत्स्य. मी ड्रॅगन राजनच्या सेवकांपैकी एक आहे. तुमच्या सुंदर बेटाबद्दल मी खूप ऐकलं आहे आणि ते पाहण्याच्या उद्देशानेच मी येथे आलो आहे,” पाकमत्स्याने उत्तर दिले.

“तुम्हाला भेटल्यावर मला खूप आनंद झाला,” माकड म्हणाले.

“पण काय हो,” पाकमत्स्य म्हणाला, “तुम्ही कधी सागराच्या ड्रॅगन राजनचा राजवाडा पाहिला आहे काय, जेथे मी राहतो?”

“मी अनेकदा त्याच्याबद्दल ऐकलं आहे, पण मी तो कधीच पाहिलेला नाही!” माकडाने उत्तर दिले.

“मग तुम्ही निश्चितच तेथे यायला हवे. आयुष्यभरात तो न पाहणं म्हणजे मोठी दुर्भाग्याची गोष्ट आहे तुमच्यासाठी. राजवाड्याचे सौंदर्य वर्णनातीत आहे—ते निश्चितच जगातील सर्वात सुंदर ठिकाण मी मानतो,” पाकमत्स्य म्हणाला.

“तो सर्वस्वी इतका सुंदर आहे?” विस्मयचकित होऊन माकड म्हणाले.

मग पाकमत्स्याने त्याची संधी साधली आणि तो आपले सारे कौशल्य पणाला लावून सागराच्या राजाच्या राजवाड्याचे सौंदर्य आणि वैभवाचे, आणि पांढऱ्या, गुलाबी व तांबड्या रंगांची मणीरत्नांसारखी विलक्षण फळे फांद्यांना लगडलेल्या झाडांच्या आश्चर्यकारक बागेचे वर्णन करू लागला होता. माकडाची उत्सुकता अधिकाधिक वाढत गेली आणि ऐकताना त्या अद्भूत गोष्टीतील एकही शब्द सुटून जाऊ नये म्हणून ते माकड झाडावरून हळूहळू खाली उतरले.

“अखेरीस तो माझ्या मुठीत आला!” त्या पाकमत्स्याला वाटले, पण तो मोठ्याने म्हणाला,

“वानर महाराज, मला आता परत जायला हवे. जर तुम्ही ड्रॅगन राजनचा राजवाडा कधीच पाहिला नाही तर ह्या नामी संधीचा माझ्या सोबत येऊन लाभ करून घेणार नाही का? मग मी तुमचा मार्गदर्शक बनून सागराची सर्व प्रेक्षणीय स्थळे तुमच्यासारख्या ग्राम्य व्यक्तीस दाखवीन जी तुम्हाला अजूनही विस्मयकारक वाटतील.”

“मला तिकडे जायला आवडेल,” माकड म्हणाले, “पण मी हे पाणी कसं ओलांडू? मला पोहता येत नाही हे तुम्हाला नक्कीच ठाऊक आहे!”

“ती बाब काही कठीण नाही. मी तुम्हाला माझ्या पाठीवरून नेईन.”

“पण ते तुम्हाला फारच त्रासदायक होईल.” माकड म्हणाले.

“मी ते पूर्णपणे सहन करू शकतो. मी दिसतो त्याहीपेक्षा अधिक शक्तिशाली आहे, म्हणून तुम्हाला काचकूच करण्याची आवश्यकता नाही.” तो पाकमत्स्य म्हणाला, आणि माकडाला पाठीवर घेत तो समुद्रात उतरला. “खूप स्थिर ठेवा स्वतःला, वानर महाराज,” तो पाकमत्स्य म्हणाला. “तुम्ही समुद्रात पडायला नको, राजाच्या राजवाड्यात तुम्हाला सुखरूप पोहचवण्याची जबाबदारी माझी आहे.” “कृपया जोरात जाऊ नका नाहीतर मला खात्री आहे की मी पडणार,” माकड म्हणाले.

अशारितीने ते पुढे पुढे जात होते, माकडाला पाठीवर घेऊन तो पाकमत्स्य लाटांना पार करत जात होता.

ते अर्ध्या मार्गावर आले तेव्हा, पाकमत्स्य ज्याला शरीरशास्त्राच्या बाबतीत खूपच कमी माहिती होती, त्याला आश्चर्य वाटायला लागले होते की त्या माकडाजवळ यकृत आहे की नाही?

“वानर महाराज, मला सांगा, तुम्हाला ज्याला यकृत म्हणतात ती गोष्ट आहे का?”

माकडाला ह्या विचित्र प्रश्नाचे खूप आश्चर्य वाटले आणि त्याने विचारले की तो पाकमत्स्य त्याच्या यकृताचे काय करणार होता.

“ती सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे,” मूर्ख पाकमत्स्य म्हणाला. “जेव्हा मला आठवण झाली, तेव्हा मी तुम्हाला विचारले ते आहे की नाही तुमच्याजवळ?”

“माझं यकृत तुम्हाला एवढं महत्त्वाचं का वाटतं?” माकडाने विचारले.

“ओ! त्याचं कारण तुम्हाला नंतर कळेल,” तो पाकमत्स्य म्हणाला.

माकड अधिकाधिक उत्सुक आणि साशंक होत गेले, आणि त्याचे यकृत त्याला कशासाठी हवे आहे, ते जाणण्यासाठी तो पाकमत्स्याला कळकळीची विनंती करून थकला आणि त्याने जे काही सांगितले त्याबद्दल त्याला खूपच त्रास होऊ लागला.

नंतर माकडाला चिंतातुर झालेले पाहून पाकमत्स्याला त्याच्याबद्दल खूप वाईट वाटले, आणि त्याने त्याला सर्वकाही सांगून टाकले. ड्रॅगन राजपत्नी कशी आजारी पडली आणि जिवंत माकडाचे यकृत मिळाल्यावरच ती कशी बरी होऊ शकेल हे वैद्याने सांगितले आणि ड्रॅगन राजाने त्याला ते शोधण्यासाठी कसे पाठविले हेही सांगितले.

“आता जसं मला सांगितलं गेलं तसं मी केलं, आणि जेव्हा आपण राजवाड्यात पोहोचू तेव्हा वैद्यांना तुझं यकृत हवं असेल म्हणून मला तुझ्याविषयी वाईट वाटते.” तो मूर्ख पाकमत्स्य म्हणाला.

जेव्हा त्या गरीब माकडाला हे कळले तेव्हा तो खूप भेदरून गेला आणि त्याच्या विरूद्ध केल्या गेलेल्या कारस्थानाविषयी त्याला खूप चीड आली. त्याच्यासाठी काय वाढून ठेवले आहे ह्या विचाराने तो भीतीने थरथर कापू लागला.

पण माकड खूप हुशार प्राणी होता. त्याला काहीच भीती वाटली नाही असे दाखवत त्याने एक सूज्ञ योजना आखली, त्याने स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न केला आणि यातून कोणत्या मार्गाने स्वतःची सुटका करून घेता येईल याचा तो विचार करू लागला.

“वैद्य मला फाडतील आणि माझे यकृत बाहेर काढून घेतील! का मरावं मी?” माकडाने विचार केला. शेवटी एक तेजस्वी कल्पना त्याच्या डोक्यात चमकली, म्हणून तो अतिशय आनंदाने पाकमत्स्याला म्हणाला,

“किती दुःखाची गोष्ट आहे ही की बेट सोडण्यापूर्वी ह्या बाबतीत तुम्ही काहीच बोलला नाहीत पाकमत्स्य महाराज!”

“जर तुम्ही माझ्यासोबत का यावे हे जर मी तुम्हाला सांगितले असते तर तुम्ही निश्चितच यायला नकार दिला असता,” पाकमत्स्याने उत्तर दिले.

“तुम्ही पूर्णपणे चूक केली आहे,” माकडाने उत्तर दिले. “माकडे एक किंवा दोन अतिरिक्त यकृते जपून ठेवतात, विशेषतः सागराच्या ड्रॅगन राजपत्नीला हवे असल्यास. तुम्हाला कशाची गरज आहे ह्याचा फक्त अंदाज जरी मला आला असता तर तुम्ही विचारण्याआधीच मी तुम्हाला ते सादर केले असते. माझ्याकडे अनेक यकृते आहेत. पण सगळ्यात मोठे दुर्दैव म्हणजे तुम्ही मला तसे काही बोललाच नाहीत, मी माझी सारी यकृते देवदार वृक्षाच्या फांदीला टांगून आलो.”

“तुम्ही तुमचे यकृत मागे टाकून आलात?” पाकमत्स्याने विचारले.

“होय,” ते धूर्त माकडे म्हणाले, “दिवसादरम्यानच्या काळात मी माझे यकृत झाडाच्या फांदीवर टांगून ठेवतो, ह्या झाडावरून त्या झाडावर चढतेवेळी व्यत्यय येऊ नये म्हणून. आज तुमचे मनोरंजक संभाषण ऐकताना मी पूर्णपणे विसरलो आणि तुमच्या बरोबर यायला निघालो तेव्हा मागे टाकून आलो. जर त्यावेळेला तुम्ही मला सांगितले असते तर मला आठवण राहिली असती, आणि मी ते माझ्या बरोबर आणले असते!”

जेव्हा पाकमत्स्याने हे ऐकले तेव्हा तो अतिशय निराश झाला, कारण त्याने माकडाच्या प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवला होता. यकृताशिवाय माकडाला महत्त्व

नव्हते. शेवटी पाकमत्स्य थांबला आणि त्याने माकडाला तसे सांगितले. “ठीक,” माकड म्हणाले. “ह्यावर लवकरच उपाय काढला जाईल. मला तुझ्या ह्या त्रस्त होण्याबद्दल खूप वाईट वाटते, पण जेथे मी तुला सापडलो त्याठिकाणी तू मला परत नेल्यास, मी माझं यकृत लवकरच परत मिळवीन.”

पुन्हा त्या बेटाकडे इतक्या लांब परत जायची कल्पना त्या पाकमत्स्याला बिलकूल आवडली नाही. पण माकडाने त्याला आत्मविश्वासाने सांगितले की जर त्याने कृपाळूपणे त्याला तिथे नेले तर तो त्याचे उत्तम यकृत परत मिळवील आणि ह्या दुसऱ्या वेळी तो ते त्याच्याबरोबर आणील. अशा रितीने मन वळविले गेल्यावर पाकमत्स्याने त्याचा मार्ग पुन्हा माकडाच्या बेटाकडे वळविला.

पाकमत्स्य किनाऱ्यावर पोहोचतो न पोहोचतो तोच तो कावेबाज माकड जमिनीवर उतरला आणि पहिल्यांदा जेव्हा त्या पाकमत्स्याने त्याला पाहिले होते त्या देवदार वृक्षांमध्ये वर गेला. त्यांने फांद्यांमध्ये आनंदाने वेड्या वाकड्या उड्या मारल्या कारण तो आता घरी सुरक्षित पोहोचला होता, आणि नंतर तो खाली पाकमत्स्याकडे बघत म्हणालाः

“तुम्ही घेतलेल्या सर्व तसदींबद्दल मी खूप खूप आभारी आहे! तुमच्या परतीनंतर कृपया माझ्या सदिच्छा ड्रॅगन राजाला प्रदान करा!”

पाकमत्स्याला त्याच्या भाषणाचे आणि त्याच्या कुत्सित स्वराचे आश्चर्य वाटले. मग त्याने माकडाला विचारले की यकृत मिळाल्यानंतर त्याच्या बरोबर येण्याचा त्याचा इरादा आहे की नाही.

माकडाने हसत उत्तर दिले की तो त्याचे यकृत देऊन ते गमावू शकत नाही. ते खूप मौल्यवान होते.

“पण तुम्ही मला दिलेले वचन आठवा!” पाकमत्स्याने पुन्हा पुन्हा विनंत्या केल्या, आता तो खूप हताश झालेला होता. “ते वचन खोटे होते, आणि येनकेन प्रकारे

ते आता मोडले गेले आहे!" माकडाने उत्तर दिले. नंतर त्याने पाकमत्स्याची कुचेष्टा करायला सुरूवात केली आणि त्याला सांगितले की तो त्याला संपूर्णवेळ फसवित होता, कारण त्याला त्याचे जीवन गमवायचे नव्हते, जर तो सम्राटाच्या राजवाड्यात गेला असता जेथे तो म्हातारा वैद्य वाट बघत होता. पण पाकमत्स्याने त्याचे मन जरी वळविले होते तरी खोटा आव आणून तो परतत होता.

"खचितच मी तुला माझं यकृत देणार नाहीच, पण तुला शक्य झालं तर ये आणि घेऊन जा!" झाडावरून त्याची टिंगल करीत माकड पुढे म्हणाला.

त्याच्या निर्बुद्धपणाबद्दल पश्चात्ताप करण्याशिवाय आणि सागरराजाकडे परत जाऊन त्याच्या अपयशाची कबुली देण्याशिवाय त्याच्याजवळ काहीच पर्याय नव्हता, म्हणून त्याने मोठ्या दुःखाने आणि हळूहळू मागे पोहत परतायला सुरूवात केली. बेट सोडून तरंगत मागे जाताना त्याने शेवटची गोष्ट कोणती ऐकली असेल तर ती म्हणजे माकडाचे हसू. दरम्यानच्या काळात ड्रॅगन राज, वैद्य, मुख्य परिचारक आणि सारे सेवक पाकमत्स्याच्या परतीची मोठ्या उतावीळपणे वाट बघत होते. तो राजवाड्याजवळ येत असल्याचे दृश्य पाहून त्याचे त्यांनी मोठ्या आनंदाने स्वागत केले. माकडाच्या बेटाकडे जाताना त्याने घेतलेल्या त्रासाबद्दल त्याचे खूप खूप आभार मानायला त्यांनी सुरूवात केली आणि नंतर विचारले की माकड कोठे आहे.

आता पाकमत्स्याच्या परीक्षेचा दिवस आला होता. त्याची गोष्ट सांगताना तो कंप पावत होता. समुद्राच्या अर्ध्या मार्गापर्यंत त्याने माकडाला कसे आणले आणि त्याच्याजवळ त्याच्यावर सोपविलेल्या कामगिरीची गुप्तता कशी फोडली आणि यकृत मागे टाकून आल्याचे काल्पनिक खोटे सांगून माकडाने त्याला कसे फसविले हे सर्व सांगितले.

ड्रॅगनराजनचा क्रोध अतिशय अनावर झाला आणि त्या पाकमत्स्याला अतिशय कडक शिक्षा देण्याचे त्याने फर्मावले. शिक्षा अतिशय भयंकर होती. त्याच्या सजीव शरीरातील सर्व हाडे बाहेर काढली जाऊन काठ्यांनी त्याला झोडपले जाणार होते.

गरीब बिचाऱ्या मत्स्याची मानहानी झाली आणि तो वर्णनातीत घाबरला आणि माफी मागण्यासाठी रडू लागला. पण ड्रॅगनराजाची आज्ञा पाळलीच जाणार होती. राजवाड्यातील सर्व सेवक पुढे सरसावले आणि प्रत्येकाने काठी आणली. त्याला वेढून त्याच्या शरीरातील हाडे काढून त्याला चांगले चोपून त्याचा सपाट लगदा बनविला. नंतर त्याला राजवाड्याच्या प्रवेशद्वाराबाहेर आणून पाण्यात फेकून देण्यात आले. तेथे त्याला त्याच्या मूर्ख बडबडीमुळे शारीरिक वेदना आणि पश्चात्तापाच्या यातना सहन कराव्या लागल्या आणि हाडविरहीत स्थितीत राहून घेण्याची सवय लावून घ्यावी लागली.

ह्या गोष्टीवरून हे उघड आहे की एकेकाळी त्या पाकमत्स्याला कासवासारखी काहीशी हाडे आणि कवच होते, पण जेव्हा ड्रॅगनराजाने केलेली शिक्षा अमलात आणली गेली तेव्हापासून, पाकमत्स्याचे पूर्वज, वंशज मृदू आणि अस्थिहीन शरीराचे बनले आणि आज त्यांना तुम्ही जपानच्या समुद्रकिनाऱ्यावर लाटांनी फेकले गेलेले पाहता.

* * * * *

ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान